
वर्ष - ५ अंक - १५

अंगारमळा

मार्च - २०२१



सातवे अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन, रावेरी विशेषांक

कोरोना अरिष्ट पर्यायी ऑनलाईन वेबमिलन सप्ताह

पिकांच्या भरघोस उत्पादनासाठी

३० वर्षापासून लाखो शेतकऱ्यांचे विश्वासपात्र

प्लॅन्टो कृषीतंत्र

भारत सरकारच्या CSIR/NIO प्रयोग शाळेने विकसित केलेल्या तंत्रज्ञानावर आधारित

भारतातील विविध कृषी विद्यापिठांमध्ये निरनिराळ्या पिंकावरील परिक्षणात उत्पादन वाढिसाठी प्लॅन्टो उत्पादने खुपच परिणाम कारक असल्याचे सिध्द झाले आहे.



प्लॅन्टोकृषी तंत्र वापराचे फायदे

मुळ्यांचा जलद विस्तार होतो, अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढते. फोटोसिंथेसिस क्रियेचा वेग वाढून पिकाची सर्वांगीण व निरोगी वाढ होते. कृषी विद्यापिठातील चाचण्यांनुसार प्लॅन्टोच्या वापराने उत्पादनात २० ते ६०% पर्यंत वाढ मिळते.

An ISO 9001 : 2008 Certified Company

प्रलशर बायो प्रॉडक्टस प्रा. लि., गोवा

डी, २/१०, काकोडा इंडस्ट्रियल इस्टेट, कुचेरेम, काकोडा, गोवा. । महाराष्ट्र : संपर्क :- ☎ ०९४२२२१०७७५

Krivic-@ 2020

अंगारमळा

Title Code : MAHMAR47450

वर्ष ५ । अंक १५ । मार्च २०२१

मूल्य : रु. ५०

अंगारमळा हे मासिक मालक, संपादक, मुद्रक, प्रकाशक, गंगाधर मुटे यांनी त्रिवेणी ऑफसेट वर्क्स, प्रयाग ३१२, दक्षिणामुर्ती चौक, महाल, नागपूर-४४००३२ येथे छापून, मु.पो. आर्वी छोटी, ता. हिंगणघाट, जि. वर्धा-४४२३०७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

संपादक
गंगाधर मुटे

अंक मांडणी
प्रकाश बोपीनवार

पंचवार्षिक वर्गणी : रु.२०००/-
द्विवार्षिक वर्गणी : रु.१०००/-
वार्षिक वर्गणी : रु. ६००/-

संपर्क :
अंगारमळा
मु.पो. आर्वी (छोटी)
ता. हिंगणघाट, जि. वर्धा
पीन कोड - ४४२ ३०७
Email : angarmala2016@gmail.com
Mob. 9730582004, 9730786004

ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी :
Angarmala
Punjab National Bank
Branch Hinganghat (Wardha)
A/c No. 0202002100027538
IFS Code : PUNB0020200

अंकातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

Title Code : MAHMAR47450

अंतरंग

अनुक्रमणिका १

निर्बुद्ध शेतकरी नेता टिकैत ..... गंगाधर मुटे ..... संपादकीय ३

आम्ही मरावं किती ..... युगात्मा शरद जोशी ... अमृतकुंभ ५

स्त्रियांचे प्रश्न अन् 'चांदवडची शिदोरी' . युगात्मा शरद जोशी ... अमृतकुंभ ७

हा प्रश्न मराठी साहित्याला कधी पडेल? वसुंधरा काशीकर ..... अध्यक्षीय भाषण ९

तंत्रज्ञान साक्षरतेची मुहूर्तमेढ रोवणारं संमेलन ..... रवींद्र दळवी ..... कव्हरस्टोरी ११

शेतकरी संघटनेला गवसलेले अनमोल रत्न ऍड वामनराव चटप ..... गंगाधर मुटे १७

सीता मंदीर एक स्त्री शक्तीपीठ ..... सौ.सरोज काशीकर ... वनिताविश्व २३

रावेरी आणि शरद जोशी ..... शैलजा देशपांडे ..... आकलन २५

आमचं जग, आमचं जगणं ..... सौ. प्रज्ञा बापट ..... अनुभूती ३०

सगळ्यात महत्त्वाची मानवताच! ..... अमृता खंडेराव ..... मनोगत ३२

रानाच्या हिरव्या बोलीचा गझलकार .... बदीऊज्जमा बिराजदार . साहित्यशेती ३३

धर्मनिरपेक्ष भारताला हवेत निःस्वार्थ सत्ताधिश ..... चिमनदादा पाटील .... मंथन ३५

- संपर्क प्रतिनिधी -

● **श्री. रामेश्वर अवचार**, विशेष प्रतिनिधी, मो. ९९६०३३३४३७ ● **प्रा. भुपेश मुडे**, मुंबई, मो. ९२२३५३८०३० ● **श्री. निवृत्ती करडक**, नाशिक, मो. ९३७१२५९५४५ ● **श्री. कडुआप्पा पाटील**, जळगांव, मो. ९३७१२७२७८१ ● **श्री. रमेश खांडेभराड**, जालना, मो. ९४२१३२३६१३ ● **श्री. मदन सोमवंशी**, लातूर, मो. ९७६४०६१८७७ ● **श्री. राजु झोटींग**, यवतमाळ, मो. ९६७३३४६६३५● **श्री. शालीक पाटील नाकाडे**, गडचिरोली, मो. ९४०४२२०४३९ ● **श्री. धोंडबा गावंडे**, वर्धा, मो. ९४२००६२८७६ ● **श्री. दिलीप भोयर**, अमरावती, मो. ९४२००७४८८४ ● **श्री. दगडूजी शेळके**, जळगांव, मो. ७७१९९६१०२५ ● **श्री. बाबासाहेब आवचार**, परभणी, मो. ९९२१६३०१७४ ● **श्री. गुलाबसिंह रघुवंशी**, धुळे, मो. ९४२१४७२३१२

mahyco grow

mahyco®
प्रत्येक बी अनमोल

शेतकऱ्यांचे हित हीच प्राथमिकता

सन १९६४ साली महिकोची स्थापना झाली व तेंव्हापासुनच शेती संशोधनावर भर दिलेला असुन आजतागायत ३० विविध पिकाच्या प्रकारात ११५ पेक्षा अधिक संकरीत बियाण्याचे वाण विकसित केले.

गत ५० पेक्षा जास्त वर्षांपासून, महिकोचा प्रयत्न शेतकऱ्यांसाठी उच्च दर्जेदार बियाणे निर्माण करण्यासोबतच अधिक उत्पादनाची हमी तसेच जैविक आणि अजैविक ताणाचे निराकरण करण्यास शेतकऱ्यांना मदत करणे हे होय. महिकोची विविध प्रकारची उत्पादने तसेच देशाच्या काना कोपऱ्यात पसरलेले विस्तृत जाळे, आमच्या १ कोटीहून अधिक शेतकरी बांधवांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविते.

शेतकऱ्यांची प्रगती ही एकच बांधिलकी जोपासण्याऱ्या महिकोचे पायाभूत तत्वज्ञान - शेतकऱ्यांचे हित हीच आमची परंपरा व विचारधारा.



महिको प्रायव्हेट लिमिटेड

ई-मेल : info@mahyco.com, वेब-साइट : www.mahyco.com

/MahycoGrow /MahycoGrow /Mahycogrow

संपादकीय

❋ निर्बुद्ध शेतकरी नेता टिकैत

सध्या गाजत असलेल्या दिल्ली शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने श्री राकेश टिकैत यांचे नाव चर्चेत आले आहे. भारतीय किसान युनियनचे ते राष्ट्रीय प्रवक्ता आहेत आणि त्यांचेच थोरले बंधू नरेश टिकैत हे भारतीय किसान यूनियनचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. राकेश आणि नरेश ही दिवंगत महेंद्रसिंग टिकैत यांची मुले आहेत. महेंद्रसिंग यांच्या निधनानंतर डोक्याला पगडी बांधून नरेश टिकैत यांना राष्ट्रीय किसान युनियनचे अध्यक्ष घोषित करण्यात आले. हा केवळ वारसाहक्क होता, त्यात लोकशाही वगैरेचा कुठेच सुतराम संबंध नव्हता. राजकीय वारसा मिळून जसे राजकीय नेते होता येते तसेच वडिलोपार्जित हक्काने शेतकऱ्यांचा नेता देखील होता येते, याचे ठसठशीत उदाहरण म्हणून या उदाहरणाकडे बघायला हरकत नाही.

१९९० च्या दशकात उत्तरप्रदेशात शेतकरी नेते म्हणून महेंद्रसिंग टिकैत यांनी दबदबा कायम केलाच होता. शेतकरी नेते म्हणून टिकैतांना नावलौकिक प्राप्त झाला असला तरी ते मूलतः शेतकरी नेते नव्हतेच. लाखो जातबंधू सामील असलेल्या त्यांच्या जात पंचायतीचे ते मुखिया होते. जात पंचायत इतकी मजबूत कि कोणत्याही कारणासाठी मुखियाने आवाज दिला तर तर ५ तासांच्या आत २-३ लक्ष जातभाई पंचायतीत एकत्र येण्याची त्यांची परंपरा. त्या जातपंचातीचा उपयोग करून महेंद्रसिंग टिकैतांनी किसान युनियनला आकार दिला आणि शेतकरी नेते झाले. त्या जातपंचायतीमधील सर्वांचा व्यवसाय शेती असल्याने व ते आपल्या व्यवसायाच्या भल्यासाठी एकत्र आल्याने त्या पंचायतीचा नेता असलेले टिकैत आपोआपच शेतकरी नेते झाले.

शेतीविषय हाताळायला शेतीचे अर्थशास्त्र व शेतीच्या समस्या शास्त्रीय दृष्ट्या समजून घ्यायची टिकैतांना कधी गरजच भासली नाही किंवा असेही म्हणता येईल की शेतकरी नेता होण्यासाठी जो अभ्यास लागतो, अभ्यास करण्यासाठी गुणवत्ता लागते ती टिकैतांकडे कधीच नव्हतीच. मनाला येईल तशा उटपटांग मागण्या घेऊन आंदोलन रेटने यापलीकडे टिकैतांना दुसरे काही जमलेच नाही. त्यांचा स्वभाव आणि वृत्ती हुकूमशहाची म्हणण्याऐवजी एखाद्या गल्लीबोळातल्या मवाली गावगुंडांसारखी होती. काहीही कारण नसताना बोलताबोलता निष्कारण युगात्मा शरद जोशी आणि शेतकरी संघटनेतील तत्कालीन नेते विजय जावंधिया यांच्यावर बुक्की उगारताना टिकैतांना मी माझ्या नजरेने पाहिले आहे. गावातल्या काही बायका लहान मुलावर रागीष्ट नजरेने बघून जशा दातओठ खातात, त्या क्रोधी मुद्रेत कार्यकर्त्यांकडे बघून दातओठ खाताना टिकैतांना मी अनेकदा पाहिले आहे.


अपरिपक्व व निर्बुद्ध नेतृत्व

१९८९-९० मध्ये शेतकरी नेते युगात्मा शरद जोशी यांच्या शेतावरील राहते घरी महेंद्रसिंग टिकैत आले होते (चित्र क्र. १). तेव्हा त्यांनी पत्रकारांशी बोलताना अचानक एक आगळीवेगळी मागणी केली होती. ते म्हणाले होते कि रेल्वेतील तिकिटांचे अग्रीम आरक्षण व डब्यांचे आरक्षण पूर्णपणे बंद झाले पाहिजे. तिकिटे फक्त वेळेवरच मिळाली पाहिजे आणि सर्व डब्बे अनारक्षित असले पाहिजे. पत्रकार गेल्यानंतर या आगळ्यावेगळ्या मागणी बद्दल मी टिकैतांची भूमिका विचारली असता ते म्हणाले की, येताना आम्हाला रेल्वेची तिकिटे न मिळाल्याने आम्हाला फुकट प्रवास करावा लागला म्हणून रेल्वेतील तिकिटांचे अग्रीम आरक्षण बंद झाले पाहिजे जेणेकरून सर्वांना वेळेवर तिकिटे मिळू शकतील. रेल्वेच्या आरक्षित डब्यात आम्हाला चढू न दिल्याने आम्हाला जनरल डब्यात चढून उभ्याने प्रवास करावा लागला.... ये किसानोंका अपमान है. आमचा किसान आरक्षण-बिरक्षण नाही करू शकत त्यामुळे सर्व डबे सर्वांसाठीच खुले असले पाहिजे. यासाठी मी आंदोलन करणार आहे. (पुढे त्यांनी तसे आंदोलन केले नाही हा भाग वेगळा.)

जून २०२० मध्ये राकेश टिकैत यांनी नवीन विधेयकाचे जोरदार समर्थन करून या कायद्यामुळे शेतकरी आणि ग्राहक यांच्यातील मध्यस्थ संपून त्याचा फायदा शेतकऱ्यांना होईल असे म्हटले होते, इतकेच ही आमची बरसोपुरानी मागणी आहे, असेही म्हटले होते. (चित्र क्रं. २). मग चारच महिन्यात राकेश टिकैतांना असा कोणता साक्षात्कार झाला की हाच कायदा रद्द करण्यासाठी त्यांना अटीतटीचे आंदोलन करावे लागत आहे? आमच्या बोलीभाषेत अशा व्यक्तिमत्वाला बिनबुडाचे गाडगे असे म्हणतात. या तिन्ही विधेयकाचा चड्डा शी अर्थाअर्थी काहीही संबंध नाही.

एमएसपीच्या आत शेतमाल खरेदी करण्यास मनाई असावी किंवा एमएसपीच्या आत शेतमाल खरेदी केल्यास गुन्हा ठरावा, इतकेच टिकैतांचे म्हणणे असते तर त्याच मागणीसाठी त्यांनी आंदोलन केले असते. तीन कायदे रद्द केल्याशिवाय आंदोलन संपवणार नाही असे म्हणण्याऐवजी एमएसपीच्या आत खरेदी करण्यास मनाई करणारा कायदा केल्याशिवाय आंदोलन संपणार नाही असे म्हटले असते. जेव्हा जसे मनात येईल तसे बोलणे, यापलीकडे राकेश टिकैत यांचे व्यक्तिमत्व नाही.

शेतमालाच्या भावाचा प्रश्न किमान आधारभूत किंमतीशी (msp) नव्हे तर उत्पादन खर्च भरून निघतील इतके किमान भाव मिळण्याशी संबंधित आहेत इतकेही ज्याला कळत नाही त्याला शेतीविषयाचे अजिबात ज्ञान नसणारा नेता असेच म्हणावे लागेल. असे म्हणणे नाईलाज आहे कारण अशा निर्बुद्ध नेत्यांमुळे शेतीचे काही भले होण्याऐवजी शेतीचे आणखी नुकसानच होण्याची पुरेपूर शक्यता आहे.



– गंगाधर मुटे आर्वीकर

महाशिवार ॲग्रो

सातवे अखिल भारतीय
मराठी शेतकरी साहित्य संमेलन, रावेरी
या कार्यक्रमास आमच्या वतीने हार्दिक शुभेच्छा.!

महाशिवार ॲग्रो
फार्मर्स प्रोडयुसर कंपनी लि.
चेअरमन, सर्व संचालक व सभासद मंडळ

श्री.अभिमन्यू बबनराव शेलार
(चेअरमन, महाशिवार ॲग्रो)





आम्ही मरावं किती?

युगात्मा शरद जोशी



शेतकरी महिला आघाडीने जिल्हा परिषद व पंचायत समिती बळकाव आंदोलनाचा धक्का दिल्यावरच सरकारला निवडणुका घेणे भाग पडले. नंतर सरकारने १०० टक्के महिला पॅनलच्या कार्यक्रमाला शह देण्यासाठी ३३ टक्के महिला आरक्षणाची क्लृप्ती काढली..

शोषणाच्या अनेकविध लढायांत आपल्या पुरुषांचे पौरुष जागते ठेवण्याच्या आपल्याकडे आलेल्या जबाबदारीमुळे स्त्रियांनी आपल्या सामाजिक भूमिकेत तडजोड म्हणून जे काही बदल करून घेतले तोच त्यांचा स्वाभाविक गुणधर्म मानला जाऊ लागला. त्यायोगे त्यांना दुय्यम स्थान पत्करावे लागले आणि पुरुषांच्या अंगी, ते जैविकदृष्ट्या स्त्रियांच्या तुलनेत कमकुवत असूनही, अनसगक विक्राळपणा बाणत गेला. या स्थितीतून बाहेर पडण्यासाठी शेतकरी संघटनेने 'स्त्रीशक्तीच्या जागरणातून स्त्री-पुरुषमुक्ती' चा मार्ग म्हणून स्त्रियांचे आत्मभान जागे करण्यासाठी अभियान सुरू केले. त्याची सुरुवात चांदवडच्या शेतकरी महिला अधिवेशनाने झाली.

९ व १० नोव्हेंबर १९८६ ला चांदवड (जि. नाशिक) येथे शेतकरी महिला अधिवेशन झाले. स्त्री चळवळीतील वेगवेगळ्या संघटनांनाही आमंत्रित केले होते. चांदवडच्या अधिवेशनात अनेक महत्त्वाचे ठराव झाले. त्या ठरावांतील एक महत्त्वाचा ठराव म्हणजे त्या सुमारास घडलेल्या दिल्लीतील शीखविरोधी दंगलीत ज्या स्त्रियांवर बलात्कार झाले त्या प्रकरणांची चौकशी व्हावी व काँग्रेस पक्षाच्या नेत्यांची जबाबदारी काय होती हेही पुराव्याने पुढे यावे याकरिता दिल्लीत स्त्रियांचा एक मोठा मोर्चा काढायचे ठरले होते. यासाठी शेतकरी आणि शहरी महिलांची एकत्र अशी 'समग्र महिला आघाडी' ही तयार करण्यात आली. पण, शहरी महिला कार्यकर्त्यांनी त्यातून अंग काढून घेतले. यातून एक धडा शिकावयास मिळाला तो हा की, स्त्रिया विरुद्ध पुरुष असा संघर्ष इतिहासात कधीही झालेला नाही आणि होणे नाही. सर्व स्त्रिया वर्गीय पूरकतेपेक्षा जैविक एकतेला अधिक मानतात. पण सर्व वर्गाच्या स्त्रिया आपापल्या पुरुष मंडळींचाच पाठपुरावा करतात. शेतकरी संघटनेच्या विचारातही मार्क्सच्या वर्गसंकल्पनेचा विरोध करताना एकसमान घटकांची संघटना बनत नाही; संघटना बनण्यासाठी त्यातील घटक परस्परपूरक असावे लागतात, असेही मत मी मांडले होते. त्याचा पडताळा येथे आला.

या अधिवेशनास उपस्थित लाखो स्त्रियांनी घेतलेली प्रतिज्ञा, आज स्त्रियांसंबंधी ज्या प्रश्नांची चर्चा जोरजोराने सुरू आहे त्या प्रश्नांवर शेतकरी महिला आघाडीने कितीतरी आधीपासूनच उपाय शोधला होता याची साक्ष देते.

आम्ही प्रतिज्ञा घेतो की,

- आम्ही यापुढे स्त्रियांना कधीही कनिष्ठ मानणार नाही. विशेषत: गर्भ स्त्री-बालकाचा आहे यास्तव त्याला जन्माचा हक्क नाकारणार नाही.
- मुलगी आहे म्हणून लालनपालन, वात्सल्य, शुश्रूषा आणि शिक्षण यांत कमी करणार नाही.
- स्त्रियांना मालमत्तेतील त्यांची वाटणी, गुणविकासाला वाव आणि स्वातंत्र्य मिळण्याआड येणार नाही.
- मुलींचे शिक्षण आणि विवाह याबद्दलच्या कायद्यांचे पूर्णपणे परिपालन करू.
- सासुरवाशिणींना घरच्या लेकींप्रमाणे वागवू आणि माहेरवाशिणींना आमचा आधार कायम वाटेल अशा वागू. विधवा, घटस्फोटिता व परित्यक्ता आणि विशेषत: अत्याचारांना बळी पडलेल्या स्त्रियांना कमी लेखणार नाही.
- स्त्रियांचे शृंगार-ललित रूपच प्रकाशात आणून त्यांची नटवी, उपभोग्य वस्तूची प्रतिमा मांडणार नाही आणि मांडू देणार नाही.

चांदवडच्या अधिवेशनानंतर एक परिवर्तनाची मोठी लाट सगळ्या महाराष्ट्रातील शेतकरी समाजाला व्यापून गेली. अनेक शेतकऱ्यांनी आपण आपल्या घरातील लक्ष्मीला किती तुच्छ लेखून वागवत होतो, हे विशद करणारी पत्रे मला लिहिली आणि अनेक शेतकरी महिलांनीही आपल्या घरच्यांचे वागणे अधिवेशनानंतर किती बदलले हे सांगणारी पत्रे लिहिली.

चांदवडच्या अधिवेशनात, स्त्रियांसंबंधीची कामे ज्या संस्थांत होतात त्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे कारभार सर्वतोपरी स्त्रियांच्या हाती असावेत यासाठी शेतकरी संघटनेने पंचायत राज संस्थांच्या निवडणुकांत १०० टक्केमहिला पॅनेल्स् उभी करण्याचे जाहीर केले. त्याचा धसका म्हणून, शंकरराव चव्हाणांच्या कारकिर्दीत जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यांच्या निवडणुका, त्यांची मुदत संपूनही तीन वर्षे झाल्याच नाहीत. शेवटी शेतकरी महिला आघाडीने जिल्हा परिषद व पंचायत समिती बळकाव आंदोलनाचा धक्का दिल्यावरच सरकारला त्या घेणे भाग पडले. पण सरकारने शेतकरी महिला आघाडीच्या १०० टक्केमहिला पॅनलच्या कार्यक्रमाला शह देण्यासाठी ३३ टक्के आरक्षणाची क्लृप्ती काढली.

नेहरूप्रणीत समाजवादी व्यवस्थेतील लायसन्स्-परमिट-कोटा-इन्स्पेक्टर राज्यात गावोगावी उघडलेली सरकारमान्य दारू दुकाने ही राजकारण्यांचा वरदहस्त लाभलेल्या गुंडांचे अड्डे बनल्याची आणि त्यामुळे नागरिकांना, विशेषत: स्त्रिया-मुलींना रस्त्यातून

येणे-जाणे असुरक्षित झाल्याची नोंद शेतकरी महिला आघाडीने गंभीरपणे घेऊन दारू दुकानबंदीचे आंदोलन छेडले. चांदवडच्या अधिवेशनातून आत्मभान घेऊन बाहेर आलेल्या शेतकरी स्त्रियांनी रणरागिणींचा अवतार धारण करून गुंड, त्यांना संरक्षण देणारे प्रशासन व पुढारी यांच्या दडपशाहीला भीक न घालता, गावोगावची दारू दुकाने बंद करण्याचा, प्रसंगी नष्ट करण्याचा धडाका लावला. चांदवडनंतर आपल्या पुरुषी विक्राळपणाला तिलांजली दिलेल्या शेतकरी पुरुषांनीही या महिलांना बळ दिले. परिणामी, सरकारला लागोपाठ तीन अध्यादेश काढून ही दुकाने बंद करवण्याचा पर्याय जनतेला द्यावा लागला.

शेतकरी महिला आघाडीने सुरू केलेल्या 'लक्ष्मीमुक्ती' अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन दोन लाखांवर शेतकरी पुरुष कारभाऱ्यांनी आपापल्या घरच्या लक्ष्मीला जमिनीची मालकी देऊन आपल्यात झालेल्या बदलाचा पुरावा दिला. शेतकरी संघटनेच्या ज्या पाईकांकडे जमीनच नाही त्यांनी आपल्या व्यवसायातील फायदा, घर किंवा असलेल्या अन्य मालमत्तेत आपल्या लक्ष्मीला हिस्सेदार करून ऋणमुक्त झाल्याची उदाहरणेही बरीच आहेत. पुढे यथावकाश स्त्रियांची चळवळ वाढत गेली आणि अनेक सरकारी व निमसरकारी पदांवर महिला विराजमान झाल्या; राखीव जागांवर निवडून आल्या.

या सगळ्या अनुभवांचा उपयोग मला पुढे राज्यसभेत स्त्रियांच्या आरक्षणासंबंधी बाजू मांडताना झाला. विचक्षक वाचकांच्या लक्षात असेल, की राज्यसभेत आरक्षणाला विरोध करणारा मी एकटा खासदार होतो. लोकसभेत यासंबंधीचे विधेयक अजूनही दाखल झालेलेच नाही. दलित आणि आदिवासी यांची एका विशिष्ट भौगोलिक भागातील लोकसंख्या किती ते ठरवता येते. त्यानुसार प्रत्येक कायदेमंडळात त्यांच्याकरिता राखीव जागा किती असाव्यात याचे गणित करता येते. स्त्रिया तर सगळीकडे ५० टक्के आहेतच - थोडय़ाफार कमी-जास्त प्रमाणात. मग, त्यांच्या आरक्षणाचे प्रमाण कसे ठरवावे, याकरिता संपुआ शासनाने आणि बीजिंग परिषदेचा प्रभाव असलेल्या काही महिलांनी एक क्लृप्ती काढली. ती थोडक्यात अशी - पहिल्या निवडणुकीत राखीव मतदारसंघ हे ईश्वरचिठ्ठीने ठरविण्यात यावेत आणि त्यानंतरच्या निवडणुकीत ते मतदारसंघ पाळीपाळीने बदलण्यात यावेत. माझे दुर्दैव हे, की या योजनेला विरोध करण्याची जबाबदारी माझ्याकडे आली. या पद्धतीने निवडणुका झाल्यास त्यात खऱ्याखुऱ्या जागृत व सक्षम महिलांना काही स्थान मिळणार नाही. उलट, त्यामुळे प्रस्थापित पुढाऱ्यांच्या परिवारातील महिलाच पुढे येतील. शिवाय, निवडून आलेल्या प्रत्येक स्त्री प्रतिनिधीला पुढच्या निवडणुकीत आपल्याला ही जागा लढविताच येणार नाही, लढवलीच तर खुली जागा म्हणून लढवावी लागेल हे पक्के माहीत असेल आणि पुरुष प्रतिनिधीच्या डोक्यावर पुढच्या निवडणुकीत त्याची जागा स्त्री राखीव होण्याची टांगती तलवार असेल. परिणामत: कोणत्याही मतदारसंघाचे विकास करण्याचे काम ना पुरुष पाहतील ना स्त्रिया. एवढेच नव्हे तर, या व्यवस्थेत दुसऱ्यांदा निवडून येणाऱ्या आमदार-खासदारांची संख्यासुद्धा अत्यल्प असेल आणि त्यामुळे कायदेमंडळांत अनुभवी सदस्यांचा अभाव होईल.

थोडक्यात, महिलांचा प्रश्न हा आजही पहिल्याइतकाच गुंतागुंतीचा आणि समजण्यास अवघड झाला आहे. अलीकडे दिल्लीतील सामूहिक बलात्काराच्या घटनेनंतर या प्रश्नावर देशव्यापी चर्चा घडवल्या जात आहेत. स्त्री आणि पुरुष यांच्या लैंगिकतेत हार्मोन्सचा प्रभाव किती आणि सामाजिक व्यवस्थांचा परिणाम किती या विषयावर अनेक मते मांडली जात आहेत. बलात्काऱ्यांना कोणत्या प्रकारची शिक्षा द्यावी याहीबद्दल अनेक अवास्तव, अतिरेकी आणि अवास्तव मवाळ विचार मांडले जात आहेत, त्यासंबंधीचा विचार पुढच्या एखाद्या लेखात करू.

(पूर्वप्रकाशित-२०१३)

♦ ♦ ♦

शरद जोशी यांची विचारसूत्रे

- शेतीची लूट चालूच आहे, फक्त लुटणारे बदलले
- शेतकरी तितुका एक एक
- पाणी असेल त्याची पाण्याने तर नसेल त्याची बिनपाण्याने हजामत होते
- सामूहिक निर्णय चुकतात, व्यक्तिगत निर्णय अचूक असण्याची अधिक शक्यता असते
- लक्ष्मिमुक्ति हे मंगल सावकाराचे देणे आहे
- गोरा इंग्रज जाऊन काळा इंग्रज आला आहे
- या देशात भारत आणि इंडिया असे दोन देश आहेत
- बांडगुळाची छाटणी करावी लागणार आहे
- खाजगी मालमत्तेचा अधिकार हा खुल्या अर्थव्यवस्थेचा पाया आहे..
- एकाधिकार नको, खुली स्पर्धा पाहिजे
- प्रत्येक अर्थव्यवस्थेची एकेक उकिरडा असतो
- माणसाच्या विचाराचे इंद्रिय मेंदू नसून त्याचा खिसा आहे

स्त्रियांचे प्रश्न अन् 'चांदवडची शिदोरी'

युगात्मा शरद जोशी



शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेण्याकरिता मी शेतकरी झालो, शेतीतील दु:खे अनुभवली. स्त्रियांचा प्रश्न समजून घेण्याकरिता स्त्री होणे कसे शक्य होणार? मग ग्रामीण भागातील स्त्रियांची शिबिरे भरवून त्यांच्या मनात शिरून त्यांची दु:खे व समस्या समजून घेण्याचे ठरविले..

शोषणाच्या अनेकविध लढायांत बायकांकडे आपल्या पुरुषांचे पौरुष जागते ठेवण्याची भूमिका आली आणि त्यामुळे त्यांनी आपल्या सामाजिक भूमिकेत तडजोड म्हणून योग्य ते बदल करून घेतले..

माझ्या हातून एंगल्सच्या The origin of family, the private property and the State या पुस्तकाचा प्रतिवाद करणारे एक पुस्तक लिहिले गेले आहे - The women's Question. त्याबरोबर चांदवडच्या प्रचंड महिला अधिवेशनाच्या तयारीसाठी महिलांना पूर्वतयारी म्हणून 'चांदवडची शिदोरी' ही पुस्तिकाही माझ्या हातून लिहिली गेली आहे, पण तरीही मी स्वत:ला महिला विषयातला जाणकार किंवा तज्ज्ञ मानत नाही.

शेतकरी संघटना जशी माझ्या हातून होऊन गेलेला एक चमत्कार आहे त्याचप्रमाणे शेतकरी महिला आघाडी हा माझ्या हातून घडलेला त्याहूनही मोठा चमत्कार आहे. या चमत्काराची सुरुवात १९८२ साली जानेवारी महिन्यात शेतकरी संघटनेच्या सटाणा येथील पहिल्या अधिवेशनात झाली. त्या अधिवेशनात त्या वेळी हयात असलेल्या माझ्या पत्नीने-लीलाने पहिले भाषण केले आणि त्या भाषणात शेतकऱ्यांच्या संघटनेबरोबर शेतकरी महिलांचीही संघटना असायला पाहिजे, अशी बाजू मोठय़ा परिणामकारकरीत्या मांडली होती. सौ. लीला गेल्यानंतर माझ्या मनात एका अपराधी भावनेपोटी, महिलांचे काहीतरी काम घडावे अशी तीव्र इच्छा निर्माण झाली.

त्यानंतर एक प्रसंग घडून आला. विदर्भात मी गेलो म्हणजे वर्धा येथील रवी काशीकर यांच्या घरी माझा मुक्काम असे. मी मुक्कामाला असलो की सहजच पाच-पंचवीस कार्यकर्ते मुक्कामाला आणि त्यासंबंधीच्या प्रचारयात्रेमध्ये असत. त्या वेळी स्वयंपाकघर सांभाळण्याचे काम सरोज वहिनींवर पडे. सकाळच्या नाश्त्याला रात्रीच्या उरलेल्या पोळ्यांना कांदा-मिरचीची फोडणी घालून बनविलेला शिपोतू नावाचा एक पदार्थ सर्वांना खूप आवडे, त्याचे काही वेगळे काम पडत नसे. तरीही एके दिवशी सरोज वहिनींनी तक्रार केली की, बाहेरच्या दिवाणखान्यात तुम्ही पाच-पंचवीस कार्यकर्ते घेऊन बसता, शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा करता, त्यात आमचा सहभाग कोठेच नाही. ही तक्रार लक्षात घेऊन घरमालक रवी काशीकर यांनी एक कल्पना काढली. एक दिवस सुट्टीचा समजून त्या दिवशी चूल बंद. त्या दिवशी एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी सर्वांनी सहकुटुंब वनभोजनासाठी जायचे. त्या दिवशी जी चर्चा होईल ती प्रामुख्याने महिलांना रुची वाटेल अशाच प्रश्नांवर व्हावी. तेही घडून गेले. पुढे सरोज वहिनी या प्रभा राव यांचा पराभव करून विधानसभेत निवडून आल्या. एवढेच नव्हे तर अध्यक्षांच्या तालिकेतही त्यांचे मानाचे स्थान होते. आजपर्यंत अनेक वेळा मी त्यांच्यावर संघटनेच्या महत्त्वाच्या बैठकांच्या समालोचनाचे काम करण्याची जबाबदारी सोपवली आहे आणि ती त्यांनी नेहमीच उत्कृष्टरीत्या पार पाडली आहे.

चांदवडच्या अधिवेशनाच्या खूप आधी घडलेली आणखी एक घटना. सुरुवातीला अगदी तरुण कार्यकर्ते संघटनेत आले, यथावकाश त्यांची लग्ने होऊ लागली. अशाच एका कार्यकर्त्यांच्या पत्नीने मला एक पत्रवजा विनंती केली, 'माझे पती स्वच्छ चारित्र्याचे आहेत, ते संघटनेचे काम करतात. हे काम चांगले आहे. याचा मलाही अभिमान आहे. पण या कामात माझे नेमके स्थान कोणते हे मला अजून समजलेले नाही. दिवसांमागून दिवस हे घराबाहेर राहतात आणि घरी आल्यावर आपल्यासंबंधीच्या अनेक आठवणी सांगतात. 'आणि माझी स्थिती समोरून पंचपक्वान्नांचे ताट जाऊन स्वत: उपाशी राहणाऱ्या प्राण्यासारखी होते.' या विनंतीचा शेवट तिने मोठया धमकीने केला होता. 'तुम्ही जर का या प्रश्नाला योग्य उत्तर शोधले नाही तर मी या जगात फार दिवस राहू शकणार नाही इतका माझ्या जिवाचा कोंडमारा होत आहे.'

शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेण्याकरिता मी शेतकरी झालो, शेतीतील दु:खे अनुभवली. स्त्रियांचा प्रश्न समजून घेण्याकरिता स्त्री होणे कसे शक्य होणार? मग ग्रामीण भागातील स्त्रियांची शिबिरे भरवून त्यांच्या मनात शिरून त्यांची दु:खे व समस्या समजून घेण्याचे ठरविले. मराठवाडय़ातील हळीहंडरगुळी येथील पहिल्याच बैठकीत अनेक प्रयत्न करूनही स्त्रियांना बोलते करण्याची कल्पना काही प्रत्यक्षात येईना. याच बैठकीत एक मधली सुट्टी घेऊन मी महिलांना भजन किंवा अभंग म्हणण्याची सूचना केली. त्यांनी ती चढाओढीने अमलात आणली. त्यानंतर महिला अहमहमिकेने चर्चेमध्ये भाग घेऊ लागल्या. ही परंपरा पुढे अनेक वर्षे टिकली. त्या वेळी माझ्यासोबत 'योद्धा शेतकरी'चे लेखक विजय परुळकर आणि त्यांच्या पत्नी सरोजा याही होत्या. विजय परुळकरांनी, सुरुवातीला बुजून गप्प बसलेल्या महिलांचा चर्चेत भाग घेण्याचा उत्साह पाहून मला एक चिठ्ठी लिहिली. मी स्वत:ला (Communication Expert) समजतो, पण माझेही तुम्हाला वंदन आहे. ही चिठ्ठी अगदी अलीकडे अलीकडेपर्यंत

मी जपून ठेवली होती; आता ती कोठेतरी गहाळ झाली. त्यानंतर आणखी चार ठिकाणी शिबिरे झाली. स्त्रियांच्या प्रश्नांची मनात थोडी थोडी जुळणी होऊ लागली. स्त्री-प्रश्नावरील पुस्तकांचा आणि चळवळीचा अभ्यासही चालू होता.

योगायोगाने त्याच वेळी प्रसिद्ध विचारवंत रावसाहेब कसबे माझ्याकडे आंबेठाणच्या शेतावर भेटण्यास आले. त्यांनी संगमनेरच्या त्यांच्या महाविद्यालयात मी भाषण देण्याकरिता यावे अशी विनंती केली. त्याबरोबरच त्यांनी, शेतकरी संघटनेने मांडलेल्या भांडवलनिर्मितीच्या सिद्धांताशी सुसंगत स्त्रियांच्या प्रश्नांची मांडणी मी करावी अशीही इच्छा व्यक्त केली. रावसाहेब कसबे हे स्वत: अनेक सामाजिक प्रश्नांवरचे जाणते समीक्षक आहेत. त्यांनी दिलेले हे निमंत्रण मी आव्हान म्हणूनच स्वीकारले. कारण, शेतकरी संघटनेने मांडलेल्या भांडवलनिर्मितीच्या सिद्धांताबद्दल मला इतका आत्मविश्वास होता की, त्याच्याशी सुसंगत अशी स्त्री-प्रश्नांची मांडणी करता येईल याची मला आतून खात्री वाटत होती. शिवाय, चार-पाच शिबिरांत स्त्रियांनी आपल्या मनातील खळबळ ऐकवून बांधून दिलेली शिदोरीही हाती होती.

१९८६ च्या फेब्रुवारी महिन्यात एक केवळ शेतकरी महिलांचे अधिवेशन भरवावयाचे ठरले होते. माझ्या दुर्दैवाने त्याच सुमारास म्हणजे १९८५ च्या डिसेंबरमध्ये मला हृदयविकाराचा पहिला झटका आल्यामुळे अधिवेशन पुढे ढकलावे लागले. ती इष्टापत्तीही ठरली. त्यामुळे सगळा मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्र पुन्हा सावचितपणे फिरून अधिक अभ्यास व अधिवेशनाचा प्रचार करण्याचे काम जमले.

या सर्व अभ्यासातून आणि आजारानंतरच्या विश्रांतीच्या काळातील चिंतनातून 'चांदवडची शिदोरी' या पुस्तिकेची निर्मिती झाली. 'चांदवडची शिदोरी'त दोन मुद्दे प्रामुख्याने मांडले होते. पहिला मुद्दा म्हणजे समाजवादी पद्धतीने मुलांसाठी पाळणाघर आणि सर्वांसाठी सामायिक रसोडे घालून स्त्रियांचा प्रश्न सुटणार नाही. स्त्रियांचा प्रश्न हा शेतीतील वरकड उत्पन्नाच्या लुटीतून सुरू झालेल्या रक्तबंबाळ युगातील एक अवशेष आहे. दुसरा मुद्दा असा की, अमेरिकन स्त्रीवाद्यांचे म्हणणे असे आहे की, 'पुरुष हा अधिक बलवान असल्यामुळे तो स्त्रियांवर सत्ता गाजवतो.' तसे म्हटले तर, स्त्रियांवर अत्याचार किंवा बलात्कार करू शकणाऱ्या पुरुषांची संख्या अत्यल्पच असते, पण अशा शक्यतेच्या भीतीने पुरुष स्त्रियांना घरात कोंडून ठेवत असावेत. पुढे माझा प्रतिवाद होता की, पुरुष हे अधिक बलवान नसून अधिक कमजोर आहेत. कारण, त्यांच्या जैविक स्वातंत्र्याच्या कक्षा फारच मर्यादित आहेत. याउलट, स्त्रियांना भावी आयुष्यात त्यांनी बजावयाच्या अनेकविध भूमिकांकरिता निसर्गानेच त्यांना जैविक स्वातंत्र्याच्या कक्षा अधिक व्यापक दिलेल्या आहेत. बलात्काराचा पुरुषांचा व्यवहारातील अनुभव तसा विरळाच. याउलट, शोषणाच्या अनेकविध लढायांत बायकांकडे आपल्या पुरुषांचे पौरुष जागते ठेवण्याची भूमिका आली आणि त्यामुळे त्यांनी आपल्या सामाजिक भूमिकेत तडजोड म्हणून योग्य ते बदल करून घेतले.

(पूर्वप्रकाशित-२०१३)

♦ ♦ ♦

शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!



श्री पुंडलिकराव येंगडे

आष्टोणा



Baba Ghavghave

Mob. 9860363160

7798309043

Venketesh Krishi & Machinery

Bazar Chowk, Sindhi Railway, Dist. Wardha

७ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास

हार्दिक शुभेच्छा...!



Coromandel

FUTURE POSITIVE

Raju T. Kapse

Assistant Manager marketing

७ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास

हार्दिक शुभेच्छा !

राठी ऑईल डेपो

कारंजा चौक, मेन रोड

हिंगणघाट जि. वर्धा

हा प्रश्न मराठी साहित्याला कधी पडेल?

वसुंधरा काशीकर



अध्यक्षीय भाषण

अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी आपण माझी निवड केली त्याबद्दल आयोजकांचे मनापासून आभार मानते. या पदासाठी माझा अधिकार काय.. माझी खरंच योग्यता आहे का.. याविषयी माझ्या मनात अनेक संभ्रम आणि शंका होत्या आणि आहेत. आदरणीय सरोजकाकू काशीकरांशी मी त्याबद्दल मोकळेपणाने बोलले होते परंतु त्यांच्या आग्रहाखातरच शेवटी ही जबाबदारी स्वीकारण्यासाठी मी होकार दिला. महान व्यक्तींच्या केवळ सहवासानेही तुमचं आयुष्य कसं उजळून निघू शकतं याचं प्रत्यंतर परत एकदा येतंय. आदरणीय शरद जोशींचा जो काही सहवास फार थोडया काळासाठी लाभला त्याचीच परिणती म्हणजे आजची ही जबाबदारी आहे. त्यामुळे हे पद स्वीकारताना माझ्या मनात 'मी तव हमाल भारवाही' ही पूर्ण जाणीव आहे. मी विनम्र आहे.

यवतमाळ जिल्ह्यातल्या राळेगाव तालुक्यातील रावेरी या गावाची सातव्या अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनासाठी निवड करण्यात आली याचे एक वेगळे महत्व आहे. केवळ भारतातलेच नाही तर संपूर्ण जगातले एकमेव असे सीतेचे मंदीर या रावेरी गावात आहे. रामाने सीतेचा त्याग केल्यावर लक्ष्मणाने गर्भार अवस्थेत सीतेला रावेरी या गावी आणून सोडले. लव-कुश यांचा जन्म इथेच झाला. तसेच लव-कुशांनी अश्वमेध घोडा इथेच अडवला अशी आख्यायिका आहे. भारतात ठिकठिकाणी रामाची मंदिरे आढळतात. पण सीतेचं मंदीर दिसत नाही. रामाच्या सोबतीने सीता, लक्ष्मण आणि हनुमानही येतात पण केवळ सीतेचे मंदीर मात्र रावेरी इथेच आढळते. साहित्यामध्येही इंग्रजीमध्ये अमिश यांनी सीतेवर लिहिले आहे. कर्णावर विपुल लिहिल्या गेलं पण वृषालीचा विचार कोणी केलेला दिसत नाही. मध्यंतरी कविता काणे यांनी वृषालीवर लिहिले आहे. थोडक्यात स्त्रियांची उपेक्षा इथेही संपत नाहीच.

शेतकरी संघटनेचे संस्थापक-नेते माननीय शरद जोशी यांनी २०१० साली या मंदिराचा जीर्णोद्धार केला. स्त्रिया आणि लहान मुलं यांच्याबद्दल शरद जोशींना अपार कणव होती. स्त्रिया आणि लहान मुलं यांचं दु:ख मला बघवत नाही. मला ते भाषेत मांडता येत नाही म्हणून मग मी संख्याशास्त्राचा आधार घेतो असं शरद जोशी म्हणायचे.

सीता ही परित्यक्ता स्त्रियांचं प्रतीक. म्हणून रावेरी या गावी परित्यक्ता स्त्रियांसाठी एक आधारगृह चालवावं अशीही त्यांची इच्छा होती. भारतात स्त्रिया, दलित आणि शेतकरी यांची स्थिती थोड्याफार फरकानं सारखीच आहे. तिघांच्याही वाटयाला कायमच उपेक्षा, शोषण आणि अन्याय आलेला आहे. त्या अर्थानं रावेरी या ठिकाणाची संमेलनासाठी निवड होणं हे प्रतिकात्मक आणि महत्वाचं आहे.

मराठी साहित्याचा अभ्यास केला तर असे दिसते की, मराठी साहित्यानं नगण्य म्हणता येईल अशी शेतकऱ्यांच्या दु:खाची व समस्यांची दखल घेतली आहे. काही अपवाद सोडले तर सर्वसामान्यपणे लेखकांचे, कवींचे लिखाणाचे विषय हे मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय, शहरी जीवनाचं चित्रीकरण करणारे दिसतात. ग्रामीण भागाचं चित्रीकरण आलं असलं तरी त्यात शेतकरी फारसा दिसत नाही.

ज्या काही थोड्या लेखकांनी त्यांच्या लिखाणातून शेतकरी जीवन व समस्यांचं चित्रण केलं आहे त्यांचा आढावा इथे घेणं मला गरजेचं वाटतं.

रवींद्र शोभणे यांची 'कोंडी' कादंबरीतून शेतमजुरांचं जीवन, त्यातली हतबलता, ग्रामीण संरजाम वृत्ती, स्वार्थांधता याचं वर्णन आलं आहे. शेषराव मोहिते यांची 'असं जगणं तोलाचं' ही कादंबरी शेती करणे म्हणजे भीषण गाळात रुतणे हे भीषण वास्तव मांडते. शेषराव मोहिते यांच्याच 'धुळपेरणी'मधील नायक म्हणतो, शेतीतल्या हिरवेपणाच्या भरवश्यावर सारे आयुष्य आलटून-पालटून गहाण ठेवावे आणि हे सर्व माहित असूनही आम्ही शेती करावी अशी तुमची अपेक्षा? तुम्ही आम्हाला काय येडझवे समजता की काय? याशिवाय तानाजी पाटील, प्रकाश देशपांडे, कैलास दौंड, कृष्णात खोत, प्रा. महेंद्र कदम यांच्या कादंबऱ्यांमध्येही शेतीचा प्रश्न केंद्रस्थानी आढळतो.

इंद्रजीत भालेराव यांच्या कविता, सदानंद देशमुख यांची 'बारोमास' यांचा उल्लेख करावाच लागेल. ही काही मोजकी उदाहरणं सोडलीत तर समाजातल्या इतक्या मोठ्या वर्गाविषयी साहित्याला काही घेणंदेणं दिसत नाही.

समाजाला काही विचार-मूल्य देणे, रंजन करणे आणि सामाजिक बांधिलकी हे साहित्याचे उद्देश मानले तर मराठी साहित्य त्या कसोटीवर कुठे उभे आहे याचा विचार करायला हवा. त्यातुलनेने हिंदी साहित्याचा विचार केला तर प्रेमचंदाच्या लिखाणात शेतकरी आणि सर्वहारा वर्गाच्या समस्यांचं आणि दु:खाचं चित्रण आढळतं. प्रेमाश्रम, कर्मभूमी व गोदान या तीन कादंबऱ्या त्याचं उत्तम उदाहरण आहे. शेतकरी जीवनाचा कोणताही पैलू या कादंबऱ्यांमध्ये अस्पर्श राहिलेला नाही. 'प्रेमचंद और उनका युग' मध्ये रामविलास शर्मा लिहितात, ''उन्होंने उस धडकन को सुना जो करोंड़ो किसानों के दिल में हो रही थी.

उन्होंने उस अछूते यथार्थ को अपना कथा विषय बनाया. जिसे भरपूर निगाह देखने का हियाव ही बड़ों-बड़ों को न हुआ था.''

हिंदीतले वरिष्ठ साहित्यिक संजीव यांनी विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर 'फाँस' नावाची कादंबरी लिहिली आहे. मात्र २००० सालापासून इतक्या मोठ्या प्रमाणावर शेतकरी आत्महत्या होत आहेत, त्यावर एकही मराठी कादंबरी लिहिल्या गेल्याचे माझ्या तरी ऐकिवात वा वाचनात नाही.

मराठी साहित्यिकांना हा विषय महत्वाचा वाटत नाही असा निष्कर्ष यातून काढावा का? हजारोंनी शेतकरी आत्महत्या करतात, त्यांची मुलं अनाथ होतात, उद्ध्वस्त होत चाललेली ग्रामीण अर्थ व शेतीव्यवस्था, तोटयातली शेती यावर साहित्यिकांची लेखणी का चालत नाही?. ज्येष्ठ कवी विठ्ठल वाघ यांनी म्हटलं होतं की, 'शेती आणि त्याच्याशी संबधिंत अर्थकारण, विषय यांचा अभ्यास साहित्यिकांनी करायला हवा व त्यावर लिहायला हवे'.

मुन्शी प्रेमचंद यांनी अखिल भारतीय प्रगतीशील लेखक संघांच्या अध्यक्षस्थानावरून भाषण करताना म्हटलं होतं की, ''शेतावर काम करुन घामाघूम झालेल्या स्त्रीला, आपल्या मुलाला बांधावर झोपवताना बघणं हा ही सौंदर्य अनुभव आहे. तुमच्या सौंदर्य दृष्टीचा विस्तार केला तर तुम्हाला केवळ सुंदर स्त्रीमध्ये सौंदर्याचा अनुभव येणार नाही. तर तुम्ही कष्टकरी महिलेच्या सुकलेल्या ओठांमध्ये आणि तिच्या गालावरच्या सुकलेल्या अश्रूंमध्ये त्याग, सहिष्णुता आणि कष्टाचे सौंदर्य बघू शकाल''.
सौंदर्यदृष्टीचा विस्तार करण्याचा हा विचार अतिशय मौलिक आहे.

इंग्रजीतील ज्येष्ठ नोबेल पुरस्कार विजेते भारतीय वंशाचे साहित्यिक व्ही.एस. नायपॉल हे भारतात आले होते तर नामदेव ढसाळ यांच्यासोबत मुंबईच्या रेडलाईट भागात रिक्षाने फिरले होते. नायपॉल यांची जीवन समजून घेण्याची ही तृष्णा मला विलक्षण वाटते ही तृष्णा आमच्या साहित्यिकांमध्ये का दिसत नाही? शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय काय आहे तो समजून घ्यावा, त्यासाठी त्या जिल्ह्यांना भेट दयावी, आत्महत्याग्रस्त कुटुंबाला भेट दयावी आणि त्यावर काही लिहावे असा विचार कोणाच्याही मनात का येऊ नये? हे दु:खद आहे. शरद जोशींनी म्हटल्याप्रमाणे, एका दाण्याचे हजार दाणे करणारा शेतकरी दरिद्री आणि एका किलोचं सव्वा किलोही लोखंड करू न शकणारा कारखानदार मात्र श्रीमंत हे काय गणित आहे हा प्रश्न साहित्यिकांना पडू नये?.

कवी धूमिल यांची एक कविता उस्त्रृत करण्याचा मोह मला आवरत नाहीये.

इतनी हरियाली के बावजूद
अर्जुन को नहीं मालूम
उसके गालों की हड्डी क्यों
उभर आई है।
उसके बाल
सफेद क्यों हो गए हैं।
लोहे की छोटी-सी दुकान में,
बैठा हुआ आदमी, सोना
और इतने बड़े खेत में खड़ा आदमी
मिट्टी क्यों हो गया है?

हा प्रश्न मराठी साहित्याला कधी पडेल?

म्हणूनच अखिल भारतीय शेतकरी संमेलनाच्या आयोजकांचा पिढ्यांनपिढ्यांच्या अबोलतेला बोलते करण्याचा हा प्रयत्न अत्यंत महत्वाचा आहे. या निमित्ताने का होईना पण जगाच्या पोशिंद्याच्या जीवनाबद्दल, हतबलतेबद्दल, वर्षानुवर्षांच्या दारिद्र्याबद्दल, सरकारच्या धोरणाबद्दल चर्चा घडेल... आणि काहीतरी बदल घडवणारे निर्माण होईल अशी आशा करूयात... ग्रंथसत्तेवर आणि लेखणीच्या ताकदीवर माझा अफाट विश्वास आहे. कार्ल मार्क्सच्या 'दास कॅपिटल'नेच जगातल्या मोठ्या क्रांत्या घडवून आणल्या होत्या... मराठी साहित्यालाही असे परिवर्तन घडवून आणण्याचे श्रेय मिळावे अशी प्रामाणिक इच्छा व्यक्त करते आणि माझे भाषण संपवते.

धन्यवाद!

– वसुंधरा काशीकर
vasundhara.rubaaigmail.com

♦ ♦ ♦

युगात्मा शरद जोशींचे स्मारक विदर्भात

शेती अर्थ प्रबोधिनीच्यावतीने युगात्मा शरद जोशींचे स्मारक विदर्भात उभारण्याचा संकल्प करण्यात आला आहे. कार्य अत्यंत अवघड असले तरी अशक्य कोटीतील अजिबातच नाही. एकमेकांचा हात हातात घेऊन अशक्य ते शक्य करून दाखवणे मुळीच अवघड नाही.

युगात्मा जोशींचे स्मारक म्हणजे त्यांच्या अपूर्ण स्वप्नांची पूर्तता करणारे आदर्श मॉडेल असेल. स्मारकाचे स्वरूप, रूपरेषा, आराखडा व नियोजन मे २०२१ मध्ये सादर केले जाईल. चला तर आज आपण सर्व मिळून संकल्प करूयात की आपल्याला एक वर्षाच्या आत आपण युगात्मा शरद जोशींच्या स्मारकाची पायाभरणी करावयाची आहे.

आपल्या सहकार्याच्या प्रतीक्षेत!

गंगाधर मुटे
अध्यक्ष शेती अर्थ प्रबोधिनी

शेतीसाहित्यात तंत्रज्ञान साक्षरतेची मुहूर्तमेढ रोवणारं संमेलन

सातवे अखिल भारतीय मराठी शेतकरी (आभासी) साहित्य संमेलन वृत्तांत



कव्हरस्टोरी



असं म्हणतात कि, अचानक आपत्ती कोसळल्यावर मनुष्य विचलित होतो. तो थांबतो. पुढे पडणाऱ्या प्रत्येक पावलागणिक आत्मविश्वासाची जागा, आपसूकच सावधानतेचा वेध घेताना चाल मंदावत जाते. अश्या काळात सावध राहणे, हिच एक गोष्ट त्याच्या आवाक्यात असते. आपण सर्व वर्षभर कोरोनाच्या आपत्तीने ग्रस्त व त्रस्त आहोतच. यात आपल्या आयुष्याचा नैसर्गिक तोल ढासळत गेलेला आहे. आता हे मान्यच करावे लागेल. पण काही माणसांची मुळं इतकी खोलवर रुजलेली असतात की, आपत्तीला इष्टापत्ती समजून ते त्या आपत्तीवर स्वार होतात आणि हे दृश्य इतकं भारावून टाकणारं असतं, की त्राण गेलेल्यांनाही ते संजीवक ठरावं, इतपत प्रेरणादायी काम उभं राहत असल्याच पाहून आपणही त्या नैसर्गिक तोल सावरण्याच्या दिशेने आत्मविश्वासाने पाउले टाकण्यास सज्ज होतो.

असंच काहीसं झालं, सातव्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाच्या निमित्याने. शेती अर्थ प्रबोधिनी व्दारे शिक्षण, साहित्य, आरोग्य, तंत्रज्ञान साक्षरता, शेतकरी स्वावलंबन, दत्तक योजना, निवासी प्रशिक्षण शिबिरे, शेतकरी मेळावे, परदेशी शेती अभ्यास दौरे, स्त्रीस्वावलंबन, असे विविधांगी उपक्रम, सामाजिक जाणिवेतून वर्षभर, स्थानिक पातळीवरून ते राज्यस्तरावर सातत्याने सुरू असते. त्यातील शेतकरी साहित्य चळवळीचा लोकाभिमुख उपक्रम म्हणून दरवर्षी साहित्य संमेलनाचे आयोजन केल्या जाते. आतापर्यंत पार पडलेली सहा संमेलने हि प्रामुख्याने, महाराष्ट्रातील भौगिलिक दृष्टया, अगदी पिकांच्याही वैविधतेने आपापल्या प्रांताचे वैशिष्ट्य जपत असलेल्या वेगवेगळ्या जिल्ह्यात, विशेषत: शहरी भागात पार पडली होती. यंदा प्रथमच संमेलनाचे आयोजन, ग्रामीण भागात नियोजित होते. युगात्मा शरद जोशी यांनी जीर्णोद्धार केलेलं भारतातील एकमेव सीतामातेचं मंदिर असलेल्या, जिल्हा यवतमाळ, राळेगाव तालुक्यातील रावेरी या छोट्याश्या गावात.

या संमेलनाची आखणी ही महिला सक्षमीकरण हा विषय केंद्रस्थानी ठेवून केलेली होती. ही प्रेरणा थेट युगात्मा शरद जोशी प्रणीत चांदवडची शिदोरी, लक्ष्मिमुक्ती चळवळीच्या मुळाशी जाताना दिसते. सर्वार्थाने वेगळं आणि प्रचंड उत्सुकता असलेलं मराठी साहित्य विश्वातील लक्षवेधी संमेलन. अगदी नियोजित तारखेच्या पंधरा दिवसापूर्वी कोरोना अरिष्ट्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात रद्द करून पुढे ढकलावे लागले.

खरं म्हणजे इथे सावध पवित्रा घेण्यात आलेला होता, जो सर्वार्थाने योग्य होता पण मी वर म्हटल्याप्रमाणे आपत्तीवर स्वार होवून, अगदी नियोजित तारखेपासून, पुढील सात दिवस, दररोज साधारण अडीच तासाचे एक सत्र, या स्वरूपात झूम प्रणालीचा अतिशय सक्षमपणे वापर करून, त्याचे प्रक्षेपण फेसबुक लाइव्हच्या माध्यमातून एकूण अठरा तास, पर्यायी संमेलन, वेबमिलन सप्ताहाच्या माध्यमातून, नियोजित कार्यक्रम पत्रिकेतील नव्वद टक्के भाग, तंत्रज्ञानाच्या मदतीने यशस्वीपणे पार पाडण्यात आला. महाराष्ट्रातील अनेक सन्माननीय प्रतिष्ठित संस्थानी आपली वार्षिक नियोजित संमेलने पुढे ढकलली असताना, कमीत कमी साधनात, प्रचलित तंत्रज्ञानाचा कल्पकपणे जास्तीत जास्त वापर करून पार पडलेले, सातवे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन, जिथे सातशे-आठशेच्या उपस्थितीत होणारे बंदिस्त सभागृहातील संमेलन, फेसबुक लाइव्हच्या माध्यमातून विश्वस्तरावर पोचल्याने, साहित्य विश्वात रोल मॉडेल ठरले आहे. या संमेलनाचे आयोजक कार्यवाह, निमंत्रक, तंत्रज्ञ अशी अष्टपैलू कामगिरी करणारे संमेलनाचे कार्याध्यक्ष श्री. गंगाधर मुटे सर यांनी अनेक तांत्रिक अडचणीवर मात करून असीम जिद्दीने संमेलन यशस्वी करून दाखविले आहे.

दिनाक २० मार्च २०२१ वेबमिलन सप्ताहाच्या प्रथम चरणात, दुपारी ११.०० वा नियोजित संमेलनाचे उस्त्राटन सत्र तांत्रिक अडचणीवर मात करीत सुमारे १ तास उशीराने सुरू झाले. उस्त्राटनसत्राच्या सूत्रसंचालिका प्रा. मनीषा रीठे यांच्या 'माती आणि माता! फरक वेलांटीचा! एक जन्म देते ! दुसरी कुशीत घेते' अश्या माती आणि मातेचं अव्दैत अधोरेखित करणाऱ्या शब्दांनी..! संमेलनाच्या उस्त्राटक ज्येष्ठ शेतकरी नेत्या आ. सरोजताई काशिकर यांच्यावतीने संमेलनाचे कार्याध्यक्ष श्री. गंगाधर मुटे यांनी दिपप्रज्वलन करून, ऑनलाईन वेबमिलन सप्ताहाचे उस्त्राटन केले. त्यानंतर श्री. गंगाधर मुटे लिखित 'अवनीवरती घाम गाळतो त्या देवाला नमन मी करतो' या गीतातून अखिल विश्वातील समस्त कष्टकऱ्याचा श्रमाला नमन करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. स्थानिक बालकांच्या सुश्राव्य सुराला वाद्यवृंदाची तेवढ्याच तोलमोलाची साथसंगत लाभल्याने वातावरण भारावून गेले.

उस्त्राटन सत्रातील आपल्या उस्त्राटकीय मनोगतात शेतकरी संघटनेच्या ज्येष्ठ नेत्या आ. सरोजताई काशिकर यांनी, सर्वप्रथम श्री. गंगाधर मुटे यांच्या, साहित्य चळवळीच्या समग्र कार्याचा

गौरव करून, शेतकऱ्याचं साहित्य नेमकं कसं असावं याचा घटनाक्रमानं बारकाईने अभ्यास करून युगात्मा शरद जोशीनी सुरुवात केली. पुढे तीच प्रेरणा घेऊन नव्या दमानं श्री. गंगाधर मुटेनी, शेतकरी साहित्य चळवळीच्या रूपाने केली. या संमेलनातून शेतीच अर्थशास्त्र, उद्योग साहित्य निर्माण व्हावं अशी अपेक्षा व्यक्त करून संमेलनास शुभेच्छा दिल्या.

आपल्या प्रास्ताविकरूपी बीजभाषणात संमेलनाचे कार्याध्यक्ष श्री.गंगाधर मुटे सरांनी, सुरवातीला गत सहा संमेलनाचा आढावा घेवून, रावेरी या ठिकाणाचे आध्यात्मिक महत्त्व सांगताना, ज्याप्रमाणे कुठलीही चूक नसताना रामायणकाळी सीतामातेस वनवास भोगावा लागला, उपेक्षीत जिणं नशिबी आले. त्याच प्रमाणे शेतकऱ्याचे जगण्यामरणाचे प्रश्नही कायम उपेक्षीतच राहीले. उपेक्षीतांच्या दुःखाकडे जगाचे लक्ष जावे, या ठिकाणा पासून प्रेरणा मिळाव्यात. शेतीच्या उपेक्षित प्रश्नाकडे जगाच लक्ष जावे, येथे यावे अन या अबोलतेला आपल्या लेखणीतून बोलतं करावं. पुढे शेतकऱ्यांच्या समस्या आणि साहित्य संमेलन आयोजनाचे औचित्य, यांचा सहसंबंध स्पष्ट करताना म्हणाले की, जो पर्यंत विचारांची दिशा बदलत नाही तो पर्यंत माणसांची वर्तवणूक बदलत नाही. समाजातील शेतकरी विरोधी समज बदलण्याकरीत साहित्य दुरुस्त करावे लागेल. मनुष्याची जडणघडण ही पुस्तकातून

शेतकरी- महीला गझल मुशायरा वृत्तांत

कोरोनाच्या वाढत्या प्रभावामुळे रावेरी, जि. यवतमाळ येथे होऊ घातलेले यावर्षीचे ७ वे अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन, वेब मिलन सप्ताह म्हणून सध्या आभासी/ ऑनलाईन सुरू असून त्याचे आज सोमवार, २२ मार्च २०२१ ला तिसऱ्या दिवशी तिसरे पुष्प 'शेतकरी - महीला' गझल मुशायऱ्याच्या रूपाने गुंफल्या गेले. झूम ऍप मीटिंग व फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून साकारण्यात आलेला आजचा हा गझल मुशायरा खरेच खूप आनंद देऊन गेला कारण तो साक्षात मंचावर होत आहे की काय असा जाणवला.

गझल मुशायऱ्याची सुरुवात शेतकरी चळवळीचे कार्याध्यक्ष मा. गंगाधर मुटे यांच्या प्रास्ताविकाने तर शेवट हा मुशायऱ्याच्या अध्यक्षा मा. चित्राताई कहाते यांच्या अध्यक्षीय भाषणाने झाला. सदर गझल मुशायऱ्याचे सूत्रसंचालन पुण्याच्या मा. प्राजक्ता पटवर्धन यांनी आपल्या चिरपरिचित अशा गोड आवाजाने अतिशय प्रभावीपणे सांभाळले. मुशायऱ्यात अनेक प्रसिद्ध तसेच मातब्बर गझलकारांनी आपल्या गझला सादर केल्या.

मुशायऱ्याचा आगाज परभणीचे महेशहोनमाने यांच्या किती दिवस हो रोज मरावे शेतकऱ्यांनी? मरण्यापूर्वी किती जळावे शेतकऱ्यांनी? या शेराने झाला. त्यानंतर मग एकशे एक शेर सरशी शेर येऊन धडकू लागले. हिंगणघाटाचे मा. प्रदीप थूल यांनी घरच्या घरीच राहून खळगी भरू कशी मी? बंदीत सांग माझी शेती कशी करू कशी मी? या आपल्या शेराने श्रोत्यांच्या मनाचा जणू ताबाच घेतला. त्यानंतर आलेले अकोल्याचे निलेश कवडे यांच्या आत्महत्येने बळीची जिंदगी गेल्यावरी, कोणत्या चौकात सांगा मेणबत्ती लागते? या शेराने श्रोत्यांना अंतर्मुख करून सोडले. धिरजकुमार ताकसांडे यांच्या शेरांनी मग मोर्चा महिला-विश्वाकडे वळवला. त्यांचा हा शेर, इतिहास सांगतो हा दास्यातल्या स्त्रीयांना, वापर तुझा इथे हा होतो धना प्रमाणे! मुशायऱ्यात महिला कैफियतेची पायाभरणी करून गेला. त्यानंतर आलेल्या हिंगणघाटच्याच डॉ. रविपाल भारशंकर यांच्या शेरांनी तर महिला मुक्तीचा जणू कळसच उभा केला. त्यांचा हा शेर, स्त्री -हीच देत असते वरदान जीवनाचे, सामर्थ्य अन्यथा हे देवादिकात नाही. जबर दाद घेऊन गेला.

त्यानंतर आलेले परभणीचे आत्माराम जाधव यांच्या शेरांनी मोर्चा पुन्हा शेतकऱ्यांकडे वळवला. त्यांचा हा शेर, खाऊन फस्त केले शेतास कुंपणाने, गावात या लुटीची हळहळ नवीन आहे खूप टाळ्या घेऊन गेला. त्यानंतर आलेले परभणीचेच यशवंत म्हस्के यांनी पाणगळीचे दिवस तरीही फुल पाहून मी रमतो आहे. ही गझल सादर केली. औरंगाबादचे गिरीशकुमार जोशी यांनी पिकल्यात आत्महत्या पाऊस आटल्याने, करतो म्हणून आम्ही धिक्कार पावसाचा. या भन्नाट शेराने आपली गझल संपवली. नांदेडचे बापू दासरी यांचे हा शेर, हृदयावरती या श्वासांची खूप उधारी, फेडत फेडत स्पंदन झाले काल फरारी. हळुवार अनुभूती देऊन गेला. बदीउज्जमा बिरासदार, सोलापूर त्यांनी आपल्या मोठं मोठी नोकरी नाकारली मी, जिंदगी स्वप्नातली साकारली मी या शेराने मुशायऱ्यास वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले. त्यानंतर साताऱ्याचे महेश मोरे, ईश्वराबद्दल नका सांगू मला, माणसाला माणसाची द्या हमी. ही गझल घेऊन आले. नागपूरचे अजिज खान पठाण क्वारंटाईन असतानाही कनेक्ट झाले. त्यांनी जरी सुगी वा हा नको हंगाम आता, द्या कुणी दिल्लीस हा पैगाम आता ही गझल सादर केली. सुत्रसंचालिका मा. प्राजक्ता पटवर्धन, यांनी गाऊ नको जराही गुणगान पावसाचे, बाहेर बघ जरा तू थैमान पावसाचे ही गझल, तर मा. गंगाधर मुटे यांनी लाजून पाहिले ना रोखून पाहिले, तुज ग्रंथाप्रमाणे वाचून पाहीले ही गझल सादर करून मुशायरा शेवटास नेला.

शेवटी मुशायऱ्याच्या अध्यक्षा मा. प्रा. चित्रा कहाते नागपूर यांनी डोळ्यातल्या व्यथांचे हे अर्थ वेगळे, असतात आसवांचे संदर्भ वेगळे ही गझल सादर करून व सर्व गझलकारांना दाद देऊन मुशायऱ्याच्या समारोपास हिरवी झेंडी दिली.

- डॉ. रविपाल भारशंकर

होत असते. त्या अनुषंगाने शेतकरीवर्गाचं, खरंखुरं प्रतिबिंब प्रामाणिकपणे साहित्यातून मांडण्यात यावं. उगाच कल्पना विश्वात रममाण होवून आभाशी काव्यकल्पनातून खरं दुखणं कधीही मांडल्या जाऊ शकत नाही. किंबहुना ते शेतकऱ्यांना कोणताही न्याय देऊ शकणार नाही. कारण ते दुख: मानवनिर्मित आहे. आज समाजात विविध वडिलोपार्जित व्यवसायात, नोकरीत युवा पिढी स्वेच्छेने सामील होताना दिसते. मात्र शेतकऱ्याचा मुलगा, शेतकरी होण्यास नकार देते. त्याची मानसिकताच शेतीविरोधी झाल्याचे वास्तव प्रकर्षाने दिसून येते. आज खेड्याची स्थिती ही रस काढून घेतलेल्या चोथ्या सारखी झालेली आहे. गावात राहायला कुणीही तयार होत नाही. गावातील जातिवंत प्रतिभा शहराचा आश्रय घेताना दिसत आहे. गावात राहतो तो फक्त शेतकरी. यातून त्याच्या वाट्याला चांगलं उत्तम असं काहीही येत नाही. अगदी आज शेतकऱ्याच्या मुलास कुणी मुलगी द्यायलाही तयार होत नाही. हे जळजळीत वास्तव आहे. अश्या मूलभूत समस्या साहित्यात आल्या पाहिजेत.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याबाबत एक महत्त्वाचे भाष्य नोंदविताना दंभस्पोट करीत श्री मुटे सर म्हणाले की, भारताला स्वातंत्र्य का मिळाले पाहीजे? या प्रश्नावर खुद्द महात्मा गांधींनी दिलेले उत्तर हे लटिकेपणाच उदाहरण आहे. कारण इंग्रज भारताला लुटतात म्हणून देश गुलामीत गेला. यावर विस्तृतपणे भाष्य करताना म्हणाले की, गुलामीच्या काळात व्यापाऱ्यांना आडकाठी नव्हती. नोकरदारांनाही फुकटात वापरून घेण्यात येत नव्हतं. सेवेचा मोबदला वेतनाच्या स्वरूपात मिळतच होता. मग लूट नेमकी कुणाची होत होती? तर कच्च्या मालाची, शेतीची, शेतीत केलेल्या गुंतवणूकीची, श्रमाची, पर्यायाने इथल्या कष्टकरी शेतकऱ्याची, पोशिंद्याची. इथला कच्चा माल विदेशात नेऊन त्यावर संस्कार करून पुन्हा तो इथे चढ्या दराने विकल्या जात असे. मग गुलाम कोण होते? तर शेतकरी. आज स्वातंत्र्यानंतरही ही लूट अव्याहतपणे वेगवेगळ्या माध्यमातून होत आहे. या सर्व विषयावर जो पर्यंत वस्तुनिष्ठपणे मंथन होत नाही, तो पर्यंत वैचारिक अमृत निघणार नाही. त्या करीत वास्तव साहित्य निर्मितीसाठी संमेलनाची आवश्यकता आहे. अतिशय परखडपणे शेतीतील वास्तव आपल्या घणाघाती प्रहाराने मुटे सरांनी

पहिल्या शेतकरी - स्त्री कवी संमेलनाचा वृत्तांत

कोरोनाच्या वाढत्या प्रभावामुळे रावेरी, जि. यवतमाळ येथे होऊ घातलेले यावर्षीचे ७ वे अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलन हे प्रत्यक्षात होऊ शकले नसून त्यास पर्याय म्हणून आभासी/ ऑनलाईन पद्धतीने झूम व फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून सुरू असलेल्या 'वेब मिलन सप्ताहाचे' आज दिनांक २१/०३/२०२१ ला दुसरे पुष्प 'शेतकरी – महीला' कवी संमेलन गुंफण्यात आले. झूम मीटिंग व फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून साकारण्यात आलेले हे कवी संमेलन श्रोत्यांना खरेच खूप आनंद देऊन गेले व ते साक्षात मंचावर होत आहे की काय असे जाणवले. सदर कवी संमेलनाला अध्यक्ष म्हणून अनुपमा जाधव तर सूत्रसंचालक म्हणून कुमारी लक्ष्मी बल्की हे लाभले.

भूषण तांबेकर (ठाणे) यांच्या शेतकरी आंदोलन आणि कृषी कायदा या अत्यंत सुंदर अशा कवितेने सुरू झालेल्या सदर कवी संमेलनात अध्यक्षांसह ऐकून नऊ कवींनी आपल्या बहारदार रचना सादर करून अक्षरशः श्रोत्यांची मने जिंकली. हिंमत ढाळे (अकोला) यांनी, आठवण ही कविता सादर करून लहानपणी घरी असलेल्या पारिवारिक एकोप्याची जाणीव करून दिली. व त्या आठवणींनी कसा आजही अंगावर काटा येतो अशी मार्मिक भावना आपल्या कवितेतून व्यक्त केली. त्यानंतर आलेल्या तुळशीराम बोबडे (अकोला) यांनी, महिला विश्व विषयक सादर केलेल्या आपल्या कवितेतून जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आपण केवळ बोलतो पण कृती मात्र काहीच करत नाही असे सांगितले.

त्यापाठोपाठ आलेल्या तेजस आंबाखाये (यवतमाळ) या वयाने अतिशय तरुण असलेल्या कवीने शेती आणि शेतकऱ्यांच्या जीवनाविषयी त्याला पडलेले प्रश्न आपल्या कवितेतून मांडले. डॉ. सुनील पखाले (वर्धा) यांनी, टीस या आपल्या कवितेतून 'हाताच्या फोडावाणी मायी वाढवली पोरं, आता गिधाड नजरेचा लागला जिवाला या घोरं, या ओळी सादर करीत आपल्या मनाची अस्वस्थता उपस्थित केली. ऍड. सुशांत बारहाते (हिंगणघाट) यांनी, संकटांशी लढण्यासाठी आता मी तैय्यार आहे, असे सांगणारी धाडसी वृत्तीची, साथ अपेक्षित आहे ही कविता सादर केली. त्यानंतर आलेल्या संदीप धावडे (वर्धा) यांनी, शेतकऱ्यांच्या जीवनावर एक भन्नाट कविता सादर केली. घे पोट्ट्या घे, ते सरकीचं पाकीट घे.. घ्या दोन दोन सासं, अन पेरा आपलेच श्वासं या त्यांच्या ओळी श्रोत्यांच्या अंतरंगात कोलाहल मचवून गेल्या.

त्यानंतर सुत्रसंचालिका कुमारी लक्ष्मी बल्की (यवतमाळ) यांनी, बाप – अश्रू ही आपली कविता सादर करून श्रोत्यांच्याही नयनात पाणी आणलं. शेवटी साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष मुटे सरांनी, सच्चे दिन म्हणता म्हणता लुच्चे दिन आले, अन् शेतमालाचे भाव तमाम लंबेलाट झाले ही आक्रोश – पूर्ण कविता सादर केली व सदर कवी संमेलनाची यशस्वी सांगता झाली.

सदर कवी संमेलनाच्या अध्यक्षा, अनुपमा जाधव (पालघर) या तांत्रिक अडचणींमुळे कार्यक्रमात भाग घेऊ शकल्या नाहीत.

– डॉ. रविपाल भारशंकर

प्रास्ताविकातून संमेलनाची भूमिका मांडली.

संमेलनाध्यक्ष आदरणीय वसुंधरा काशिकर आपल्या संमेलनाध्यक्षाच्या मनोगतातून, सर्वप्रथम युगात्मा शरद जोशीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना, त्यांच्या परीसस्पर्शातून मिळालेल्या वैचारिक ताकतीनेच आज मला संमेलनाध्यक्ष पदाचा मान मिळत असल्याचे नमूद केले. पुढे साहित्यात स्त्री ही पुरुषाच्या तुलनेत कायम उपेक्षीत राहिलेली आहे. पुरुषावर विपुल प्रमाणात साहित्य निर्मिती झालेली आहे. अगदी रामायण महाभारत कालीन कर्ण, लक्ष्मण, यांच्या तुलनेत वृषाली उर्मिला ह्या उपेक्षितच राहिलेल्या आहे. शेतकरी साहित्यातही, रवींद्र शोभणे, शेषराव मोहिते, प्रकाश देशपांडे, तान्हाजी पाटील, सदानंद देशमुख, कृष्णात खोत, इंद्रजित भालेराव, कैलास दौड, महेंद्र कदम असे सन्माननीय अपवाद वगळता फारसे लेखन झालेले नाही. त्यामानाने हिंदी साहित्यात विपुल प्रमाणात लेखन झाल्याचे निरीक्षण नोंदविताना, मुंशी प्रेमचंद यांच्या, प्रेमाश्रय, गोदान, कर्मभुमी या साहित्यकृती मधून शेतकरी जीवनाच्या सर्वच पैलूवर फार बारकाईने लेखन करण्यात आलेले आहे. मैथिलीशरण गुप्त यांच्या कविता, संजिव यांच्या फास या कादंबरीत शेतकरी आत्महत्येचे वास्तव मांडले आहे. धुमिल याच्या कवितेतून व्यवस्थेला प्रश्नांकित केल्या गेले. असे आपल्या साहित्यात का होत नाही हा मोठा प्रश्न आहे. सन नंतर २००० नंतर शेतकरी आत्महत्येवर एकही कादंबरी लिहिली गेली नसल्याचे निरीक्षण नोंदविले. संमेलनास शुभेच्छा दिल्या.

उस्त्राटन सत्रात संमेलनाचे संयोजक आ. बाळासाहेब देशमुख, विश्वस्त सीतामंदीर रावेरी आणि कवयित्री लक्ष्मी बल्की प्रामुख्याने उपस्थित होते. सत्राची सांगता मा. राजेंद्र झोटिंग याच्या आभार प्रदर्शनाने झाली.

*****

दिनांक २१ मार्च रोजी व्दितिय चरणात, ऑनलाईन कवी संमेलन, पालघर येथील प्रसिद्ध कवयित्री आ.अनुपमा जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या सत्राचे प्रभावी सूत्रसंचालन कवयित्री लक्ष्मी बल्की यांनी केले.

दिनांक २२ मार्च रोजी तृतीय चरणात, ऑनलाईन शेतकरी मुशायरा, नागपूर येथील येथील प्रसिद्ध गझलकार कवयित्री आदरणीय चित्रा कहाते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या सत्राचे अभ्यासपूर्ण सूत्रसंचालन गझलकारा आदरणीय प्राजक्ता पटवर्धन यांनी केले. एरवी कुठल्याही व्यासपीठावर आयोजित न होणारा, केवळ शेतकरी गझल मुशायरा, ही अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य चळवळीने जपलेले वेगळेपण नेहमी उत्सुकतेचा विषय ठरत आलेलं आहे.

दिनांक २३ मार्च रोजी चतुर्थ चरणात, ऑनलाईन शेतकरी

दुसऱ्या शेतकरी - स्त्री कवी संमेलनाचा वृत्तांत

कोरोना अरिष्टामुळे सध्या झूम मीटिंग व फेसबुक लाइव्ह अशा माध्यमातून सुरू असलेल्या सातव्या अ. भा. मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे आज मंगळवार, २३ मार्च २०२१ रोजी चौथे पुष्प शेतकरी – स्त्री कवी संमेलन या रूपाने गुंफण्यात आले. सदर कवी संमेलनाला अध्यक्ष म्हणून चंद्रपूरचे मा. प्रदीप देशमुख तर सुत्रसंचालिका म्हणून वर्धेच्या मा. जयश्री कोटगीरवार या लाभल्या होत्या..

नाशिकचे रवींद्र दळवी यांच्या कालचा बापू आज ऐकत नाही बापाचं, रोज सांगते मले कास्तकार नाही बनायचं. या कवितेने सुरू झालेल्या सदर कवी संमेलनात अध्यक्षांसह ऐकून सोळा कवींनी आपल्या बहारदार रचना सादर करून अक्षरशः श्रोत्यांची मने जिंकली. नरेंद्र गंधारे (हिंगणघाट) यांनी, जराशे हितगुज तुमच्याशी ही कविता सादर करून स्त्री विश्व मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यानंतर संजय कावरे (मंगरूळपीर) यांनी माया कायजाची राणी, काहून डोया आलं पाणी, सचिन शिंदे (यवतमाळ) यांनी, पातीवरल्या बाया तुडवतात रानवाट दुःखाची, निलेश तुर्के (यवतमाळ) यांनी परतीच्या पावसानं सारं गेलं वाया, अनुपमा जाधव (पालघर) यांनी रानातलं पीक बघून शेतकरी सुखावला, संगीता घुगे (नांदेड) यांनी, घन ओथंबून आले. दिलीप भोयर (अमरावती) यांनी पुढारी कसे झाले हे येडपट, भाव देऊ म्हणे दिडपट, या स्वरूपाच्या अतिशय अशा प्रभावी कविता सादर केल्या. त्यानंतर आलेले रत्नाकर वानखेडे (अमरावती) यांचा ऑडिओ काहीसा क्लिअर ऐकता आला नाही परंतू त्यांनी देखील खूप सुंदर कविता सादर केली. प्रज्योत देशमुख (अकोला) यांची खरीपात केला लाल, आता रब्बीवर डोया ही कविता खरंच भाव खाऊन गेली. त्यानंतर आलेले राजेश अंगाईतकर (यवतमाळ) यांनी कसाई नेतो आहे आमचे बांधून चारही पाय, सांगा मालक आम्ही असं चुकलो तरी काय ही अतिशय भावुक करून टाकणारी कविता सादर केली. नारायण निखाते (तळेगाव) यांनी पाणी अडवा पाणी जिरवा, सूत्रसंचालिका जयश्री कोटगीरवार यांनी मी नव्या जगाची कैवारी, कार्याध्यक्ष गंगाधर मुटे सरांनी, सच्चे दिन म्हणता म्हणता लुच्चे दिन आले, शेतमालाचे भाव तमाम लंबेलाट झाले ही कविता सादर केली.

सदर कवी संमेलनाचे अध्यक्ष प्रदीप देशमुख यांनी शेवटी दिलेल्या आपल्या अध्यक्षीय भाषणात सर्व सहभागी कवींना अधोरेखित करून त्यांनी सादर केलेल्या रचनांचा सुरेख मागोवा घेतला. तसेच, होती गोटाळ्याची तरी वाट पांदनीची व हजार बंध तोडूनी लखाख दामीनीपरी या आपल्या बहारदार अशा रचना सादर केल्या व आजच्या या कवी संमेलनाच्या समारोप झाला.

– डॉ. रविपाल भारशंकर

कवी संमेलन, चंद्रपूर येथील येथील प्रसिद्ध कवी आदरणीय प्रदीप देशमुख सर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या सत्राचे बहारदार सूत्रसंचालन वर्धा येथील प्रसिद्ध कवयित्री प्राचार्या जयश्री कोटगीरवार यांनी केले.

दिनांक २४ मार्च रोजी नियोजित वेळेत पाचव्या चरणात, होणारे सत्र सायंकाळी ७ वा. घ्यावे लागले. दिनांक २३ च्या रात्री संमेलनाचे मुख्य प्रक्षेपण स्थळ छोटी आर्वी येथे, वादळी वाऱ्यासह पाऊस पडल्याने, वीज पुरवठा खंडीत झालेला होता. परिणामी संगणक, मोबाईल इत्यादी साधने विजेअभावी बंद पडल्याने नियोजित वेळेत सत्र सुरू करणे शक्य झाले नाही. म्हणजे येथेही निसर्गाने आपली करामत दाखविली होती. या अवकाळी परिस्थितीशी जुळवून घेत निसर्गाचा कौल स्वीकारत सत्र सायंकाळी ७.०० वाजता सुरू करावे लागले. 'शेतीसाहित्यातील बदलते प्रवाह' या विषयाच्या अनुषंगाने आयोजित परिसंवादात, पहिले पुष्प गुंफताना, प्रा. डॉ. दिलीप बिरूटे सरानी, शेतीसाहित्यातील बदलते प्रवाह या विषयाची मांडणी करताना, साहित्य हा समाज जीवनाचा आरसा असल्याने त्याचे प्रतिबिंब साहित्यात पडणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले. नांगर आणि नांगरी या दोन प्रमुख संस्कृती मधील अंतःप्रेरणांची ओळख करून देऊन मराठी साहित्यातील दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, संत साहित्य, ग्रामीण साहित्य अश्या विविध प्रवाहाचा परिचय करून देताना त्यांच्या प्रेरणांची

तिसऱ्या शेतकरी - स्त्री कवी संमेलनाचा वृत्तांत

युगात्मा शरद जोशी विद्यानगरी, भूमिकन्या सीताकुटी, रावेरी ता. राळेगाव जिल्हा यवतमाळ येथील नियोजित असलेले सातवे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन कोरोणाच्या सार्वत्रिक वाढलेल्या प्रादुर्भावामुळे कोरोणा अरिष्ट पर्यायी ऑनलाईन वेबमिलन सप्ताहाच्या माध्यमातून यशस्वीरीत्या नुकतेच पार पडले आणि याचे सर्व श्रेय आहे कार्याध्यक्ष श्री. गंगाधरजी मुटे सर यांना जाते. त्यांचे अथक परिश्रम व मेहनतीचे आणि त्यांच्या शिस्तबद्ध नियोजनाचे फलित म्हणजेच यशस्वी आणि उत्तमरीत्या पार पडलेला हा ऑनलाईन वेबमिलन सप्ताह सोहळा होय. दिनांक २० मार्च २०२१ रोजी सुरू झालेल्या या वेबमिलन सप्ताहाचा समारोप दिनांक २६ मार्च २०२१ रोजी झाला. सातव्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाच्या या ऑनलाईन वेबमिलन सप्ताहाच्या सहाव्या चरणामध्ये म्हणजेच गुरुवार, दि. २५ मार्च २०२१ रोजी तिसऱ्या शेतकरी कवी संमेलनामध्ये शेती मातीशी व स्त्री जातीशी निगडित अप्रतिम कवितांनी रसिक श्रोत्यांची दाद मिळविली.

या कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी पालघर येथील सुप्रसिद्ध कवयित्री सौ.अनुराधाताई धामोडे या होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून माननीय गंगाधरजी मुटे सर उपस्थित होते. या कवी संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक श्री. अनिकेत जयंतराव देशमुख, गोपालखेड, जिल्हा अकोला यांनी केले. झूम मीटिंग व फेसबुक लाइव्ह या ऑनलाईन माध्यमातून हे कवी संमेलन पार पडले.

नमो मायभाषा! जयोस्तुते मराठी!
तुझे शब्द सान्निध्य माझे ललाटी
जडो ध्यास हा छंद व्यासंग बोली
घडो हे समस्ता! नमो मायबोली..!!

विवेक मुटे, तेजू कोपरकर व स्वरा पोहाणे या बालकलाकारांनी आपल्या गोड गळ्यातून सादर केलेल्या या मराठी भाषेच्या स्तवनाने या शेतकरी कवी संमेलनाच्या तिसऱ्या सत्राला सुरुवात झाली. आपल्या सुमधुर आवाजामध्ये त्यांनी हे अप्रतिम गीत सादर केले.

आता तयार व्हावे लढण्यास लेखणीने, रक्षण अबोलतेचे करण्यास लेखणीने
न्यावा शिवारराणी जागर सरस्वतीचा, इडापिडा अव्यक्ती पुरण्यास लेखणीने

अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनात पंचप्राण फुंकणाऱ्या वरील ओळींनी सूत्रसंचालक श्री.अनिकेत देशमुख यांनी या कविसंमेलनाचा आगाज केला. सर्व उपस्थित मान्यवर व निमंत्रित कवींचे शब्दसुमनांनी स्वागत करून त्यांनी या कवीसंमेलनाची सुरुवात केली. अमरावती येथील सुप्रसिद्ध वऱ्हाडी कवी श्री.खुशाल गुल्हाने यांनी आपली गारपीट ही कविता सादर केली.

अवकाण्या पाण्यासंग गारपीटही आलं, अंबदातं ईचिबिहिण भलकसंच झालं या त्यांच्या विनोदी कवितेतून त्यांनी शेतकऱ्यांच्या जीवनामधील विदारक स्थितीचे आणि प्रशासनाच्या विचित्र कारभाराचे वर्णन केले. त्यांच्या कवितेने या कवीसंमेलनाची दमदार सुरुवात झाली. त्यानंतर चांदवड नाशिक येथील सुप्रसिद्ध कवी रावसाहेब जाधव यांनी आपल्या माणसासाठी कणसात दाना या कवितेने विचार करण्यास भाग पाडले. बुरखा ओढुनी निजती नगरे, माणुसकीने टाकल्या माना, माती मात्र जपते अजून, माणसासाठी कणसात दाना या भावगर्भ ओळींनी त्यांनी मातीची आणि शेतीची व्यथा आपल्या शब्दात मांडली.

त्यानंतर परभणी येथील कवयित्री विद्याताई लटपटे यांनी लगीन ही कविता सादर केली. व त्यातून आत्महत्या केलेल्या शेतकरी बापाच्या मुलीची व्यथा मांडली व आत्महत्या हा संकटांवरचा पर्याय नाही हे आपल्या कवितेतून सांगितले. त्यानंतर परळी बीड येथील कवी लक्ष्मण लाड यांनी आपल्या कोरोणातही दिला हात या कवितेने सध्याच्या वास्तव परिस्थितीचे चित्रण

केले. धान्य दूध भाजीपाला घरोघरी पुरविला. ''केली ना जीवाची फिकीर नमन या हिमतीला'' या ओळीतून त्यांनी हे चित्र रेखाटले. त्यानंतर परळी बीड येथील कवी केशव कुकडे मुक्तविहारी यांनी सुद्धा हाच धागा पुढे नेत कोणी पेरलेत हे विषाणू ही मार्मिक रचना सादर केली व ओल्या कोरड्या दुष्काळातही खंबीर राहून जगाला पोसण्याची ताकद फक्त शेतकऱ्यातच असते हे त्यांनी आपल्या कवितेतून मांडले.

त्यानंतर परळी बीड येथील कवी दिवाकर जोशी साळेगावकर यांनी गदिमांच्या सैनिक हो तुमच्यासाठी या गीतावर आधारित कृषकहो तुमच्यासाठी हे विडंबन गीत सादर केले. 'खादीधारी महोदय यांचा घास रोज अडतो ओठी, कृषकहो तुमच्यासाठी, श्रमिक हो तुमच्यासाठी' अशा प्रकारे त्यांनी फटकारे मारले. बीड येथील कवी सिद्धेश्वर इंगोले यांनी आपल्या बाप या कवितेतून बाप मातीशी बोलतो, माये रुसू नको अशी थांब ढगांशी भांडतो, कुठे दडला आकाशी या शेती मातीशी नातं सांगणाऱ्या कवितेतून बापाची तळमळ मांडली. त्यानंतर घाटनांदुर अंबाजोगाई जिल्हा बीड येथील कवी दत्ता वालेकर यांनी आपल्या बळीराजा या 'काळ्या मातीत राबतो साऱ्या जगाचा पोशिंदा, राबराब राबूनिया काढी मातीचा कशिंदा' या कवितेतून बळीराजाचं जगणं मांडलं. परळी येथील कवी बालाजी कांबळे यांनी आपल्या शेतकरी बाप या कवितेतून साऱ्या जगाचा पोशिंदा कसा रात्रंदिवस काबाडकष्ट करत असतो हे आपल्या गोड आवाजातून मांडले. 'भेगाळल्या पायांमध्ये दिसतो जगाचा नकाशा, धूळ पेरणी करून फुलवितो शिवार'' या त्यांच्या ओळी वास्तव रेखाटणाऱ्या होत्या.

सुप्रसिद्ध कवी संजय आघाव, बीड यांनी आपल्या बाप या कवितेने धीरगंभीर वातावरण तयार केले. ''उसा इतकाच गोड बाप, रसा सारखा दाता झाला, जगाला देऊन गोडी, स्वतः मात्र चोथा झाला बापाच्या डोळ्यातील ओलं चैतन्य टिपणारी त्यांची रचना काळजात घर करून गेली. त्यानंतर राजेश जौंजाळ हिंगणघाट यांनी प्रश्न ही कविता सादर करून नवजात पाखरांचे जळत शव होते, स्पर्शून त्या धुराला रडत नभ होते या ओळीतून भ्रूणहत्या प्रश्नावर बोट ठेवले. रत्नाकर वानखडे, अमरावती यांनी महागाईवर भाष्य करणारी आपली महागाईचा फुगा ही रचना सादर केली.

अशा प्रकारे सर्व उपस्थित निमंत्रित कवींच्या कवितांनंतर सलग पावणेदोन तास या शेतकरी कविसंमेलनाचे आपल्या खुमासदार शैलीत बहारदार सूत्रसंचालन व निवेदन करणारे प्रसिद्ध कवी पाऊलखुणाकार या नावाने सुपरिचित असलेले गोपालखेड, जिल्हा अकोला येथील श्री. अनिकेत जयंतराव देशमुख यांना कविता सादर करण्यासाठी प्रमुख अतिथी गंगाधरजी मुटे सर यांनी निमंत्रित केले. त्यांनी मातृत्वाची महती सांगणारी आपली अष्टाक्षरीतील रचना माय ही कविता सादर केली. ''माय कस्तुरीचा गंध, जीवनाचे या सार की, बाप हिमालय माझा, माय सह्याद्री सारखी'' या त्यांच्या गोड आवाजातील ओळी रसिकांच्या काळजात घर करून गेल्या.

काही तांत्रिक अडचणीमुळे या कवीसंमेलनाच्या नियोजित अध्यक्षा अनुराधाताई धामोडे पालघर ह्या शेवटी उपस्थित नसल्यामुळे अध्यक्षीय समारोप अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य चळवळीचे कार्याध्यक्ष माननीय गंगाधरजी मुटे सर सुप्रसिद्ध गझलकार व कवी यांच्या काव्यरचनेने झाला. त्यांनी आपली सडेतोड रचना आपल्या खास आवेशपूर्ण शैलीमध्ये सादर केली.

बायल्यावानी कायले मरतं? मर्दावाणी मर, सरणावरून ऊठ आणि मशाल हाती धर शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये नवचैतन्य फुलवणारी व त्यांना लढण्याचा नवा संदेश देणारी आपली सडेतोड रचना मुटे सरांनी सादर केली. आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये त्यांनी या कवीसंमेलनामध्ये सहभागी झालेल्या सर्व कवींचे अभिनंदन केले तसेच सर्वांना शेती मातीशी निगडित प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या लिखाणासाठी शुभेच्छाही दिल्या. अध्यक्षांच्या परवानगीने झूम मीटिंग व फेसबुक लाइव्ह या ऑनलाईन माध्यमातून पार पडलेल्या या कवी संमेलनाचा समारोप झाला.

– श्री.अनिकेत जयंतराव देशमुख

उगमस्थाने, या बाबत विस्तृत विवेचन केले, प्रत्येक प्रवाहाने साहित्याची उत्तमपणे हाताळणी केलेली असल्याचे सांगीतले. बिरूटे सरांनी विषयाच्या अनुषंगाने स्वातंत्र्यापूर्वी आणी स्वातंत्र्यानंतर अशी दोन भागात आपल्या एकूण विवेचनाची मांडणी केली. प्राचीन काळात अडीच हजार वर्षापूर्वी हाल निर्मित गाथासप्तशती मधून गाव शेती माती मानवी सहसंबधातून, शेती जाणिवा उद्धृत झालेल्या आहेच. पुढे महानुभाव संप्रदाय, संतसाहित्यातूनही तुकाराम महाराजाच्या रूपाने अभंगातून व्यक्त झालेल्या आहेच. मात्र शेतीनिष्ठ जाणिवा व्यक्त होताना महात्मा फुले यांच्या सारखी कणखर भूमिका त्यानंतर तेवढ्या तीव्रतेने घेतलेली दिसत नाही. असे निरीक्षण नोंदविले. १९०३ साली पीराजी पाटील या रामचंद्र टिकेकर यांच्या कादंबरीत दुष्काळाचे वास्तववादी चित्रण झाल्याचे दिसून येते. पुढे १९६० नंतर रा.र. बोराडे, ग.ल. ठोकळ, भास्कर चंदनशीव, डॉ. आनंद यादव, द.ता. भोसले यांनी ग्रामीण साहित्य चळवळीतून ग्राम जीवनाचे चित्रण उत्तम प्रकारे मांडले होते. १९८० च्या दशकात युगात्मा शरद जोशी प्रणीत शेतकरी संघटनेच्या आंदोलनाव्दारे शेतकऱ्यात आत्मभान जागृत केले. त्यांचे प्रतिबिंब साहित्यातही पडले. १९९० नंतर जागतिकीकरणाचे एकूणच समाज जीवनावर झालेल्या परिणामातून अनेक हातांना लिहिते केले. आसाराम लोमटे यांच्या 'आलोक' कथा संग्रहातून त्या जाणिवा नेमक्या व्यक्त झालेल्या आहे. शेतकरी चळवळीत युगात्मा शरद जोशीनंतर

शेतकरी संघटनेला गवसलेले अनमोल रत्न ऍड वामनराव चटप

गंगाधर मुटे



स्पष्ट विचार, निर्भिड मांडणी, धडाडीचे कर्तुत्व, सचोटी, प्रामाणिकपणा, अभ्यासू, जिज्ञासु व कर्तव्याप्रती समर्पित भाव अशी आणि अशा तऱ्हेची सर्व गूणविशेषणे ज्याला तंतोतंत लागू पडतात आणि ज्यांच्या कर्तुत्वाचा आलेख मांडायला शब्दही अपुरे पडतात अशा अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे ऍड वामनराव चटप.

एकाच शेतकरी संघटनेत काम करताना चाळीस वर्षाचा त्यांच्यासोबतचा माझा सहवास सुद्धा विलक्षण म्हणावा असा राहिला आहे. काळानुरूप आमच्यातील नात्याचे स्वरूपही बदलत गेलेत. सुरुवातीच्या काळात एक सहकारी कार्यकर्ता-पाईक-मित्र म्हणून, मधल्या काळात माझे नेते म्हणून तर आता एक मार्गदर्शक म्हणून या व्यक्तिमत्त्वाचे माझ्या आयुष्यात स्थान अधोरेखित झाले आहे.

शेतकरी संघटना आणि युगात्मा शरद जोशी यांच्यावर नैसर्गिक अढळ निष्ठा हा त्यांच्या उपजत स्वभावाचा एक स्थायी पैलू राहिल्याने ४० वर्षाच्या प्रवासात अनेक चढउतार येऊनही त्यांचे शेतकरी संघटनेतील आदरपूर्ण स्थान धृवाइतकेच अढळ राहिले आहे. सर्वांना सोबत घेऊन वाटचाल करण्यात ते कमालीचे यशस्वी झाले आहेत. शेतकरी संघटनेला भगदाडं पडत असतांनाही गेले ते कावळे, राहिले ते मावळे म्हणत शेतकरी संघटनेची पताका फडकत ठेवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे.

शेतकरी संघटनेच्या आधाराने अनेक लोकांना राजकारणात संधी मिळाली. काहींना आमदार म्हणून विधानसभेत तर काहींना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनेक प्रतिष्ठेच्या पदापर्यंत पोचता आले पण राजकीय मान-मरातब मिळाल्यानंतर अनेकांना सीतेच्या शोधाचे प्रयत्न सोडून रावणाच्या लंकेत लाभार्थी बनून तिथेच रममाण होण्याचे स्वप्न पडलीत. त्यामुळे ते शरद जोशी आणि शेतकरी संघटनेकडे पाठ फिरवते झाले. शेतकरी संघटनेने आजवर अनेकांना आमदार म्हणून विधानसभेत पाठवले पण त्यापैकी सरोजताई काशीकर व ऍड वामनराव चटप हेच दोन व्यक्तिमत्व शेतकरी संघटनेसोबत आजतागायत अत्यंत प्रामाणिक राहिलेले आहेत.

तसे त्यांचे राजकारणात येणे आणि आमदार होणे हा सुद्धा योगायोगच आहे. विधी शाखेची पदवी घेऊन १९७६ ते १९८० या काळात वकिली व्यवसाय करत असताना ते शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी चळवळीकडे आकर्षित झाले आणि शरद जोशींच्या विचारांनी प्रभावित होऊन त्यांनी शेतकरी संघटनेत पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून स्वतःला झोकून दिले. तेव्हापासून आजतागायत त्यांनी मागे फिरून पाहिलेच नाही. त्यांची कामाची शैली आणि कठोर परिश्रम बघता हा मनुष्य आहे की यंत्रमानव असा आम्हाला अनेकदा प्रश्न पडतो. याच कर्तृत्वाच्या बळावर त्यांनी अगदी प्रारंभीच्या काळातच शेतकरी संघटनेत स्वतःचे स्थान निर्माण केले.



सत्तेचे संतुलन साधण्यासाठी तसेच वाढता जातीयवादाचा भस्मासुर रोखण्यासाठी दुबळ्या विरोधी पक्षाला भरीव सहकार्य करण्याची निवडणूक भूमिका शेतकरी संघटनेने घेतली. अनायासे राजुरा मतदारसंघात विरोधी पक्षांकडे सक्षम उमेदवार नसल्याने ऍड

वामनराव चटप यांनी उमेदवारी करावी, असा एक प्रस्ताव समोर आला आणि शेतकरी संघटनेच्या आग्रहाखातर त्यांनी निवडणूक लढवली आणि जिंकली सुद्धा.

राजकारणी नसूनही राजकारणातच असणे, त्यासोबतच निष्कलंक, निष्कपट, सरळमार्गी, सभ्य व सज्जन व्यक्तिमत्व असलेल्या ऍड. चटप यांना मतदारांनी तीनदा विधानसभेवर पाठवले. विधानसभेत अन्य आमदारांचे पाठबळ नसताना सुद्धा त्यांनी २-३ सदस्य सहकाऱ्यांच्या सहकार्याने शेतकऱ्यांच्या बाजूने एकाकी किल्ला लढवत मिळालेल्या संधीचे सोने केले. त्यांना दोनदा उत्कृष्ट संसदपटू म्हणून गौरव प्राप्त झाला. आजच्या जगात आणि युगात लोकशाहीला लाभलेले दुर्मिळ व्यक्तिमत्व म्हणून ऍड. चटप यांचेकडे पहिले जाते.

खुद्द युगात्मा शरद जोशी तर म्हणायचे की वामनराव शेतकरी संघटनेत आहेत म्हणजे वामनराव यांचेवर शेतकरी संघटनेचे ऊपकार नसून शेतकरी संघटनेला वामनराव मिळाले हे वामनरावांचे शेतकरी संघटनेवर उपकार आहेत. शेतकरी संघटनेच्या अध्यक्षपदापासून तर स्वतंत्र भारत पक्षाच्या अध्यक्षपदापर्यंत सर्व सर्वोच्च पदे त्यांनी समर्थपणे सांभाळली. आंतरराज्य किसान समन्वय समितीमध्ये सुद्धा त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे, आयुष्याच्या अंतिम चरणात शेतकरी संघटनेची धुरा सांभाळण्यासाठी युगात्मा शरद जोशींनी निवडक लोकांना घेऊन शेतकरी संघटना ट्रस्ट स्थापन केला, त्यातही ऍड. चटप यांच्या खांद्यावर तोलामोलाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

अशा या सद्गुणी, कर्तव्यनिष्ठ, कर्तव्यतत्पर व्यक्तिमत्वाला विधानसभेतील त्यांचे प्रभावी कार्य, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सुरू असलेला सातत्यपूर्ण लढा, जनसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी गेल्या चाळीस वर्षांपासून सुरू असलेली धडपड व त्यांचा सेवाभाव या सर्व कार्यांची दखल घेत दिल्ली येथील इंडिया इंटरनॅशनल फ्रेन्डशिप सोसायटीने त्यांची भारत ज्योती अॅवार्डसाठी निवड केली. दि. ९ एप्रिल रोजी माजी स्थलसेना उपाध्यक्ष सरदार जगजीतसींग, चेन्नईच्या राज्यसभा खासदार शशिकलापुष्पा रामास्वामी व राष्ट्रीय लोकदलांचे जनरल सेक्रेटरी श्री त्यागी यांच्या हस्ते भारत ज्योती अॅवार्ड व उत्कृष्ट कामगिरी चे प्रमाणपत्र इंडिया इंटरनॅशनल सेंटर, नवी दिल्ली येथे हा बहुमोल पुरस्कार प्रदान करण्यात आला. विशेष उल्लेखनिय म्हणजे हा पुरस्कार मिळविणारे ऍड. चटप हे महाराष्ट्रातील तिसरे व्यक्ती आहेत. यापुर्वी क्रिकेटर सुनिल गावस्कर व शिक्षण महर्षी तथा बिहारचे राज्यपाल डि. वाय. पाटील यांना हा बहुमान मिळालेला आहे.

माणसाचे सरासरी आयुष्य ६५ वर्षे असल्याने त्यानंतरचा जीवनकाळ केवळ बोनस आयुष्य असल्याने त्यातील एक एक क्षण सत्कार्यी खर्च व्हावा, असे ते स्वतः मानतात. अशा या अतुलनीय व्यक्तिमत्वाला दीर्घायुष्याचा सदिच्छेसह मानाचा मुजरा!

गंगाधर मुटे
प्रदेशाध्यक्ष
माहिती व तंत्रज्ञान आघाडी
शेतकरी संघटना, महाराष्ट्र



आजवर अडगळीत पडून राहिलेले छायाचित्र : १९८५ मध्ये शेतकरी संघटनेच्या प्रचारासाठी भटकत असताना गडचिरोली जिल्ह्यातील आष्टी येथे वैनगंगेवर स्नान. डावीकडून सर्वश्री स्व. जीवन टिळक, ऍड. वामनराव चटप, श्री रवीभाऊ काशीकर, स्व. सुरेश चोपडे, गंगाधर मुटे आणि श्री. मोरेश्वर टेमुर्डे (माजी विधानसभा उपाध्यक्ष)

Phone No 020-64102818

।।श्रीगुरु प्रसन्न।।

With Best Compliments

।।श्रीमदूर्जित सेवा केंद्र।।

Mrs .Prdnya Jayant Bapat & Mrs.Padmaja Umakant Patil

आळंदीत आल्यावर शुद्ध , योग्य मापाच्या व
जकातमुक्त स्वस्त ईंधनाचा आवश्य लाभ घ्या .

आळंदी देहू रस्ता साधकाश्रमासमोर
आळंदी देवाची जिल्हा पुणे ४१२१०५



तंत्र वापरू अधुनिकतेचे
ठिबक बसवू नेटाफिमचे

असली ठिबक...नेटाफिम ठिबक!



फ्लेक्सनेट + एरिज किंवा
स्ट्रिमलाईन एक्स

टोल फ्री नंबर: 1800 103 2000
मिस् कॉल नंबर: 89 55 66 44 03
www.netafimindia.com
response@netafim.com

NETAFIM™
GROW MORE WITH LESS



Sahyadri farms
Seeding goodness

एकदा
अवश्य
भेट द्या.



फळे भाजीपाला व
प्रक्रिया उत्पादने



उच्चप्रतीचे खते, कीटकनाशक
आणि यंत्रसामग्री



माती, पाणी व पानदेठ
परीक्षण प्रयोगशाळा



आधुनिक नर्सरी

शेतकऱ्यांनी, शेतकऱ्यासाठी चालवलेली शेतकरी उत्पादक कंपनी

सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि.

मोहाडी, ता. दिंडोरी, जि. नाशिक, महाराष्ट्र.

फळे भाजीपाला व प्रक्रिया उत्पादने - 7030943504
माती परीक्षण प्रयोगशाळा - 70660 45937

खते, कीटकनाशक आणि यंत्रसामग्री - 7066037329
आधुनिक नर्सरी - 9022030964

Toll Free No. 1800 212 00 2020 www.sahyadrifarms.com /SahyadriFarms

Ph.No. (07152) 245197
Mob.No. 9404042877



Rameshbhai Bisani

BISANI TRADING CO.

E-mail : bisanitradingcompany14@gmail.com

3, Maheswari Market, Opp. Police Station,
Wardha-442001

७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!



डॉ. कुशल मारोती मुडे

सहयोगी प्राध्यापक

मुंबई



७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!

श्री ज्ञानेश्वर येणोरकर

धानोरा, जि. यवतमाळ



७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!

श्री नामदेवराव फटींग

धानोरा, जि. यवतमाळ



७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!

श्री विक्रम फटींग

धानोरा, जि. यवतमाळ



७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!

श्री बाबाराव कोकेवार

वाठोडा, जि. यवतमाळ



७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!

श्री. रत्नाकर वानखेडे

शेतकरी संघटनेचे खंदे
कार्यकर्ते, कवी



७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!

**डॉ. निळकंठ विश्रामजी
यावलकर**

ज्येष्ठ समाज सेवक अध्यक्ष व्यापारी संघटना
वरूड, ता. वरूड, जि. अमरावती

श्री गंगाधर मुटे यांचे लेखन अतिशय परखडपणे शेतीनिष्ठ वास्तवाचा वेध घेत राहिलेले आहे. आंतरजालीय माध्यमातून, मायबोली, मिसळपाव, बळीराजा डॉट कॉम, या सारख्या संकेतस्थळावर नव्या जाणिवेने लेखन झालेले आहे. त्यात श्री गंगाधर मुटे कार्यान्वित बळीराजा डॉट कॉम या संकेतस्थळाची भूमिका ही अनेक लिहित्या हातांना प्रेरणा स्रोत म्हणून महत्त्वाची भूमिका बजावताना दिसते. अगदी गेल्या सात संमेलनाच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या विश्वस्तरीय लेखन स्पर्धेकरिता निवडण्यात आलेले विषय हा ही एक अभ्यासाचा जाणीव जागृतीचा भाग आहे.

परिसंवाद सत्रातील समारोपीय मनोगत व्यक्त करताना प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत सरांनी सुरवातीलाच सातव्या नियोजित साहित्य संमेलनाचे स्थळ रावेरी, येथील सीतेचे वनवासातील वास्तव्य, भुमिकन्या म्हणून सीतेचे आध्यात्मिक स्थान, शेतकऱ्याचे भूमीशी असलेले नाते आणि योगायोगाने संमेलनाध्यक्ष वसुंधरा काशीकर यांचे वसुंधरा हे नावं, असा दुर्मिळ मध्यबिंदू साधुन, कोरोना अरिष्ट्यातही हे संमेलन व्हायलाच पाहिजे आणि ते यशस्वी करून दाखविल्याबद्दल संमेलनाचे कार्याध्यक्ष आ.गंगाधर मुटे यांच्या, गेल्या सात वर्षापासून शेतकरी साहित्य चळवळीला जनमानसात रुजविण्याकरिता करीत असलेल्या अथक कार्याचा यथोचित गौरव केला. पुढे बोलताना, युगात्मा शरद जोशी यांच्या अतिशय गाजलेल्या 'आम्ही लटिके ना बोलू' या लेखाचा दाखला देवून, साहित्यिकाकडून शेतकरी आंदोलनाला अपेक्षीत असलेल्या पाठिंब्याबद्दल काही अपेक्षा व्यक्त केल्या होत्या. त्या म्हणजे साहित्यिकांनी शेतकऱ्याच्या जिभेने बोलले पाहीजे. फक्त मनोरंजनात्मक कलावादी दृष्टिकोनातून न लिहता, त्याचे दुख:, दैन्य, लूट यांची वस्तुनिष्ठपणे कारणमीमांसा आपल्या लेखनातून केली पाहीजे.

शेतीसाहित्यातील बदलल्या प्रवाहाचे सखोल विवेचन करताना महात्मा फुले यांच्या समग्र साहित्याचा आढावा घेवून, महात्मा फुलेंच्या प्रखर शेतीनिष्ठ जाणिवा त्यांच्या साहित्यातून उजागर झालेल्या आहे. पुढे हीच विचारधारा शेतकरी संघटनेची पायाभूत विचारधारा झाली. साठोत्तरी साहित्यात शेतीनिष्ठ जाणिवांची मांडणी वैयक्तिक कौटुंबिक पातळीवर झाल्याने ती चळवळीच्या अनुषंगाने फारशी उपयोगी पडलेली नव्हती. एकोणविसशे बाहत्तर साली पडलेला भीषण दुष्काळ व त्यानंतर पंचाहत्तर मध्ये झालेली हरीत क्रांती,ऐशीच्या दशकातला डंकेल प्रस्तावाचे शेतकरी संघटनेने केलेले स्वागत, परंतू तत्कालिक व्यवस्थेने प्रस्तावाच्या विरोधाला घातलेले खतपाणी आणी आज दिल्लीत सुरू असलेले शेतकऱ्याचे आंदोलन याची जातकुळी एक असल्याचे सांगून, जेव्हा शेतकऱ्याच्या भल्यासाठी दरवाजे उघडण्यात येतात तेव्हा दुसऱ्या बाजूने अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने बंद करण्याचीही व्यवस्था कार्यान्वित होत राहते. तत्कालीन साहित्यिकांनी आपल्या वास्तववादी लेखनातून शेतीनिष्ठ जाणिवा उजागर केलेल्या आहेत.विषेशत: ग्रामीण साहित्यातून, भास्कर चंदनशिव यांच्या अंगारमाती ह्या संग्रहातील लाल चिखल, हिशोब यासारख्या कथांमधून बाजारी व्यवस्थेतील शेतकऱ्याच्या लुटीचे साकारण्यात आलेले प्रत्ययकारी वास्तव आजही बदलले नसल्याची खंत व्यक्त केली. शेषराव मोहीते, रा.र बोराडे, सदानंद देशमुख, मोहन पाटील, जगदिश कदम, विठ्ठल वाघ, भीमराव वाकचौरे, एश्वर्य पाटेकर, इंद्रजित भालेराव, सुधाकर गायधनी, कल्पना दुधाळ, केशव देशमुख, गंगाधर मुटे, संदीप जगताप, प्रकाश होळकर, आसाराम लोमटे, बालाजी सुतार, केशव देशमुख, लक्ष्मण महाडीक अश्या अनेक साहित्यिकांनी आपल्या कथा कविता कादंबरीतून शेतीनिष्ठा जाणिवा मांडलेल्या आहेत. आपापल्या परीने भिडण्याची भूमिका बजावलेली असून, जिथे गावात पोलिस वायरमन वसुली पथक आल्यावर शेतकरी लपून बसायचे त्याच शेतकऱ्यात खरे आत्मभान(भिडण्याची दृष्टी) मात्र शेतकरी संघटनेच्या आंदोलनातूनच मिळालेली आहे.

दिनांक २५ मार्च रोजी सहाव्या चरणात, ऑनलाईन शेतकरी कवी संमेलन, पालघर येथील प्रसिद्ध कवयित्री आ.अनुराधा धामोळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या सत्राचे अत्यंत बहारदार असे अभ्यासपूर्ण सूत्रसंचालन प्रसिद्ध सुत्रसंचालक कवी लेखक अकोला येथील अनिकेत देशमुख यांनी केले.

दिनांक २६ मार्च रोजी सातव्या चरणात, ऑनलाईन समारोपीय सत्राच्या, सुरवातीस सन्माननीय अथिती, उच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ सतीश बोरूळकर सरांनी समारोपीय सत्राच्या ' आता भिडायचे, दडायचे नाही' या भूमिकेच्या अनुषंगाने, आपले मनोगत मांडताना ऐतिहासिक दाखले देवून, प्रतापराव गुर्जर, महात्मा गांधी आणि युगात्मा शरद जोशी यांच्या भिडणे या तत्त्वाच्या मुळाशी असलेल्या विचारधारेचे कालातीत महत्त्व विषाद करून वास्तवातील एकूणच सर्वच क्षेत्रातील भिडण्याच्या आड दडणाऱ्या तथाकथित मानवी प्रवृत्तीचा रोखठोक समाचार घेतला. अगदी मनोगताची सुरवातच 'शेतकरी नेटकरी' अशी काव्यमय संवादातून करून शेवट ज्येष्ठ कवी इंद्रजित भालेराव सराच्या कवितेतील ते बुजगावण्याला घाबरत नाही अश्या समर्पक कविता वाचनाने करून आपल्या मनोगतातून आता भिडण्याची गरज प्रतीपादीत केली.

दुसरे विशेष अतिथी शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष ड. ललित बहाळे सरांनी समारोपीय सत्रात आपली भूमिका मांडताना, साहित्यिकाकडून काही अपेक्षा व्यक्त केल्यात. शेतकरी साहित्यात केवळ त्याच्या कष्टाचे, दू:खाचे, कलावादी, सौंदर्यवादी परीप्रेक्ष्यातून चित्रण झाल्याने ते साहित्य, शेतकऱ्याला कामगार म्हणून त्याचा संघर्ष उभा करण्यात खर्ची पडल्याचे दिसून येते. शेतकरी हा काही फक्त कामगार नाही, की तो फक्त दुसऱ्याच्या शेतात कामावर जातो म्हणून कामगार ठरत नाही. तो गुंतवणूकदारही आहे. आर्थिक शारीरिक मानसिक दृष्ट्या गुंतवणूक

करीत असतो. तेव्हा शेतकरी साहित्याची मांडणी करताना शेतीतील, अर्थशास्त्र. मानसशास्त्र, विज्ञान यांचा सारासार विचार करून वस्तुनिष्ठपणे मांडणी होणे आता काळाची गरज आहे. ह्या जबाबदारीचे भान साहित्यिकांनी ठेवणे आवश्यक आहे.

तिसरे प्रमुख अथिती ड. दिनेश शर्मा सरांनी आपल्या धारदार वाणीने आणी तेवढ्याच संयतपणे भिडणे या भूमिकेचा परामर्ष घेतांना, शेतीतील लुटीच्या सिद्धान्ताची कारणमीमांसा स्पष्ट करून, महात्मा गांधी, युगात्मा शरद जोशी यांच्या, भिडणे या भूमिकेला नैतिक अधिष्ठान होते असे सांगून, अन्यायाला विरोधाशिवाय, भिडण्याशिवाय त्यांना दुसरा पर्याय मान्य नव्हता. थेट भिडणे ही एकच भूमिका घेतल्याने, शेतकरी आंदोलन जगभऱ्यात मान्य झाले. पाश्चात्त्य साहित्यातील साहित्यकृती व्दारे निर्माण झालेली सामाजिक जाणीव जागृती, शोषित आणि शोषकांनाही प्रेरणा देऊन गेली. असे साहित्य आपल्याकडे का निर्माण होत नाही? आपण असे काहीच लिहीत नाही, की ज्यामुळे सत्तेखालची जमीन हादरून जाईल. असे काहीच नव्याने निर्माण करीत नाही ज्यामुळे जगाचे काम थांबेल. आपली सर्व बुद्धिमत्ता परदेशी गहाण पडली असल्याने ती सर्वसामान्याच्या हिताचे काही करण्यास सिद्ध होत नाही. सिनेमातील नट हा कधीही थेट सरकारच्या विरुद्ध बोलत नाही. तो बोलतो, भांडतो समाजवादाने लादून दिलेल्या त्या चाकोरीबद्ध व्यवस्थेशी. ज्यातून मूळ प्रश्न कधीही ऐरणीवर येत नाही. होते फक्त तात्पुरती मलमपट्टी. अत्यंत मार्मिक प्रहाराने आपले समारोपीय मनोगतास विराम देताना अंतर्मुख केले.

समारोपीय सत्रात गत सहाही संमेनलनाच्या प्रथेप्रमाणे, विचार मंथनातून आपल्या मागण्या शासकीय दरबारी मांडण्याकरिता काही ठराव मांडण्यात येतात. या संमेलनात एकूण सात ठरावाचे वाचन संमेलनाचे कार्याध्यक्ष श्री. गंगाधर मुटे सरांनी केले. उपस्थितांच्या सर्वसंमतीने सातही पारीत करण्यात आले आणि एका अतिशय आगळ्यावेगळ्या संमेलनाची सांगता झाली.

– रवींद्र अंबादास दळवी,
नाशिक

SSI Reg.No. 270081200088 Part 2 Dt. 27-04-2011

WASUDEO PRESSING FACTORY

COTTON MERCHANTS & COMMISSION AGENT

SINDI - 442 105 (C. Rly.) Dist.- Wardha

Email : wasudeopressingfactory@in.com

Fax : 07155-261679
Mob : 9422844004
9860967856
9890435034

७ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!





डॉ. श्यामसुंदर गलाट (B.H.M.S. C.C.M.P.)


डॉ. हेमंत श्यामसुंदर गलाट (M.D. Ayurvedic)

श्री क्लिनीक

धानोरा (येवती), ता. राळेगांव, जि. यवतमाळ

मो.नं. ७३८७५०७५२७

७ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!





श्री गजाननराव इखार

शेतीनिष्ठ शेतकरी,
राज्य पातळी पीक स्पर्धा
विजेते तथा
माजी पोलीस पाटील,
ममदापूर
ता. देवळी, जि. वर्धा

सौ. बेबीताई ग. इखार

सीता मंदिर एक स्त्री शक्तीपीठ

सौ. सरोज काशीकर



सीता म्हटलं की एक त्यागाची मूर्ती आपल्या समोर उभी राहते. सीतेच्या जन्मापासूनचा इतिहास जर बघितला तर असे लक्षात येते की, सीता भूमिकन्या म्हणून जन्माला आली. तिची जननी म्हणजे पृथ्वी, जी सतत केवळ मानव समाजालाच नव्हे तर सर्व चराचराला स्वतःच्या क्षरणातून वाढवत व पोसत आहे. मग तिची कन्या सीता वेगळी असूच शकत नाही. सीतेच्या अनेकविध रूपाची उकल करताना ती अधिकाधिक सर्वव्यापी असल्याचे दर्शन होते. भूमीतून जन्म होताच मिथिला देशाची राजकन्या होते. कोडकौतुकात हसतखेळत बालपण व्यतीत होते. जनकराजाची कन्या जानकी स्वयंवराकरिता शिवधनुष्य भंग करणाऱ्याचा पती म्हणून स्वीकारण्याची अट ठेवते. या स्वयंवरात शिवधनुष्य भंग करणाऱ्या बलशाली रामाची पत्नी, अयोध्येच्या बलाढ्य राजा दशरथाची सून म्हणून अयोध्येत येते. इथपर्यंतचा प्रवास अतिशय सुखकर असतो.

अयोध्येच्या प्रवेशानंतर रामांसोबत महालात नव्हे तर रामाला वनवासाची तयारी करावी लागते. सीतेबाबत वनवासाची आज्ञा नव्हती पण एका क्षणात सीतेने वनवासात जायची तयारी केली तेव्हा महालाच्या, वैभवाच्या, आरामाच्या मोहात न पडता कर्तव्यदक्ष पत्नीची भूमिका निभवण्याकरिता तत्पर असलेली सीता आपल्याला दिसून येते. वनवासात असताना स्त्रीसुलभ रूपाचे दर्शन घडते ते रामाकडे सुवर्णमृगाचा हट्ट करणाऱ्या सीतेतून. रामाचा आवाज येताच लक्ष्मणाला रामाच्या मदतीस पाठवताना पतीबद्दल काळजी करणारी सीता, तसेच तिच्या रक्षणाकरिता लक्ष्मणाने आखलेली लक्ष्मणरेषा ओलांडून दारात आलेल्या साधूला भिक्षा वाढताना बंधमुक्त होऊन धर्मपालनाचे दर्शन घडवणाऱ्या सीतेचे दर्शन होते. भिक्षुकाच्या रुपात आलेला साधू नसून रावण आहे हे ओळखून स्वतःचे हरण झालेले लक्षात येताच रडत न बसता आपल्याजवळच्या वस्तू रस्त्यात टाकून कोणत्या तिचे कोणत्या दिशेला हरण केले जात आहे याच्या खुणा टाकत जाणाऱ्या सीतेत संकटातही समयसूचकता असणारी सीता आपल्याला दिसून येते.

रावणाच्या क्रौर्याला न घाबरता अशोकवाटीकेत राक्षसांच्या पहाऱ्यात निर्भयपणे वावरणारी निर्भयी सीता. सुटकेची सुतराम शक्यता दिसत नसतानाही प्रगाढ असा आत्मविश्वास बाळगणारी सीता. रामदुत म्हणून येणाऱ्या हनुमंताकडे रामाकडून आणलेल्या खुणेची ओळख पटवून घेणारी सीता. राक्षसाच्या नगरीतही आपल्या वागण्या-बोलण्यातून त्रिजटासारख्या राक्षसीच्या मनांत प्रेम निर्माण करणारी सीता. रामाच्या विजयानंतर पवित्र असूनही अग्निपरीक्षा देणारी सीता. अयोध्येत आल्यावर थोरामोठ्याचे मन जपणारी सीता. लंकेतील व वनवासातील कष्ट विसरून रामांसोबत पत्नीधर्म निभवणारी सीता.

निश्चिंतपणे वावरणाऱ्या सीतेला मातृत्वाची चाहूल लागते. मातृत्व प्राप्तीच्या आनंदात रममाण असलेल्या सीतेच्या नशीब वेगळेच काही लिहिलेले होते. भूमीप्रमाणेच बहर गेला की रखरखते ऊनच नशिबी होते. अचानकपणे लोकोपवादामुळे रामाने सीतेचा त्याग केला. पतीने त्यागलेली सीता कुठल्या गुन्ह्याचा शिक्षा हे न कळतच अरण्यात सोडून दिली जाते. हा खरा सीतेची सत्त्वपरीक्षा असल्याचा काळ समजावा लागेल. निबिड अरण्यात एकटी गरोदर स्त्री. आतापर्यंतच्या सीतेच्या व्यक्तीछटेतील हा टप्पा स्त्री समाजाला खूप काही शिकवून जातो. या ठिकाणी एक गरोदर स्त्री जी राजाची राणी होती, स्वतःला असहाय्य समजून रडत बसली नाही. नशिबाला दोष न देता. आपल्याबद्दल सहानुभूती गोळा न करता, घनदाट अरण्यातून वाट शोधत निघाली. वशीष्ठ मुनींच्या आश्रमात ओळख न सांगता आश्रय घेतला. आश्रमांचे नियम ,कामं समजून घेऊन ऋषीपत्नीला मदत करता करता तिची मुलगी होऊन जगणारी सीता. आश्रमातील सर्व कामातून रस घेत ती आश्रमाशीच एकरुप झाली.

दळण कांडण करणे, मोळी आणणे, स्वयंपाक करणे, कंदमुळं खाऊन हसत मुखाने जगणे. हा जीवनक्रम लीलया पेलणारी सीता. दोन गोंडस बाळांना जन्म देताना प्रसूती वेदना सहन करणे. जो आनंदाचा क्षण माहेर व सासरच्या राज्यांत हत्तीवरून साखर वाटून तोफांच्या फेरी झाडून साजरा झाला असता तो आनंद आश्रमातील लता-वल्हरी सोबत सीतेने साजरा केला. या स्थितीतसुद्धा पतीची उपेक्षा न करता पतीप्रमाणे परम कुशल व बलाढ्य पुत्र व्हावे याची कामना केली. गुरु वसिष्ठमुनीकडे मुलांना सर्वप्रकारचे धडे गिरवून घेणारी सीता. आयुष्याचे अनेक उतारचढाव सहन करत खंबीरपणाने हसत हसत संकटांचे सामना करणारी सीता. अश्वमेध यज्ञाचा घोडा पकडून प्रत्यक्ष रामाला युद्धाला पाचारण करणाऱ्या लव कुशाची माता सीता. मुलांना त्यांच्या जन्मदात्याची ओळख पटवून, हे दोन्ही पुत्र रामाचेच ही खात्री पटवून रामाच्या स्वाधीन करताना रामाने तिचा सन्मानाचे स्वीकार करावा या आशेने एक क्षण रामाकडे बघणारी सीता. रामाची मनस्थिती ओळखून स्वतःलाच कायम पृथ्वीच्या उदरात सामावून घेणारी सीता.

या रामायणाच्या कहाणीतून रामाची महत्ता सगळ्या जगाला कळली. जय श्रीराम म्हणून रामाचा उदोउदो झाला. या काळात

खंबीर, प्रेमळ, कर्तव्यदक्ष, त्यागाची मूर्ती असणाऱ्या सीतेचे स्मरण राहावे म्हणून रावेरी येथील एकमेव सीता मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा निर्णय युगात्मा शरद जोशी यांनी घेतला. शेतकरी महिला आघाडीच्या वेगवेगळ्या उपक्रमांत सीतेचा आदर्श घेऊन जगण्याचा आत्मविश्वास प्रत्येक स्त्री मध्ये यावा, तिने स्वताला असहाय्य न ठेवता समर्थपणे उभे राहावे या उद्देशाने शरद जोशी केवळ कार्यक्रम देऊन थांबले नाही तर स्वतःचे १३ लाख रुपये दिले. या मागे युगात्मा शरद जोशींचा काय उद्देश असेल असा विचार जरी त्या मंदिरासमोर उभे राहून केला तर अनेक प्रश्नांची उकल करण्याचे सामर्थ्य या स्त्री मध्ये आहे हे स्पष्ट होते. सीता ही पुराणातील आदर्श, कर्तव्य पारायण खंबीर स्त्री, आजच्या युगात असहाय्यपणे न जगता सीतेच्या सामर्थ्याने उभे राहावे याचे प्रशिक्षण देणारे आम्हा स्त्रियांकरिता चालते बोलते शक्तीपीठ झाले आहे.

प्रत्येक स्त्रीत सर्वगुण जन्मताच असतात. मात्र आपल्या बेंबीतली कस्तुरी जसे हरिणाला माहीत नसते तसे थोड्या फार प्रमाणात आम्हा स्त्रियांचे झाले आहे. आपल्यातील या कस्तुरीच्या शोधात आमची पावलं सीता मंदिराकडे वळली तर त्या कस्तुरीचा शोध नक्कीच आम्हा सगळ्यांना लागेल. त्याच आत्मविश्वासाने, सामर्थ्याने व कर्तृत्वाने आयुष्यात येणाऱ्या संकटाला न घाबरता खंबीरपणाने उभे राहण्याची शक्ती या सीता मंदिरातून मिळते. हे रावेरीचे सीता मंदिर केवळ पूजेचे स्थान न बनवता स्त्रियांच्या आत्मिक बळ निर्मितीची वाट दाखवणारे स्त्री शक्ती-ज्ञानपीठ आहे, असे म्हणणे अधिक संयुक्तिक आहे.

– सौ सरोज काशीकर

बाबासाहेब देशमुख रावेरीकर
शिक्षण प्रसारक मंडळ, यवतमाळ

र.नं. F 5634 CY





अध्यक्ष — **चंद्रकांत देशमुख**

सचिव — **सौ. अरुंधती देशमुख**

१) इंदु-बळवंत ॲग्रो रिसर्च सेंटर
२) देशमुख स्पोर्टस अकादमी
३) परित्यक्ता महिला उद्योग केंद्र
४) श्रीकांत देशमुख गोरक्षण
५) स्वतःचे हक्काचे घर (वृद्धाश्रम)

कृषी उत्पन्न बाजार समिती हिंगणघाट, जि. वर्धा.

शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास हाच ध्यास...

समितीची ठळक वैशिष्टे

१) समिती आवारात रु.१ मध्ये भरपेट जेवण, निवाऱ्याची व्यवस्था, सकाळी मुखमार्जनाचे आवश्यक साहित्य व नि:शुल्क चहा
२) छत्रपती शिवाजी मार्केट यार्डचा संपूर्ण परिसर CCTV कॅमेऱ्याच्या नियंत्रणात
३) समिती आवारात शुध्द शीतगृहात तसेच शुद्ध व थंड पिण्याचे पाण्याची व्यवस्था
४) संपुर्ण आवारात सिमेंटीकरण, आवाराला सुरक्षा भिंत तसेच २४ तास सुरक्षा व्यवस्था
५) समिती आवारात उभारणी करण्यात आलेल्या लिलाव शेडच्या व्यतिरिक्त MACP प्रवेशद्वाराअंतर्गत १०००० स्केवफुट मध्ये भव्य लिलाव शेडची उभारणी.
६) समिती आवारात ४ एम.बी.पी.एस. लिजलाईन व वायफाय ची सुविधा तसेच ई-नाम मध्ये बाजार समितीचा समावेश
७) हायटेंशन लाईनसह १४० केव्हीए जनरेटरची सुविधा तसेच इलेक्ट्रॉनिक्स काटयाद्वारे शेतमालाचे मोजमाप
८) RKVI योजनेअंतर्गत धान्य यार्डवर २ मे टन प्रती तास क्षमतेच्या ड्रेन क्लिनिंग मशिनसह शेडची उभारणी.
९) बाजार भाव व इतर माहितीकरिता निशुल्क एस.एम.एस. व टोल फ्री क्रमांकाची सुविधा (टोल फ्री क्र.१८००८४३१००१).
१०) छत्रपती शिवाजी यार्ड वरून बस स्टाप पर्यंत निशुल्क बस ची सुविधा.
११) उपबाजार येथे रु.१०००/- मध्ये बिछायत भांडयासह मंगल कार्यालयाची व्यवस्था.
१२) कापुस मार्केट यार्ड येथे भव्य प्रशासकीय इमारतीचे काम सुरू.
१३) शेतमाल तारण योजने करिता वर्षभर ६% व्याजदरावर कर्जाची व्यवस्था, समिती स्वनिधीतून नांदगाव यार्ड येथे ३८०० मे. टन क्षमतेचे गोदाम उभारणीचे कामकाज सुरू याव्यतिरीक्त RKVI योजनेअंतर्गत १००० मे. टन क्षमतेच्या गोदामाची उभारणी.
१४) शेतकऱ्यांना शिक्षीत व कृषीचे उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीने कृषिवर आधारीत चर्चा सत्राचे आयोजन तसेच कपाशीवरिल गुलाबी बोंडअळीचे नियंत्रणाकरिता १,०४,३११ फेरोमन ट्रॅपचे ७५% अनुदानावर वितरण.
१५) समिती कार्यक्षेत्रात ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या स्मशानभुमीमध्ये हॅन्डपंपची उभारणी तसेच पांधनरस्त्याचे अनुदान तत्वावर मातीकाम.
१६) सर्पदंशाने शेतकऱ्याचा मृत्यु झाल्यास रु.१०,०००/-, बैलमृत्यु झाल्यास रु.११,०००/- तर इतर नुकसानीच्या अनुषंगाने रु.७५००/- पावेतो अर्थीक मदत वितरण.
१७) शेतकरी-शेतमजुर, हमाल-मापारी यांचे पाल्यांना अभियांत्रिकीय द्वितीय वर्षाला प्रवेश घेणाऱ्यांना अनुदान तत्वावर लॅपटॉप, अनुदानावर व्यावसायीक अभ्यासक्रम तसेच उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती.
१८) जिल्हा परिषद शाळांना सिलींग फॅनचे वितरण.
१९) परवानाधारक हमाल मापारी यांचेकरिता विमा संरक्षण.
२०) कापुस तारण योजना व सामुहीक विवाह सोहळ्याचे यशस्वी आयोजन.
२१) शेतकऱ्यांना निशुल्क फळझाडे व सावली वृक्षांचे वितरण
२२) निशुल्क शवपेटीची सुविधा.

आगामी महत्वाकांक्षी योजना :
१) भविष्यात लाफसाचे जिनींग प्रेसिंग उभारणीचा मानस
२) आडीसामन वाहनाची सुविधा पुरविणेबाबत कार्यवाही सुरू.
३) सिलोज उभारणी.



ॲड. सुधीर कोठारी
सभापती

संचालक मंडळ सर्वश्री

हरिष वडतकर (उपसभापती), मधुकरराव डंभारे, मधुसुदन हरणे, ओमप्रकाश डालिया, उत्तमराव भोयर, शेषकुमार येरलेकर, विनोद वानखेडे, अशोकराव उपासे, राजेश मंगेकर, सुरेश सातोकर, बापुरावजी महाजन, बळीरामजी नासर, सुरेश वैद्य, पंकज कोचर, संजय कात्रे, सौ.सुरेखाताई सायंकार, सौ.माधुरीताई चंदनखेडे, संजय तपासे, राजेश कोचर, टि. सी. चांभारे (सचिव)

रावेरी आणि शरद जोशी

शैलजा देशपांडे






यवतमाळ जिल्ह्यातील रावेरी हे छोटेसे गाव. स्वयंसिद्धा सीतेचे तपस्यास्थान. पूर्वीपासून हा परिसर ऋषीमुनीची तपोभूमी म्हणून ओळखला जातो. कापसापासून वस्त्र बनविण्याचा शोध याच परिसरात लागला. सीता ही सर्व शेतकरी स्त्रियांचे प्रेरणास्थान आहे.

लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमाच्या निमित्ताने आदरनीय शरद जोशी ९० साली रावेरी या गावात आले. शेतकरी महिलांना 'संपत्ती अधिकार' मिळवून देणारा कार्यक्रम म्हणजे लक्ष्मीमुक्ती. आदरनीय शरद जोशीनी सर्व शेतकरी भावांना आवाहन केले. घरची लक्ष्मी दिवसाचे १८ ते २० तास सतत काम करते, घराचे शेतीचे सगळे बघते. तिच्या कष्टाची, त्यागाची जाणीव ठेऊन तिला संपत्तीत वाटेकरी करून घेताना या ''मंगल सावकाराचे देणे'' अशतः फेडल्याचे समाधान खूप मोठे होते. जवळ जवळ २ लाख शेतकरी स्त्रियांना हा सन्मान मिळाला. त्या शेतकरी भावाचा आणि त्यांच्या लक्ष्मीचा सन्मान करण्यासाठी मा. शरद जोशी त्या गावात जात. त्यावेळी सडा घालून रांगोळ्या काढून संपूर्ण गाव सजविल्या जायचे. ढोलताशाच्या गजरात त्यांचे स्वागत करण्यात आले. इतिहासात पहिल्यांदाच एवढा मोठा चमत्कार झाला.

या कार्यक्रमादरम्यान आ. शरद जोशींनी सीतामाईची कहाणी सांगितली. जनकराजाची मुलगी, रामाची पत्नी १४ वर्षे रामासोबत वनवासात गेली. सुखदुःखाची वाटेकरीण झाली. वनवासातून परत आल्यावर लोकापवाद झाला आणि सीतेला पुन्हा वनवासी व्हावे लागले. एवढ्या मोठ्या साम्राज्याच्या महाराणीवर असा कठीण प्रसंग आला. संपत्तीत वाटेकरी नाही. गर्भारशी सीता वणवण फिरत होती. शेवटी वाल्मिकी ऋषीनी तिला आश्रमात आश्रय दिला, आधार दिला. हे काम प्रत्यक्ष प्रभू रामचंद्राला जमले नाही तेच काम माझ्या असंख्य शेतकरी भावानी करून दाखविले. घरच्या लक्ष्मीचा सन्मान केला, असे गौरवोद्गार काढले.





सभा झाल्यावर गावकरी म्हणाले, ही कहाणी तर आमच्याच गावातील आहे. सीता इथेच राहिली, लवकुशाचा जन्म याच गावातील आहे. आजही इतिहासाच्या खुणा आहेत. प्रत्यक्ष प्रसुतीस्थानी सीतेचं मंदिर आहे. वेलीनी लवकुशांनी युद्धाच्या वेळी हनुमंताला बांधून ठेवले ते बांधलेल्या अवस्थेतील हनुमंताचे मंदिर आहे. हा पुरावा देऊन आख्यायिका सांगितली. बाळंतपणानंतर प्रत्यक्ष अयोध्येची महाराणी पथ्यासाठी




पसाभर गहू मागायला गावभर फिरली. परंतु कोणीही गहू दिले नाही. तेव्हा अत्यंत संयमी, सहनशील सीतेने मुलांच्या वात्सल्याने व्याकुळ होऊन या गावात कधीच गहू पिकणार नाही, असा तळमळून शाप दिला. गव्हाचे संकरित वाण येईस्तोवर रावेरीत गहू पिकत नव्हता, असे रावेरीकर ग्रामस्थानी सांगितले.

प्रसुतीस्थानी असणारे मंदिर आणि गावकऱ्यांनी प्रांजळपणे दिलेला पुरावा या दोन्ही गोष्टी महत्वाच्या होत्या.

१९९१ साली शेगावला अधिवेशन झाले. खुल्या व्यवस्थेचा पुरस्कार करण्यात आला. सीता शेती, माजघर शेती, व्यापार शेती, निर्यात शेती, या चतुरंग शेतीची स्वीकार करण्यात आला. सोबतच सीतेच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा महिला आघाडीने संकल्प सोडला. परंतु संकल्पाची पूर्तता होत नव्हती. कारण शेतकरी महिला आघाडी एवढी निधीची जुळवाजुळव करू शकली नाही.

८-९-१० नोव्हेंबर २००१ साली रावेरी महिला अधिवेशन घेण्याचे ठरविले. खुल्या व्यवस्थेत स्त्रीला स्वतःच्या मालमत्तेचा हक्क शाबित करून निर्भयपणे या



व्यवस्थेत तिच्या अंगच्या गुणानी कर्तृत्वाने समोर जाता आले पाहिजे. यात तिची सुरक्षितता जास्त महत्वाची होती. तंत्रज्ञानाने तिच्या स्वातंत्र्यांच्या कक्षा रुंदावल्या व माणूस म्हणून सगळ्या व्यवस्थेत जगण्याची संधी स्त्रियांना मिळाली. या व्यवस्थेत शेतकरी स्त्री ही स्वतःवर अंगमेहनतीने कर्तृत्वाने व गुणाच्या जोरावर सहनशीलतेने टिकणार आहे. म्हणून संपत्ती अधिकारांच्या मुद्यावर रावेरीला अधिवेशन घेण्याचे निश्चित झाले. सीतेला वाल्मिकी ऋषीचा आश्रमात आधार मिळाला म्हणून निर्भयपणे राहता आले. आजही अनेक स्त्रिया वणवण फिरताहेत, सुरक्षिततेची हमी नाही. अशा स्त्रियांना ८-१५ दिवस राहता यावे. आपल्या पायावर उभं राहून स्वयंपूर्ण होता यावे याकरिता आधार केंद्र सीतेच्या गावी उभारण्यात यावे, अशी चर्चा झाली.



अधिवेशन तर ठरले, मग हा शरद जोशीचा निरोप प्रत्येक गावागावात सगळ्या भावाबहिणीपर्यंत पोहचविण्यासाठी महाराष्ट्रभर जिल्ह्या जिल्ह्यात, गावात स्त्रियांचे मेळावे, बैठकी घेण्यात आल्या. त्याला सर्व शेतकरी भावांचे मोठे मोलाचे सहकार्य मिळाले.

रावेरी अधिवेशनाच्या वेळी मी महाराष्ट्र शेतकरी महिला आघाडीची अध्यक्षा होते. श्री. रामभाऊ नेवले हे शेतकरी संघटनेचे महाराष्ट्राचे अध्यक्ष होते. माजी आमदार ॲड. वामनराव चटप या अधिवेशनाच्या पाठीशी खंबीरपणे उभे होते. सौ. सुहासिनी वानखेडे विदर्भ महिला आघाडी प्रमुख, दिनकरराव निस्ताने, श्रीकुमार वानखेडे हे माझ्यासोबत प्रचारात होते. सर्वत्र प्रचार, रॅली काढून सर्वच कार्यकर्ते आदरणीय शरद जोशी यांचा निरोप सर्वत्र पोहचवण्याचे काम करीत होते.

जिजामातेचे माहेर सिंदखेडराजा वरून २८ ऑक्टोबरला निघालेली प्रचारयात्रा ७ नोव्हेंबरला रावेरीला



पोहचली. सीतामाई आणि जिजाबाई दोघीही आदरणीय वंदनीय स्त्रिया आहेत. परिस्थितीमुळे निराश न होता मुलाना बापाच्या बरोबरीने कर्तृत्ववान, पराक्रमी, खंबीर बनविले. अन्यायाविरूद्ध लढण्यास शिकविले. त्या विपरीत परिस्थितीत सीतेला वाल्मिकी ऋषीचा आधार मिळाला तर जिजाबाईला दादोजी कोंडदेवाचे सहकार्य मिळाले.

स्वतः शेतकरी संघटनेचे प्रणेते आ. शरद जोशी या प्रचारयात्रेला झेंडी दाखविण्यासाठी हजर होते. महिला आघाडीच्या माजी अध्यक्षा, माजी आमदार सौ. सरोज वहिणी पण सोबत होत्या. परिसरातील असंख्य स्त्री पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते.

चांदवडच्या अधिवेशनातून नवीन विचार घेऊन आपल्या हक्कासाठी बाहेर पडलेली स्त्री माणूस म्हणून सन्मानाने जगता यावे, यासाठी शेतीमालाच्या भावाच्या लढाईत सामील झाली. तुरुंगात गेली, लाठ्या खाल्ल्या. कारण माणूस हा तिच्या अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न, परंतु शेतीमालाला भाव मिळाला तरी शेतकरी स्त्रीला सुखाचे चार दिवस येतील का? हा प्रश्न तिच्या मनात होता. आदरनीय शरद जोशींना एका शेतकरी स्त्रीने हा प्रश्न विचारला.



तिने आपले कुटुंब घरदार हे सांभाळून सर्व करायचे होते. यातून ''लक्ष्मीमुक्ती'' कार्यक्रमाची सुरुवात झाली. तिला सन्मान मिळाला स्त्रीशक्तीच्या जागरणात स्त्री पुरुष मुक्ती या घोषवाक्याचा खरा अर्थ गवसला.

८-९-१० नोव्हें. २००१ साली रावेरीच्या व्यासपीठावरून शेतकऱ्याना तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य असावे, याची मांडणी झाली. नवीन संशोधित बियाण्याला परवानगी मिळावी, कापसावर बोंडअळी न येणारे बी.टी. कापसाचे वाण यावर सरकारने बंदी घातली होती. गुजरातमध्ये शेतकऱ्यानी सरकारच्या बंदीला न जुमानता हे बियाणे लावले होते. परंतु त्यावर्षीच्या निसर्गाच्या प्रकोपाने बोंडअळीने कापसाचे पीक उद्ध्वस्त झाले. तरी काही शेत चांगली होती. तेव्हा ही गोष्ट लक्षात आल्यावर सरकारने शेतातील कापसाचे पीक उद्ध्वस्त करण्याचे आदेश दिले. ते पीक वाचवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाच्या बाजूने आदरनीय



शरद जोशींच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले. ते बियाणे महाराष्ट्रात पण शेतकऱ्यांना मिळावे याचा व्यासपीठावरून पुरस्कार करण्यात आला. जवळ जवळ २ लाख शेतकऱ्यानी सरकारच्या विरोधाला न जुमानता बी.टी. बियाणे लावले. तंत्रज्ञानाच्या विरोधातील ही लढाई शेतकरी जिंकले. कारण या आंदोलनानंतर सरकारने लगेचच या बियाण्यावरची बंदी उठवली.

सीता ही भूमिकन्या आहे. जनकराजाला जमीन नांगरताना सापडली. तिचे आणि शेतकऱ्याचे असे हे अतुट नाते युगायुगाचे आहे.

रावेरीच्या अधिवेशनानंतर कापसाचे आंदोलन मोठ्या प्रमाणात झाले. अधिवेशनाच्या वेळी कापूस खरेदी केंद्र सुरू नव्हते. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले होते. आदरणीय शरद जोशी व्यासपीठावर बोलायला उभे राहिले आणि शेतकऱ्याने धावत येऊन कापसाची व्यवस्था



सांगितली. ते ऐकल्यावर ''कापसाचा प्रश्न सुटल्याशिवाय विदर्भ सोडणार नाही'' अशी घोषणा केली. संपूर्ण रावेरीचे अधिवेशन कापूस प्रश्नावर रस्त्यावर आले. रेल रोको, रास्ता रोको, शेतकरी पुन्हा एकदा चर्चेत आले. बळीराजा त्याची कैफियत घेऊन सरकारच्या समोर ठामपणे लढायला उभा होता. इडा पीडा टळो बळीचे राज्य येवो, असे म्हणत या आंदोलनात शेतकरी स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. २९ दिवस सतत हे आंदोलन सुरू होते. एकमुस्त कापसाचा चुकारा आणि इलेक्ट्रॉनिक्स पद्धतीने ग्रेडिंग या दोन मागण्या होत्या. शेवटी आदरनीय शरद जोशी उपोषणाला बसणार होते. सरकारने चर्चेची तयारी दाखविल्यावर धडक प्रचार पदयात्रा वर्धा ते नागपूर काढण्यात आली. सगळे शेतकरी कापसाची कैफियत मांडण्यासाठी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी धडकणार होते. या आंदोलनाचा आणि शरद जोशीचा धाक सरकारला वाटत होता. स्वतः मुख्यमंत्री नागपूर जवळील बुटीबोरीला चर्चेला आले. चर्चा झाली नंतर नागपूरला विजयी मेळावा घेऊन या आंदोलनाची सांगता झाली.

स्त्रियांच्या सन्मानाचे प्रतीक म्हणून जीर्णोद्धाराचा संकल्प रावेरी अधिवेशनात पण करण्यात आला. परंतु निधी अभावी काम होत नव्हते. याची खंत स्वतः शरद जोशींना पण होती. नंतर स्वतःची आंबेठाण येथील जमीन विकल्यावर १३ लाख रुपये या कामासाठी दिले आणि रखडलेले काम सुरू झाले. आ. शरद जोशींच्या खासदार निधीतून मोठा हॉल सीता मंदिरासमोर बांधण्यात आला. द्वापार युगापासून तर आतापर्यंत हे सीतेचे मंदिर दुर्लक्षित होते. भंग अवस्थेत होते. तिच्या जीर्णोद्धारासाठी त्यागी, तपस्वी, शेतकरी आंदोलनाची पुण्याई असलेल्या योद्धा शेतकऱ्याची वाट पहात होती. हा विलक्षण योगायोग आहे. या प्रकल्पाचे काम श्री. रमेश पाटील हंगरगेकर यांच्याकडे सोपविण्यात आले. त्यांनी अत्यंत कुशलतेने मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम पूर्ण केले आणि हा संकल्पपूर्तीचा क्षण आला. २ ऑक्टोबर २०१० ला सीता मंदिराचा लोकार्पण सोहळा करण्यात आला. आदरनीय शरद जोशीच्या ''अमृत महोत्सवी'' वर्षात हा संकल्पपूर्तीचा कार्यक्रम घेण्यात आला. त्याचवेळी अयोध्या विवादाच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर देशभर तणाव पसरला होता. निकालाच्या दिवशी सर्वत्र शुकशुकाट, सर्व रस्ते निर्मनुष्य, लोकांनी स्वयंघोषित संचारबंदी पाळली. २ ऑक्टोबरला सेवाग्राम येथे होणारा काँग्रेसचा मेळावा होता. पण स्वतः सोनिया गांधीचा कार्यक्रम सुरक्षिततेच्या कारणाने रद्द करण्यात आला. सत्ता राज्य काँग्रेसची पण त्यांचाच कायदा, सुव्यवस्थेवर विश्वास नव्हता.

परंतु रावेरीचा कार्यक्रम मात्र ठरल्यावेळी २ ऑक्टोबरलाच झाला. सीता मंदिराच्या लोकार्पण सोहळ्याला जमलेल्या गर्दीने चमत्कार घडविला. रावेरी हे आडवळणाचे



गाव, प्रवास साधनाची सुविधा नाही, कुठलेही प्रलोभन नाही तरीही २५ हजाराचा हा मेळावा यशस्वीपणे पार पडला. कायदा आणि सुव्यवस्थेला कुठलाही धक्का न लागता, आदरनीय शरद जोशीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि स्वयंसिद्धा सीतेविषयी आदर व्यक्त करून सन्मान करण्यासाठी शेतकरी स्त्रिया आणि पुरुष रावेरीत दाखल झाले. त्याचवेळी कापसावर निर्यातबंदी लावून भाव पाडण्याचे काम सरकारने केले. त्यासाठी हाताची मूठ उंचावून निर्यातबंदी लागू न देण्याचा निर्धार अनेक सीतांनी केला आणि या सरकारला इशारा दिला.

२ लाखांवर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. यवतमाळ जिल्ह्यात तर आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. संपूर्ण कुटुंब वाऱ्यावर सोडून घरातील कर्ता माणूस निघून

गेला. शेतीमालास उत्पादन खर्चावर भाव न मिळाल्याने शेती परवडत नाही, कर्ज फिटत नाही, मुलीचे लग्न, मुलाचे शिक्षण करता येत नाही, म्हणून निराश झालेल्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केली.

त्यानंतर अत्यंत बिकट परिस्थितीत घर, कुटुंब, शेती चालवण्याची जबाबदारी शेतकरी बाईने मोठ्या खंबीरपणे स्वीकारली ती परिस्थिती समोर डगमगली नाही. स्वयंसिद्धा सीता तिच्या अस्मितेच प्रतीक आहे. प्रत्येक स्त्रीच्या मनात वागण्यात सीता आहे. आजही कर्ज, वीजबील, शेतीमालाचा भाव, कापूस या अनेक प्रश्नाचा ती खंबीरपणे सामना करीत आहे. हे तिचे कर्तृत्व नाकारून चालणार नाही. ती या खुल्या व्यवस्थेत स्वतंत्रता वादाचा पुरस्कार करीत खंबीरपणे उभी आहे. ही गावागावातील शेतकरी स्त्री वाल्मिकी ऋषीच्या सीतेइतकीच सहनशील, संयमी, कर्तृत्ववान आणि खंबीर आहे.

रावेरी आणि शरद जोशी यांचे असे हे लोकविलक्षण अतुट नाते. त्यांना या जीर्णोद्धाराचे भाग्य मिळाले. सीता मंदिराचा जीर्णोद्धार हा खऱ्या खुऱ्या स्त्री शक्तीचा सन्मान आहे.

– शैलजा देशपांडे
आर्वी, जि. वर्धा

कृषी उत्पन्न बाजार समिती, सिंदी

उपबाजारपेठ सेलु

फोन क्र. सिंदी–०७१५५–२६६२३७, २६६३०६

सेलु–२२१२४५

शेतकऱ्यांना हार्दिक शुभेच्छा!

१) समितीच्या सिंदी व उपबाजारपेठ सेलु येथील मार्केटला मोठ्या प्रमाणावर धान्य व कापसाची आवक रोज खरेदी विक्रीची व्यवस्था कापुस व धान्य लिलावाद्वारे विक्री यामुळे दर जास्त मिळतो.

२) उपबाजारपेठ सेलु येथे प्रत्येक मंगळवारला बैलबाजार भरविण्यात येतो.

–: शेतकऱ्यांना सुचना :–

१) शेतकऱ्यांनी आपला शेतमाल मार्केटमध्ये लिलावामध्येच विक्री करावा. २) आपला शेतमाल स्वच्छ करून आणावा यामुळे उच्च दर मिळण्यास मदत होते. ३) शेतमाल तारण योजना सुरू आहे. या योजनेचा लाभ घ्यावा. सोबत ७/१२ यात पेऱ्याची नोंद असणे आवश्यक. ४) ढगाळी वातावरण असल्यास माल विक्रीस आणु

आय.आय. सुफी	रामकृष्ण उमाटे	विद्याधर वानखेडे
सचिव	उपसभापती	सभापती

संचालक मंडळ : बबनराव हिंगणेकर, केशरीवदजी खंगारे, दिलीपराव भजभुजे, राजेशजी जयस्वाल, अनिलराव जिकार, मो.युसुफ शेख, दिलीपराव ठाकरे, सौ.निलीमाताई दंढारे, सौ.शिलाताई धोटे, गुणवतराव कडू, धनराजजी गिरी, संदीपराव वाणी, विठ्ठलराव कौरती, काशीनाथजी लोणकर, संजयराव तडस, अरुणराव चौधरी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय नागरी सहकारी पतसंस्था मर्या. धनोडी, र.न. ५४०

कार्यक्षेत्र : वरूड तालुका

'राजगृह' मुलताई रोड, आर.टी.ओ. चौक, वरूड, जि. अमरावती. दुरध्वनी : (०७२२९) २३४०९९

संस्था संपूर्ण संगणकीकृत, संस्थेची स्वत:ची इमारत, संस्थेची राजुरा बाजार येथे शाखा

करूणा ठेव योजना

अ.क्र.	दरमहा रक्कम	५ वर्षानंतर मिळणारी रक्कम
१)	रु. १०,०००/–	रु. ४२,७४५/–
२)	रु. २०,०००/–	रु. ८४,१५२/–
३)	रु. ३०,०००/–	रु. १,२६,२२९/–

परिणय ठेव योजना

दरमहा १००० रु. फक्त ५ वर्षाकरीता
गुंतवणूक करा आणि मिळवा २० वर्षांनी
रु. ३,४२,७२९/–

नगर ठेव योजना

१) १८ महिन्याकरीता ८% व्याजदर
ज्येष्ठ नागरिक ८.५०% व्याजदर
२) ८४ महिन्यात दाम दुप्पट
३) १० वर्ष ६ महिन्यात दाम तिप्पट

पेन्शन ठेव (मासीक प्राप्ती) योजना

(५ वर्ष मुदती ठेवी करीता
दरमहा ९% व्याज

मुदती ठेव पुर्नगुंतवणूक योजना

संचालक मंडळ : श्री. एस.एस. लोणारे, अध्यक्ष, श्री. एस.एस. डबरासे, उपाध्यक्ष श्री.एच.टी. गणवीर, श्री.डब्लु.एस. लांडगे श्री. सी.एच. हरले, श्री.डि.एल. भोयर, श्री.एन.बी. गोणारे, श्री.यु.जी.पाटील, श्री.एच.जे. नागदेवे, श्री.जी.एस. मेओलीया, श्री.पी.एच. कासोरदे, श्री.पी.एस. ठाकुर, सौ.बी.पी.पवार, सौ.एम.एस.पाटील, श्री.एन.टी. बारसागडे (व्यवस्थापक)

आमचं जग आमचं जगणं

सौ. प्रज्ञा बापट



अनुभूती

वर्ष होऊन गेलं. कोरोना जगभर थैमान घालतोय. लाखो माणसं मेलीत. जवळपास सगळे उद्योग, कारखाने बंद पडले. शिक्षणाचे कारखाने-शाळा, कॉलेज बंद, गल्ली गल्लीतले कोचिंग क्लासेस बंद. शेती आणि शेतकऱ्यांची काम मात्र सुरू होती. पुन्हा तीच अवस्था येण्याची भिती वाटत आहे म्हणून पुन्हा अमुक बंद, तमुक बंद असं बंद सुरू झालंय. काय काय बदल घडले या वर्षात? आम्ही शेतकरणी. आमचं जग वेगळं, जगणं वेगळं. शिक्षण संस्था बंद झाल्याबरोबर शहरात शिक्षणासाठी राहणारी मुलं-मुली खेड्यात परतली. अनिश्चिततेचं सावट सगळ्यांच्या चेहऱ्यावर. शेती पासून दूर नेणारी शिक्षणाची वाट त्यांना सापडली. शिकून कुठेही नोकरी करू पण बापाला कर्जाच्या ओझ्याखाली आयुष्यभर वाकवून ठेवणारी शेती नको. अशा निर्णयावर येऊन थांबलेली ही नवी पिढी. अतिशय अनिच्छेने पुन्हा खेड्यात आली.

खेड्यांतून शहरात जाऊच न शकलेल्याचं ठरलेलंच असतं. शेतीतली, मातीतली कामं करायची. कधी दारिद्र्य रेषेखाली म्हणून मिळणारी मदत घ्यायची तर कधी जातीनिहाय मिळणारी मदत घ्यायची. फुकट किंवा स्वस्त धान्य, संडास, टिनपाटाचं घर किंवा नशीब खूपच चांगलं असेल तर शेतात विहीर. दरवर्षी कर्ज काढून शेती करायची. बियाण्यांसारखं नशीबही बोगस. उधारीची खरेदी. हाक नाही, बोंब नाही. जे पिकेल ते मिळेल त्या भावात विकायचं. घरादाराला, शेतावावराला विस्कळीत पणा आलाय.

जुने दिवस आठवतात. गोठ्यात दोन तीन गाई, बैलजोडी, कौतुकाची एखादी म्हैस. घर कुडाचंच पण शेणाने सारवून सुरवून लख्ख केलेलं. जंगलातून सरपण आणायचं, विहिरीचं पाणी, उन्हाळ्यात अंगणाची शोभा, वाळवायला धान्य पसरलेलं, पापड, कुरडया, सांडगे आणि भाज्यांच्या वाळलेल्या खुला. पाऊस सुरू झाला की दिवस घरात उगवायचा आणि वावरात बुडायचा. झडीच्या दिवसांत घरीच वाकळ-गोधड्या शिवायच्या. उडीद, मूग, बरबटी निघाली की ज्वारीचं खुडणं आणि हिरव्या पऱ्हाटीतून पांढरा धोप कापूस निघाला की जीव आनंदाने हलका हलका व्हायचा. सीतादेवीची पूजा केली की जुन्या साड्या-लुगड्यांच्या खांदोड्या भरुभरु कापूस वेचायचा. गाठोडी आवळू आवळू बांधायची. घरच्या बुवांनी खाचरात गाठोडी चढवली की राजाची राणी झाल्यासारखं वाटायचं. पण हा शेतमाल हसऱ्या चेहऱ्याने बाजारात न्यायचा अन पडल्या चेहऱ्यांनी घरी यायचं.

शेतीच गणित वजाबाकीचंच. दोन चार वर्षांनी कधीतरी एखादं वर्ष बेरजेचं. तरी इथपर्यंत संसाराचा गाडा ओढत आणला. भाऊबंदही गावातच. कुणाची मुलं नोकरीला लागली की रात्रीतून वागणं बदलतं. नोकरीवर जाणाऱ्याची बायको जरा दिमाखात राहते. वावराचा धुरा ओलांडत नाही पण वांगे, मिरची, भेंद्र आणि वेलाचे कारले सुद्धा सुटत नाहीत. दुसऱ्याची जमीन केली असती तर मक्ता दिलाच असता. मग आपल्याच भाऊबंदाला तसं काहून ठेवायचं? मक्ता दिला की मोठं भगदाड पडायचं. लसूण जिऱ्याच्या डब्यात त्यातले १०-१५ रुपये वाचवून ठेवत जायचे. बचत करायची. पोरांना ट्युशनला उपयोगी पडतात. हिंमत करून पोरीला शहरात शिकायला पाठवलं. पोर समजदार आहे. मायबापांचे कष्ट समजतात तिला. शहरात खोली करायची तेव्हा तिच्या सोबत हिंडताना डोळ्यात पाणी यायचं. एक खोली तर बकऱ्यांच्या कोंडली एवढी. घरमालकीण ताजमहाल दाखवल्यासारखी बोलत होती. खेड्यातल्या असल्या तरी चांगल्या घरच्या पोरी आहेत ह्या मी न राहवून म्हटलं. मोठ्या खोलीचं भाडं ऐकून गपगार झाले.

आधी गावात भांडणं होत नव्हती का? सड्याचा शिंतोडा, सारवणाचा बोळा, कूपाची पऱ्हाटी, पेटवणाची तुराटी .....कशावरूनही भांडण. अगदी लाठ्या काठ्या घेऊन. पण दुसऱ्या दिवशी सकाळपासून गावात दुसरा दिवस सुरू व्हायचा. आताची भांडणं पुढाऱ्यांपर्यंत जातात. एवढ्याशा गावात ५-७ पक्षांच्या पाट्या लागल्या. तरणी पोरं जिल्ह्याच्या ठिकाणी जातात पुढाऱ्यांच्या घरी. कुठल्या कुठल्या स्कीमा मिळतात म्हणून दिवसचे दिवस त्याच्या अंगणात बसून राहतात. रोजंदारासारखं पडेल ते काम करतात. जेवण आणि दारू मिळाली की पोरं पुढाऱ्याकडे आयुष्य गहाण टाकतात.

एक पाटी शेतकरी संघटना अशी लागली तेव्हा गावात खूप काहीतरी चांगलं घडणार आहे असं वाटायला लागलं. २०-२५ वर्ष गाव शहाणं सुरतं झाल्यासारखं वागत होतं. घराघरातल्या लक्ष्मीला बरे दिवस आले. घरोघरचं दारू पिणं बरंच कमी झालं होतं. बायकोला मारणं तर थांबलंच होतं. त्या लाल बिल्ल्याचा एक रुबाब होता. आपसातले बेबनाव गावकरी विसरले. खरंच...फार काही मोठ्ठे बदल घडले नव्हते तरी गावांत आनंद होता. शरदभाऊंनी आम्हा शेतकरणींना बहिणी मानलं. इतका मोठा...मोठा माणूस...आमचा भाऊ! आम्ही हरखून गेलो होतो. बाईच्या जातीला असं मानापानांनी वागवणं, अदबीने बोलणं विसरूनच गेल्या होत्या अनेक जणी. घरोघरच्या लक्ष्म्या तेव्हा सुखावल्या होत्या. पण हळूहळू पुढाऱ्यांनी टोप्या बदलल्या.

बिल्ल्याचा विसर पडला. तरुण पोरं या –त्या पुढाऱ्याच्या मागे पुढे घोटाळू लागली. कुठेतरी नोकरी, कुठलं तरी कर्ज. कोंबड्या–बकऱ्यांसाठी निदान अनुदान मिळण्याच्या आशेने पुढाऱ्याभवती घुटमळायला लागले. गरजा खूप. गरजवंताला अक्कल नसतेच. अनेक पक्षांचे झेंडे खांद्यावर घेऊन मिरवतांना कर्ती–सवरती तरुण पिढी लाचारीचं जगणं जगायला शिकली. एक मग्रूर मिंधेपणा स्वभावात आला. कोणी काही भीक घातली की मिंध्यासारखं वागायचं. भीक मिळाली नाही की मग्रुरी दाखवायची. घामाच्या दामाचा हक्क मागता मागता भिकेचा हक्क मागणं सुरू झालं.

पुढाऱ्यांनी जातीच्या भिंती पुन्हा भक्कमपणे उभ्या केल्या. शेतकरी शेतकरी न राहता आपापल्या जातीचा झाला. शेतीचा मातीचा विसर पडला. मी शेतकरी आहे असं म्हणायला लाज वाटू लागली. शेतीचा तुकडा किंवा बैलजोडी विकून चपराशी झाले काही जण. लहानपणी एकत्र खेळताना, शिकतांना, जेवता खाताना वाढलेली पोरं पुढाऱ्यांच्या इशाऱ्यावर भांडायला लागली. निवडणुका आल्या की भांडणाला जोर येतो. ग्रामपंचायत निवडणूक म्हणजे लाचारीची आणि दहशतीची पहिली पायरी. सरपंचपद म्हणजे राष्ट्रपती पद असं वाटायला लागलंय. सर्वांना शेती सोडून सगळ्याची आवड. करोनाचं थैमान सुरू झाल्यावर आपापल्या गावाकडे परतणाऱ्या हजारो, लाखो लोकांच्या रांगा टी.व्ही वर बघितल्या आणि आपल्या पाया खाली आपली जमीन आहे... बघून हायसं वाटलं. शहरात गेलो नाही हे बरं झालं असं वाटतंय. असं निर्वासितांच अधांतरी जगणं नकोच. बदल तर घडणारच. आपणही बदलायला हवं. थकलं भागलं तरी पुन्हा उठायला हवं. अंधार पडला तरी पणती लावायला हवी. ओंजळीत जपायला हवी. देवाला प्रार्थना करायला हवी की, पुढाऱ्यांकडे गहाण पडलेल्या डोक्यातला अंधार दूर होऊ दे रे देवा!

– प्रज्ञा बापट

शरद जोशी यांची विचारसूत्रे

- सगळेच प्रचलित पक्ष समाजवादी आहेत
- गरिबी दूर करण्यासाठी काही करण्याची गरज नाही, फक्त आमच्या छातीवरून उठा
- खरा विकास नैसर्गिक/सहज असतो, मृगाच्या सरीने जमिनीतून कोंब फुटतात, त्यासाठी वेगळे काही करावे लागत नाही
- शेतीच्या शोषणातूनच भांडवल निर्मिती होते
- व्यक्तिगत स्वार्थ हाच अर्थव्यवस्थेचा पाया आहे

।। श्री संत सखुआई प्रसन्न।।

फोन नं. २६१२१६
मो. ९८६०५७३१८२

भूषण कृषी केंद्र

मेन रोड, बाजार चौक, (सिंदी रेल्वे),
ता. सेलु, जि. वर्धा

आमचे येथे सर्व प्रकारची रासायनिक खते, किटकनाशके व बि-बियाणे मिळेल.

प्रोप्रा. सुरेशभाऊ लेंडे

फोन नं. (ऑ.) २६६२६३
(नि.) २६६२६४

मे. किर्ती मशिनरी

सिंदी रेल्वे, ता. सेलू, जि. वर्धा

प्रो. निळकंठराव घवघवे

वितरक :



- कोरोमंडल इंटरनॅशनल लि.
- सल्फर मिल्स, मुंबई
- भारत इन्सेक्टीसाईड, दिल्ली
- तुलशी सिडस् लि., गुंटूर
- सेन्ट्रोमेअर बॉयो सोल्यूशन, हैद्राबाद
- दफ्तरी सिडस्, सेलू
- PHG इंडस्ट्रीयल इंन्स्टिट्यूट, कोईमतूर
- प्लुगा पम्प्स ॲन्ड मोटर्स, बडोदा
- रॉकेट इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन प्रा.लि., कोल्हापूर
- पारस इरिगेशन लि. अहमदनगर

सगळ्यात महत्त्वाची मानवताच!

अमृता खंडेराव



प्रत्येक विचारवंत, प्रज्ञावान आणि विद्वान लेखकाची विचाराची, लेखनाची आणि व्यक्त होण्याची आपापली वैशिष्ट्यपूर्ण शैली असते. त्या-त्या शैलीचे असंख्य चाहते असतात. विचारस्वातंत्र्य अबाधित असलेच पाहिजे. पण शैली किंवा विचारधारा कुठलीही असली तरी मनुष्याचं कल्याण, प्रगती आणि समानता हेच प्रत्येक कलेचं अंतिम ध्येय असलं पाहिजे. मानवजातीचं अकल्याण किंवा विषमतेची निर्मिती करणारी कला ही निषेधार्हच असली पाहिजे.

बोधिसत्व फाउंडेशनच्या कार्यक्रमात सुरुवातीला आम्ही चिमुकल्या रोपाची पूजा करून सुरुवात करत होतो. पुढे अनेक सत्कार-समारंभप्रसंगी लोकांनी आम्हाला अनेक भेटवस्तू दिल्या. त्यात गणपतीची प्रतिमा, गौतम बुद्धांची मूर्ती इतकंच नव्हे तर एका काकूंनी मला चक्क पितळी अन्नपूर्णा भेट दिली. पहिल्यांदा गौतम बुद्ध माझ्या डायनिंग टेबलवर विराजमान झाले. मग पहिला घास घेण्यापूर्वी आपोआप हात जोडले जाऊ लागले. प्रत्येक जिवाला असेच उत्तम अन्न मिळावे अशी प्रार्थना मनात उमटू लागली. मग बाप्पा आले. तेही बुद्धांच्या मांडीला मांडी लावून विराजित झाले. मग अन्नपूर्णाबाई आल्या. त्याही बाजूलाच आसनस्थ झाल्या. माझ्या घरात देवघर नाही. देवांना आम्ही मनातच ठेवतो. आणि कुठलीही कृती करताना मनुष्यातल्या देवत्वाचं भान ठेवण्याचा सतत प्रयत्न करत राहतो. आमच्या घरी येणाऱ्या सर्व अतिथींचं शक्य तितक्या पाहुणचाराने स्वागत करतो.

एकदा अचानक एक विद्वान सद्गृहस्थ आमच्या घरी आले. जेवण्याचीच वेळ होती. इतकं मान्यवर व्यक्तिमत्त्व पंगतीला लाभणं म्हणजे दुर्मिळच. मी भारावून गेले होते. ते बोलत होते आणि आम्ही जिवाचा कान करून ऐकत होतो. अपॉईंटमेंट घेऊनही ज्याला भेटणं म्हणजे एक दिव्य इतका मोठा माणूस आज आमच्या घरात आमच्या सोबत जेवण करणार होता. मी बागेतली आंब्याची पानं तोडून त्यांच्या पानाभोवती रांगोळी सजवली. उदबत्त्यांचं झाड लावलं. टेबल सुरेख सजवला. सर आत आले. टेबलाची सजावट पाहून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि प्रसन्नता उमटली. अरे वा, फारच सुंदर. असं म्हणून ते खुर्चीवर बसले. स्वयंपाक मी खूप मन लावून केला होता. ताट दिमाखात दरवळत होतं..... अन् ताटाकडे हात नेणार एवढ्यात सरांची सूक्ष्म नजर मूर्त्यांकडे गेली. ते क्षणार्धात माझ्या बायकी नजरेनं टिपलं. अरे हा काय मागासपणा या देवा-बिवाच्या मूर्त्या कशाला इथे मांडल्यात. बुद्धाची मूर्ती ठीक आहे हे बाकीचं कशाला ठेवलंय इथं...

मी प्रेमानं, आग्रह करून त्यांना पोटभर जेवू घातलं. इतक्या मोठ्या विद्वानाशी वाद घालायला मी कोण लागून गेले होते? मी एक साधी गृहिणी. आपल्या घरी आलेल्याचं होईल तितकं करायचं, हे माझं काम, हाच माझा धर्म.

जेवणाच्या टेबलावर मूर्त्या ठेवणं हा त्यांना मागासलेपणा वाटला. त्यातही गणपती आणि अन्नपूर्णा त्यांच्या बुद्धीला टोचले. त्यांचं नाव घेणंही त्यांनी टाळलं. खरंच दुसऱ्याच्या धर्माला कमी लेखणारा धर्म किंवा त्या धर्माची व्यक्ती महान असते का? पान पिंपळाचं असो की आंब्याचं, दोन्ही निसर्गाचाच भाग आहे. कुठलाही धर्म निसर्गविरोधी असूच शकत नाही. मी स्वत: ना ही मूर्तिपूजक आहे ना मूर्तिभंजक. या सगळ्या मूर्ती मला भेट म्हणून आलेल्या होत्या. मला प्रेमाने भेट देणाऱ्या माणसांच्या श्रद्धा आणि शुभकामना सदैव माझ्यासोबत, डोळ्यासमोर राहाव्यात म्हणून मी त्या स्वयंपाकघरात ठेवल्या.

मूर्ती भेट देणारा माणूस आणि त्याचं शुभचिंतन मला महत्त्वाचं वाटलं. मी ते स्वीकारलं. इथे ती व्यक्ती कुठल्या धर्माची आहे याला मी काडीइतकंही महत्त्व देत नाही. माझी आई शिक्षिका होती. तिच्या वर्गातली नव्वद टक्के मुलं शेतकऱ्यांची असत. त्यांच्या आया वर्षभर आम्हाला वानवळा म्हणून शेंगा, काकड्या, भाज्या, तीळ असं काही-बाही देत. ते खाताना आम्हाला त्यांची जात-धर्म कधी आठवला नाही. ती लोकं त्यांच्या घरी कुठले देव पुजतात याची आम्ही कधीच विचारपूस केली नाही. मनुष्य, मनुष्यधर्म हेच जगण्याचं अंतिम ध्येय आणि यशसुद्धा.

भारतासारख्या धर्मबहुल, जातीबहुल अठरापगड लोकांनी गजबजलेल्या देशात अठरापगड धर्मांची प्रतीकं, मूर्त्या, आरत्या सगळं ओघानंच येणार. हे टाळून कुणाच विचारवंताला पुढे जाता येणार नाही. देश आधी. बंधुभाव आधी. अहंकार आणि भूमिका नंतर. मूर्तीमागे परंपरा आहे, परंपरेमागे श्रद्धा आहे, श्रद्धेमागे माणूस आहे. या सगळ्यात माणूस महत्त्वाचा. मानवता महत्त्वाची. बाकी सर्व व्यर्थ.

– अमृता खंडेराव

शरद जोशी यांची विचारसूत्रे

- शेतकऱ्यांना हवे बाजारपेठ आणि तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य
- सर्व सरकारी देणी आणि कर्जे अनैतिक आणि बेकायदेशीर
- शेती ही जीवनशैली नसून व्यवसाय आहे
- शेतीची लूट चालूच आहे, फक्त लुटणारे बदलले
- शेतकरी तितुका एक एक
- लक्ष्मिमुक्ति हे मंगल सावकाराचे देणे आहे

रानाच्या हिरव्या बोलीचा गझलकार गंगाधर मुटे

बदीऊज्जमा बिराजदार (साबिर सोलापुरी)



साहित्यशेती

गंगाधर मुटे हे शेतकरी चळवळीतील आजचे आघाडीचे, सर्वश्रुत नाव आहे. शेतकरी साहित्यातून शेतकरी चळवळ जोमदारपणे फोफावली पाहिजे, दमदारपणे बहरली पाहिजे याकरिता ते अहोरात्र कष्ट उपसत आहेत. गंगाधर मुटे यांची गझल शेती-शिवाराशी इतकी एकजीनसी झाली आहे की, तिला मातीपासून वेगळे करता येत नाही. किंबहुना त्यांची प्रत्येक गझल मातीचा गंध घेऊनच जन्माला येते. गझल हा अत्यंत ताकदीचा काव्यप्रकार असल्याने या गझलेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या दुःखाला उद्गार मिळावा, त्यांच्या व्यथा वेदना उजागर व्हाव्यात, या आंतरिक जिव्हाळ्याने मुटे सातत्यपूर्वक रानाच्या हिरव्या बोलीच्या गझला लिहित आहेत. मुटे हे एका सामान्य शेतकरी कुटुंबातून आलेले गझलकार आहेत. स्वतः हाडाचे शेतकरी आणि शेतकरी चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते आहेत. त्यामुळे सहाजिकच त्यांनी महाराष्ट्रातील तमाम शेतकरी बांधवांच्या नित्याच्या समस्या समभावाने जाणल्या आहेत.

लाख जिवांचा पोशिंदा असलेला शेतकरी समाधानात जगला पाहिजे. सुखाचे दोन घास त्याला वेळेवर मिळाले पाहिजेत. शेतकऱ्यांची सततची हलाखीची परिस्थिती संपून त्यांना सुगीचे दिवस यावेत. शाश्वत विकासाशिवाय समृद्धी येत नाही. हे त्यांना सुरुवातीपासूनच ठाऊक असल्यामुळे शेतकऱ्यांचा शाश्वत विकास झाला पाहिजे. अशी रास्त अपेक्षा बाळगणाऱ्या मुटे यांच्या गझललेखनाचा व कार्याचा शेतकरी हाच केंद्रबिंदू राहिला आहे. 'माझी गझल निराळी' असे छातीठोकपणे सांगत गझला लिहिणाऱ्या मुटे यांनी गझलेचे प्रांत समृद्ध केले आहे. असे म्हटल्यास मुळीच वावगे ठरणार नाही. शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य मिळाले पाहिजे. असा ठाम आग्रह धरणाऱ्या मुटे यांच्या नेतृत्वाला शेतकरी असो वा कष्टकरी यांची खंबीर साथ लाभत आहे. मातीवरील प्रगाढ निष्ठेने ते गझल लेखन करीत आहेत. निष्ठेतून लेखन घडत गेले की, त्याला वांङ्मयीन दर्जा प्राप्त होत जातो. केवळ शेतकरी या विषयावरील त्यांचा 'माझी गझल निराळी' हा गझलसंग्रह याचीच ग्वाही देतो. जागोजागी चैतन्याचे मळे फुलवीत, जागवीत निघालेली त्यांची गझल विलक्षण निराळेपणामुळेच आज मराठी गझलेच्या प्रांतात खचितच उठून दिसते. वाचकांच्या मनाला भुरळ पाडते. त्यांच्या सर्जनशील, संवेदनशील मनाचे प्रतिबिंब त्यांच्या प्रत्येक रचनेत पडलेले आपणास प्रकर्षाने दिसून येते. त्याची स्पंदनशीलताही वाचकांना ऐकू येते. ही अतिशय प्रशंसनीय गोष्ट आहे. म्हणूनच 'माझी गझल निराळी' या शीर्षकाच्या दाव्यातील यथार्थताही पटते.

'शेतकऱ्यांचे मरण हेच सरकारचे धोरण' अशा आजच्या अतिशय प्रतिकूल आणि जीवघेण्या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाचवीला पूजलेली दैन्यावस्था हटविणारी अर्थव्यवस्था हवी अशी रोखठोक भूमिका घेऊन मुटे हे गझल लेखनाचा प्रपंच करीत आहेत. ही स्वागतार्ह बाब आहे. निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असलेल्या कोरडवाहू शेतीचाच अधिकाधिक उत्कर्ष साधून तिची उत्तमप्रकारे उत्पादकता वाढविणे आणि त्यायोगे तिच्यावर अवलंबून असलेल्या आपल्या शेतकरी बांधवांना समर्थ आणि स्वावलंबी बनविणे निव्वळ दलालांच्या तुंबड्या न भरता शेतकऱ्यांच्या मालातून त्याला आधारभूत किंमत कशी मिळेल, शेती हा व्यवसाय शेतकऱ्यांसाठी कसा लाभदायी ठरेल या तळमळीने मुटे गझला लिहित आहेत. या गझलकाराचा मूळ पिंड रानावनात रमणारा आहे. बांधावर विसावणारा आहे. आभाळाच्या हाकेला ओ देणारा आहे. मृदगंधाने धुंद होणारा असा आहे. निसर्गाच्या सानिध्यात या गझलकाराची सर्जनशीलता अधिक भरात येते.

दारिद्र्याचं, कर्जबाजारीपणाचं भीषण रूप दाखविणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा सध्याचा सर्वात ज्वलंत प्रश्न आहे कितीही संकटे आली तरीही आत्महत्या हा त्यावर उपाय होऊ शकत नाही. कारण शेतकऱ्याने आत्महत्या केली तर त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या बायका, पोरांनी, गुरांनी काय करायचं? आत्महत्येचा मार्ग हा अत्यंत भ्याड मार्ग होय. हे मनाने खचून गेलेल्या शेतकऱ्यांना सांगायचेही मुटे विसरत नाहीत. त्याचबरोबर आपल्या न्याय्य हक्कांसाठी आता रडत बसण्यापेक्षा शेतकऱ्यांनी व्यवस्थेच्या दमनशाहीविरुद्ध निर्धाराने लढले पाहिजे. भिडले पाहिजे. असा निर्भिडपणे जगण्याचा मूलमंत्रही मुटे त्यांच्या अनेक गझलांमधून आवर्जून देतात.

पाऊस कुठे मुसळधार बरसतो तर कुठे त्याचा साधा टिपूसही नसतो. हवामान खात्यालाही त्याचा थांगपत्ता लागत नाही. हवामान खात्याचीच पाऊस जणू परीक्षा घेत असतो. पावसाच्या लहरीपणाचा फटका बसतो तो शेतकर्यांनाच. निसर्गाच्या अवकृपेने होणारी सततची नापिकी, डोक्यावर चढलेले खासगी सावकारांच्या कर्जाचे ओझे. या आर्थिक अडचणीत प्रपंचाचा गाडा ओढणे जिकरीचे झाल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या दिवसागणिक वाढत आहेत. ज्या वेळेस पावसाची आत्यंतिक निकड असते तेव्हा पाऊस कधीच येत नाही. जेव्हा गरज नसते तेव्हा मात्र तो मनमुराद बरसत असतो. निसर्गातील हा विरोधाभास चक्रावून टाकणारा आहे. यावर मुटे यांचा शेर येतो तो असा.

नापिकीच्या पावसाने काळही सोकावलेला
या शिवाराचा जणू तो नेमला विश्वस्त आहे

हंगाम आणि ऋतूही बेमान झाला की अवकाळी पाऊस अवकळा निर्माण करतो. हातातोंडाशी आलेले उभे पीक हिराहून नेतो. शेतकऱ्यांचे कंबरडे मोडते. आता जगायचे कसे? या विवंचनेत शेतकरी धास्तावून जातो. पोटाच्या खळगीची भ्रांत वाढत जाते. जगण्यासाठी धडपडणार्या शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा अवकाळी पाऊस वाढवत जातो. हे नेहमी पाहावयास मिळणारे चित्र आहे. यात वर्षानुवर्षे फारसा फरक पडत नाही मुटे म्हणतात.

भाजून पीक सारे, पाऊस तृप्त झाला
उध्वस्त शेत आधी, मागून थेंब झाला

कधी गारपीठ तर कधी अतिवृष्टी यामुळेही शेतकऱ्यांचे अपरिमीत नुकसान होते. तर कधी पाऊस ढगामध्ये दडी मारून बसतो. तेव्हा जमिनीतली ओल संपून जाते. पेरलेल्या बियाणांची उगवण होत नाही. शेती उध्वस्त होऊन जाते. बळीराजाच्या डोळ्यातील पाणी काही केल्या थांबत नाही. दुष्काळ असो की गारपीट, अतिवृष्टी असो. ही सर्व संकटे शेतकऱ्यांच्या जिवावर उठलेली असतात. हा अनुभव नवा नाही. याची चिंता मुटे यांनाही सतावणारी आहे.

भुईला दिली ओल नाही ढगाने
कसे अंकुरावे आता ते बियाणे

शेतकऱ्यांचा कैवार घेणारे आणि व्यवस्थेला जाब विचारणारे कितीतरी शेर गंगाधर मुटे यांनी लिहिलेले आहेत. अस्थी कृषीवलांच्या, मरणे कठीण झाले, 'पाकनिष्ठ' कांदा, लुडबुडतो, हे रान निर्भय आता, शेत लाचार झाले आदी गझलांमधून त्यांनी शेतकर्यांचा आकांत बुलंद केला आहे. धोरणकर्त्यांपर्यंत तो पोचवावा ही त्यामागील त्यांची प्रामाणिक तळमळ आहे. या तळमळीतूनच मुटे यांनी कृषिप्रधान देशातील शोकांतिका वेशीवर टांगली आहे. व्यवस्थेने त्याकडे उघड्या डोळ्यांनी पाहिले पाहिजे.

शेतकऱ्यांच्या घामाला वाजवी मोबदला मिळायला हवा. हा मुद्दा ते सतत हिरिरीने मांडत असतात. आपल्या न्याय्य मागण्यांसाठी चळवळीच्या माध्यमातून आंदोलन कसे उभारायचे असते याचे शेतकऱ्यांना सांगोपांग मार्गदर्शन ते कृतीतून करत आहेत. 'शेतीमालाला रास्त भाव' या एक कलमी कार्यक्रमांसाठी ते मोठा लढा देत आहेत. कांदा, ऊस, कापूस, हापूस या पिकांसाठी ते शेतकरी चळवळीचे यशस्वी नेतृत्व करत आहेत. यासाठी त्यांना अनेकदा तुरुंगवासही झाला. पण त्याची त्यांनी तीळमात्र तमा बाळगली नाही. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी संघटनेमार्फत जे जे करणे शक्य आहे, ते ते प्राणपणे करत आहेत. एकीकडे शेतकऱ्यांच्या चळवळीला धार देत असतानाच दुसरीकडे त्यांचे गझल लेखनही नियमितपणे सुरूच आहे. यामुळेच त्यांची ग्रंथसंपदाही विपुल आहे. शेतकरी संघटनेचे प्रणेते शरद जोशी यांच्यानंतर गंगाधर मुटे यांनी त्याची धुरा आपल्या खांद्यावर समर्थपणे पेलली आहे.

'स्वप्नरंजन फार झाले' नुसत्याच कल्पनाविश्वात रममाण होणाऱ्या आभासी शेती साहित्याची शेतीमधल्या प्रत्यक्ष वास्तवाशी नाळ जोडली गेली पाहिजे. असे गंगाधर मुटे यांचे ठाम प्रतिपादन आहे. गेल्या सहा वर्षांपासून ते अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाचे पदरमोड करून आयोजन करीत आले आहेत. कित्येक लिहित्या हातांना व बोलत्या वाणींना त्यांनी हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. शेतकरी साहित्य चळवळीच्या दृष्टीने ही फार मोठी उपलब्धी आहे. हे नाकारून चालणार नाही. अखिल भारतीय साहित्य संमेलनास दरवर्षी लाखोंचा निधी देणाऱ्या महाराष्ट्र शासनाने आता त्याच धर्तीवर अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनासही भरघोस मदतीचा हात दिला पाहिजे. अशी माझी शासनदरबारी कळकळीची विनंती आहे. यंदा यवतमाळ जिल्ह्यात होणार्या सातव्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास आणि गंगाधर मुटे यांच्या पुढील वाटचालीस माझ्या आभाळभर शुभेच्छा!


बदीऊज्जमा बिराजदार
(साबिर सोलापुरी)
भ्रमणध्वनी क्रमांक: ९८९०१७१७०३
conctactsabirsolspuri.com

♦ ♦ ♦

विनम्र अभिवादन!



श्रीरंगराव मोरे नाना'' अंबाजोगाई



डॉ. मानवेन्द्र काचोळे

धर्मनिरपेक्ष भारताला हवेत निःस्वार्थी सत्ताधिश

चिमणदादा पाटील दहिवदकर



भारत हा जगात सर्वात मोठा लोकशाहीप्रधान व कृषीप्रधान देश म्हटला जातो. पण सध्याच्या तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात व जागतीक खुल्या आर्थिक व्यवस्थेच्या युगात, या देशातील राज्यकर्ते व सर्व पक्षाचे नेते या देशावर शेतकरी आत्महत्या प्रधानतेचा साजशृंगार चाढविण्याचे धोरण राबवित आहेत.

वास्तविक धर्मनिरपेक्ष भारताला हवेत ज्ञानी, निःस्वार्थी व समर्थ सत्ताधिश. भारताच्या अर्थव्यवस्थेचे खऱ्या अर्थाने उगमस्थान कृषी क्षेत्राशी निगडीत आहे. त्या दृष्टीने कृषी उत्पादित मालावर प्रक्रिया करणाऱ्या मालांचे जाळे निर्माण करणाऱ्या उद्योगाच्या धोरणाला अग्रक्रम देवून त्याला गती दिली पाहिजे. पण आज प्रत्यक्षात एकाच गावात अनेक छोटे-मोठे देवळे निर्माण करण्याचा शिष्टसंप्रदाय पडला आहे.

याला कारण शेकडो वर्षाच्या पुराणाच्या गुलामगिरीने पागल बनलेल्या हजारो भोळसट हिंदु देवळांना गावे, जमिनी, दागदागिने आंदन दिलेली आहेत. आज देखील ती परंपरा जोपासली जात आहे. या बाबत महात्मा ज्योतीबा फुले यांनी स्थापन केलेल्या ''सत्यशोधक समाजाचे'' धडाडीचे कार्यकर्ते ज्यांच्या कार्याची स्तुती संपूर्ण महाराष्ट्राने थोरली गाईली जायची असे क्रांतीकारी पुरुष प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांच्या ''देवळांचा धर्म व धर्माची देवळे'' या पुस्तकातील विचार त्यांच्याच शब्दात सारांश रूपात.

के.सी. ठाकरे म्हणतात आजचा हिंदु समाज-समाज या नांवाला कुपात्र ठरला आहे. हिंदुधर्म हे एक भले मोठे भटी गौडबंगाल आहे आणि हिंदु संस्कृती म्हणजे एक बिनबुडाचे पिचके गाडगे आहे. यापेक्षा त्यात विशेष असे काही नाही. (पृ.२) आमचा आजचा धर्म हा मुळीच धर्म नव्हे. प्रचलित भिक्षुकशाही वर्ग म्हणजे खुळ्या बाबळ्यांना झुलवन भटांची तुंबडी भरणारे एकपात्री थोतांड आहे. देवळांची उत्पत्ती ब्रह्मदेवाच्या बारशीला झालेला नाही. हिंदुधर्माची अगदी अलीकडची कमाई आहे. बौद्धधर्म हिंदुस्थानातून परागंधा होईपर्यंत भारताच्या इतिहासात या देवळांचा कोठेच सुगावा लागत नाही मात्र तोपर्यंत हे आमचे हिंदुदेव थंडीवाऱ्यात व उन्हातान्हात धडपडत पडले होते तरी कोठे? विद्वान संशोधकांच्या मते आधिच्या ऋगवेद काळाची गणणा जास्तीत जास्त इ.स. पूर्वी ७००० वर्ष धरली तर इतकी वर्षे हे मोक्षदाते देव देवळा शिवाय जगले तरी कसे आणि कोठे?

आज त्यांचा देवळातला थाट पाहील्यावर जीवंत माणसाला एक वेळेच्या कोरड्या भाकरीची पंचाईत, पण या देवांना सकाळी न्याहारी, दुपारी पंचपक्वांनाचे ताट पुन्हा तीन प्रहरी टिफीन आणि रात्री जेवण. या शिवाय काकड आरत्या, माकड आरत्या, धुपारत्या, शेजारत्या आहेतच. देवांना छपरी पलंग, मच्छरदाणी गाद्या-गिरद्या, शिवाय भागायचे नाही. खुशाल चेंडू श्रीमंताप्रमाणे अखंड ऐश्वर्यात लोळणाऱ्या देवांची स्थिती देवळे निर्माण व्हावयाच्या आधी (पूर्वी) कशी असावी याची प्रत्यक्ष प्रदर्शने म्हणून तर भिक्षुकशाहीच्या आद्य शंकराचार्यांनी मांगवाडे, धेड्याडे, भंगीवाडे निर्माण करून ठेवले असावेत काय? आमची खात्री आहे की देवळे नव्हती तेव्हा आमच्या देवांच्या नशिबी महारमांगा प्रमाणेच म्हसणवटीची कर्म प्राप्त राहणी लागली असावी. या राहणीतून आपला उद्धार व्हावा आणि काकड माकड आरत्यांचे आणि घंटा नगाऱ्याचे ऐश्वर्य आपणास लाभावे, म्हणून आमच्या देवळ्या देवांनी भटांची खूप पाय चाटणी केली. तेव्हा भटांच्या वेदोक्त मेहरबानीने त्यांना तुरूंग वजा देवळातली भट यांची विलासी राहणी लाभली. (पृ.३)

स्थुलभावाने दुसऱ्या तिसऱ्या शतकापर्यंत हिंदुजनात व हिंदुस्थानात देवळे घुसलेली नव्हती. जीर्णमताभिमानी व आत्मवची स्वाभिमानी भटाच्या भिक्षुकशाहीने नवमतवादी बौद्ध धर्माचा पाडाव करून भटीवर्चस्व स्थापण्यासाठी इ.स. २ ऱ्या शतकात महाभारत व रामायणाच्या जुन्या आवृत्त्यात मनसोक्त घासघुसडीच्या फोडणीने फुगविल्यात व मनुस्मृतीला जन्म दिला. पण त्या काळात कोणत्याही वांङमयात देव-देवळे आढळून येत नाहीत. नाही म्हणायला, बौद्धधर्मीय अशोक सम्राटाच्या आमदानी पासून बौद्ध भिक्षुकाच्या योगक्षेत्रासाठी व स्वाध्यायासाठी ठिकठिकाणी मोठे विहार, लेणी, गुहा, मंदिरे ही अस्तीत्वात आलेली होती. पुढे या संघ मंदिरात बुद्धमुर्ती स्थापन करून त्यांच्या पुजाअर्चा बौद्ध धर्माच्या हिनप्यान पंथाने सुरू केली. (पृ.७)

हिंदुस्थानात देवळांचा उगम शोधीत गेलो तर तो बौद्धविहारात सापडतो. इ.स. ७ व ८ व्या शतकात भिक्षुकशाहीचे उद्धारक आद्य शंकराचार्य यांचा अवतार झाला. त्यांनी बौद्धाच्या भयंकर कत्तली करून त्या विहारांची नासधुस केली, तसेच विहारातील पवित्र बौद्ध मुर्तीचा उच्छाद करून तेथे शंकराच्या पिंडीची स्थापना केली. काही ठिकाणी बौद्ध मुर्तीत थोडा बदल करून त्यांचा शंकराच्या मुर्तीचा बाप्तिस्मा (दिक्षा) दिला. उरलेल्या बौद्धांना देशोधडीला लावले. लक्षावधींना म्हसणवटीत पार धुडकावले. या दुर्दैवी लोकांची माणूसकी ही हिरावून घेतली. अशा रितीने हिंदुस्थानात हिंदुसमाजात अगदी पहिल्यांदाच आद्य शंकराचार्याने

अस्पृष्यता निर्माण केली.

शंकराचार्याच्या भिक्षुशाहीचा हात फिरताच या विहारातून त्यांची ताडकन स्मशाने बनलित ते गरीब जनसेवक बौद्ध भिक्षुक रसातळाला गेलेत. त्यांचा अहिंसावाद हवेत विरघळला. ताबडतोब प्रत्येक विहारात, लेण्यात उग्रदेवांची व देवतांची देवळे उगवलीत आणि त्यांना कोंबड्या-बकऱ्यांच्या कंदुऱ्यानी संतुष्ट करणाऱ्या भक्तजनांच्या टोळ्या लाखानी मोजण्या इतक्या फुगल्या. याचवेळी अठरा पुराणाची पैदास झालेली असल्यामुळे हिंदु समाजातल्या व्यक्तीमात्राची नाती गोती जरी जातीभेदाच्या घरट्यात बेगुमानपणे भरडली गेली होती तरी देवांच्या आणि देवीच्या गोतवळ्याची आळी सताड मोकाट सुटलेली होती. माणसाप्रमाणेच देवांच्या मागेही बायकामुलांची लचांडे निर्माण झालीत. (पृ. ९)

(संदर्भ :- बौद्ध धम्म - वैदिक धर्म - का.शि. संकार्य)

चिमणदादा पाटील दहिवदकर
मो. ८४५९७५६२८१

♦ ♦ ♦

शरद जोशी यांची विचारसूत्रे

- विकास म्हणजे स्वातंत्र्याच्या कक्षा, निवडीचे स्वातंत्र्य
- स्त्री-मुक्तीतच स्त्री-पुरुषमुक्ती
- दोन प्रौढ व्यक्तींमधले परस्पर संमतीने होणारे संबंध पूर्णपणे वैध व नैतिक असतात.
- माझा खाजगी नरक मला प्यारा आहे
- कोणतीही व्यक्ती अथवा ग्रंथ सार्वकालिक सत्य असू शकत नाही
- कमीत कमी शासन हेच चांगले शासन असते
- शासनाच्या पसाऱ्याची छाटणी
- स्त्रीमुक्ती ही स्त्री-चळवळीपेक्षा तंत्रज्ञानाने जास्त झाली
- प्रत्येक व्यक्ती समान नसून एकमेवाद्वितीय आहे



७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!



किसान
ट्रेडींग कंपनी
सिंदी रेल्वे

७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!



श्री. इंदरचंदजी बैद
खैरी, जि.यवतमाळ

७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!



श्री सुभाष बोकडे
कुरझरी, जि. वर्धा

७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!



श्री मुकुंद खोडे
सेलडोह



७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!
श्री रविंद्र खोडे
सेलडोह, जि. वर्धा



७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!
श्री पंढरीनाथ पाटील काकडे
आष्टोणा



७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!
श्री ललित जयस्वाल
धामणगाव, जि. यवतमाळ



७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!
श्री नंदकिशोर खेरडे
चांदुर रेल्वे, जि. अमरावती



७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!
श्री प्रभाकरराव झाडे
ममदापूर, जि. वर्धा



७ व्या अखिल भारतीय मराठी
शेतकरी साहित्य संमेलनास
हार्दिक शुभेच्छा!
श्री प्रकाशराव कोरेकर
ममदापूर, जि. वर्धा



७ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!

श्री नजमोद्दीन शेख

कुरणोली, जि. नाशिक



७ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!

श्री सोपान संधान

कुरणोली, जि. नाशिक



७ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!

श्री निवृत्ती करडक

कुरणोली, जि. नाशिक



७ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!

श्री कडूअप्पा पाटील

किनगाव, जि. जळगांव



७ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!

श्री जगदिशभाई विश्रामभाई पटेल

सिंदी रेल्वे, जि. वर्धा



७ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!

श्री होमदेव हरिभाऊ कनाके

मारेगांव, जि. यवतमाळ



७ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!

श्री उद्धव नानाजी हेपट

मारेगांव, जि. यवतमाळ



७ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!

श्री पंढरीनाथजी बोथले

आष्टोणा, जि. यवतमाळ



७ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!

श्री किसनराव पावडे

आष्टोणा, जि. यवतमाळ



७ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!

सौ. कमल किसनराव पावडे

आष्टोणा, जि. यवतमाळ



७ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!

श्री किसनराव ठाकरे

आष्टोणा, जि. यवतमाळ



७ व्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनास हार्दिक शुभेच्छा!

श्री विठ्ठलराव येरगुडे

आष्टोणा, जि. यवतमाळ



दूरदृष्टी
प्रखर आत्मविश्वास
अद्ययावत तंत्रज्ञान
साधेल शाश्वत विकास



सर्व काही एका छताखाली.

आमच्या, जैन इरिगेशन सिस्टिम्स लिमिटेड (जैनस्) या कंपनीचे ध्येयवाक्य आहे "कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी." एक बिलीयन डॉलर्स वार्षिक उलाढाल असलेल्या आमच्या कंपनीत जगभरात दहा हजाराहून अधिक सहकारी कार्यरत आहेत. मूळ भारतीय असलेल्या या बहुराष्ट्रीय कंपनीचे जगभरात ३३ ठिकाणी उत्पादक प्रकल्प आहेत. जैनस् आणि तिच्या सहकारी कंपन्या या शेतीशी संबंधित असलेल्या सर्व प्रश्नाची उत्तरे शोधून त्यासाठी लागणाऱ्या साधनांची निर्मिती करण्यात गुंतलेल्या आहेत. यामध्ये सूक्ष्मसिंचन पद्धती, पीव्हीसी पाईप, एचडीपीई पाईप, प्लॅस्टिक शीट्स, शेती मालावरील प्रक्रिया, टिश्यूकल्चर रोपे, प्रिसीजन फार्मिंग तंत्रज्ञान, संरक्षित व बंदिस्त वातावरणातील शेती, अक्षय उर्जा निर्मिती यांचा समावेश आहे. गेल्या ३४ वर्षांपासून कंपनी शेती व शेती संबंधित क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे. कंपनीने सूक्ष्मसिंचनाचे आधुनिक तंत्रज्ञान प्रथम भारतात आणून पाण्याची बचत आणि उत्पादन वाढ यात भरीव काम तर केलेच आहे पण उत्पादकता वाढीत कळत नकळत एक हळूवार क्रांती घडवून आणली आहे. यामुळे देशातील जवळपास ८५.५ लाख छोट्या शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडले आहे. मोठ्या प्रकल्पावर 'एकात्मिक सिंचन पद्धती' जी राबविण्यात आली तिचाही प्रभाव मोठा आहे. 'पाणी थेंबानं पीक जोमानं' हा दृष्टीकोन बाळगून पाणी आणि अन्न सुरक्षितता सांभाळण्याचा प्रयत्न केला आहे. 'जैनस्' ने कृषी क्षेत्रात मुलभूत व पायाभूत स्वरूपाचे काम करीत जगातील अनेक प्रश्नांवर खूप मेहनत व संशोधन करून उत्तरे शोधली आहेत. 'प्रिसीजन फार्मिंग' हा त्यातला महत्त्वाचा भाग आहे. कंपनीचा अन्न प्रक्रिया उद्योग हा जगभर 'जैन फार्म फ्रेश' याच नावाने मालाची श्रेष्ठ गुणवत्ता व सातत्यासाठी प्रसिद्ध आहे. 'आपल्याला जे जग मिळाले होते त्यापेक्षा अधिक सुंदर जग निर्माण करूया' हे ब्रीदवाक्य घेऊन काम करीत असलेल्या 'जैनस्' ची सर्व उत्पादने आणि सेवा शाश्वत भवितव्य ब्रीदवाक्याची पूर्ती करण्यासाठी अखंडपणे कार्यरत राहतील हा विश्वास बाळगा!

आमची उत्पादने, सेवा आणि उपाय

- ठिबक (सूक्ष्म) सिंचन पद्धती • तुषार सिंचन पद्धती
- बूम इरिगेशन पद्धती • ट्रॅक्हलर्स-मोबाईल इरिगेशन पद्धती
- एकात्मिक सिंचन (रिसोर्स टू रूट) प्रणाली
- घर, गच्ची, बगिचे, उद्यान-लॅन्डस्केप आणि टर्फ सिंचन पद्धती
- क्रॉप कुलिंग आणि फ्रॉस्ट प्रोटेक्शन पद्धती
- सिंचन, बंदिस्त लागवड व वातावरण निर्मितीसाठी ऑटोमेशन पद्धती
- एरोपोनिक पद्धतीने शेती • हायड्रोपोनिक्स पद्धतीने शेती
- माती विरहीत शेती • नियंत्रित वातावरण व ट्रेलिस सिस्टीम शेती
- इनडोअर हॉर्टिकल्चर शेती • व्हर्टीकल शेती • प्रिसीजन फार्मिंग प्रणाली
- वातावरण नियंत्रित नर्सरी व यांत्रिक नर्सरी उभारणी
- रोपवाटिका आणि हार्डनिंग केंद्र • स्पीड ब्रिडींग चेंबर्स व ग्रोथ रूम्स
- टिश्यूकल्चर रोपे (केळी, डाळिंब, स्वीट ऑरेंज, स्ट्रॉबेरी, बटाटा इ.)
- फिल्टरेशन साधने • फर्टिगेशन व केमीगेशन साधने
- रायपनिंग चेंबर्स (फळ पिकविण्यासाठी घरे)
- सौर कृषि पंप प्रणाली • सौर वीज निर्मिती
- एचडीपीई पाईप व फिटींग्ज • पीव्हीसी पाईप व फिटींग्ज
- सेंटर ऑफ एक्सलन्स आणि तंत्रज्ञान पथदर्शी केंद्राची उभारणी
- प्रशिक्षण तथा तंत्रज्ञान मार्गदर्शन केंद्र उभारणी

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®

जैन प्लास्टीक पार्क, रा.म.क्र. ६, पो.बॉ.७२, जळगाव - ४२५००१, महाराष्ट्र ; फोन : +91- 257-2258011; Toll Free : 1800 599 5000; ई-मेल: sales@jains.com; www.jains.com

ॲग्रीसन फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेड

इज्राईल प्रशिक्षित प्रगतिशील शेतकऱ्यांची फार्मर्स प्रोड्युसर कंपनी

रजि. ऑफिस : प्लॉट क्रं ८०२, ए विंग, सर्व्हे नं १३४, परिवर्तन सोसायटी, लोकमान्य नगर, पटेल नगर, पुणे - ४११०३०

विभागीय कार्यालय : ॲग्रीसन हाऊस, अंगारमळा, आर्वी छोटी, त. हिंगणघाट जि. वर्धा - ४४२३०७


श्री. जि. डी. मोरे
मार्गदर्शक


श्री. जि. आर. कापसे
मार्गदर्शक


श्री. गंगाधर मुटे वर्धा
अध्यक्ष


श्री. बाळासाहेब सोळांकुरे पुणे
प्रबंध संचालक


श्री. बापूराव पाटील धुळे
उपाध्यक्ष, प्रशासन


श्री. अनिलकुमार जवादे वर्धा
उपाध्यक्ष खरेदी


श्री. राजेश गाडगे ठाणे
उपाध्यक्ष, विपणन


सौ. प्रियंका नाईक पालघर
संचालक


सौ. मनीषा चटप चंद्रपूर
संचालक


श्री. अंकुश मोरे बीड
संचालक


श्री. शिवाजी घाडगे जालना
संचालक


श्री. जितेंद्र कांबळे सातारा
संचालक


श्री. देवेंद्र राऊत पालघर
संचालक


श्री. ज्ञानेश्वर इंगळे बुलडाणा
संस्थापक सदस्य


श्री. ए. आर. कापसे पुणे
संचालक


श्री. कृष्णराव देशट्टीवार यवतमाळ
संस्थापक सदस्य


श्री. मधुकर भलमे चंद्रपूर
संस्थापक सदस्य


श्री. नागेश घोलप सोलापूर
संस्थापक सदस्य


श्री. देवानंद सातपुते पालघर
संस्थापक सदस्य


श्री. विजय पाटील नंदूरबार
संस्थापक सदस्य


श्री. स्नेहल पोतदार पालघर
संस्थापक सदस्य


श्री. दिगंबर रिंधे अहमदनगर
संस्थापक सदस्य


श्री. जालंदर उकिर्डे पुणे
संस्थापक सदस्य


श्री. गोपाल रायपुरे चंद्रपूर
संस्थापक सदस्य


श्री. लक्ष्मीकांत कौठकर अकोला
संस्थापक सदस्य


श्री. राजु लांबट वर्धा
संस्थापक सदस्य


श्री. विकास घिटे उस्मानाबाद
संस्थापक सदस्य


श्री. जयंत येरावार वर्धा
संस्थापक सदस्य


श्री. माधव कंदे लातुर
संस्थापक सदस्य


श्री. प्रकाश कांबळे सातारा
संस्थापक सदस्य


श्री. युवराज मेंगरे
संस्थापक सदस्य


श्री. विष्णुदास आथीलकर भंडारा
संस्थापक सदस्य


श्री. प्रमोद वडगुजर जळगांव
संस्थापक सदस्य


श्री. नितीन लोखंडे अकोला
संस्थापक सदस्य


सौ. वसुंधरा नाईक पालघर
संस्थापक सदस्य


श्री. हरेश पाटील रायगड
संस्थापक सदस्य


श्री. रमेश कुटे नाशिक
संस्थापक सदस्य


श्री. प्रविण बारी पालघर
संस्थापक सदस्य


श्री. सागर पुरी वर्धा
संस्थापक सदस्य


श्री. मिलींद जैन वाशिम
संस्थापक सदस्य

श्री. भाऊराव चंदनखेडे चंद्रपूर
संस्थापक सदस्य

श्री. विष्णु वेद्रे बीड
संस्थापक सदस्य

तुम्ही अनधिकृत डीलर कडून गाडी खरेदी करत नाही,

शेअर्स बाबतही तसेच आहे.

सेबी आणि बीएसई मधे नोंदणीकृत इंटरमीडियरीज विश्वासपात्र आहेत.
तुम्ही खरेदी व विक्री करता तेव्हा प्रत्येक वेळी त्यांचा कडेच व्यवहार करा.



इन्व्हेस्ट राइट तर फ्यूचर ब्राईट

बीएसई इन्व्हेस्टर्स प्रोटेक्शन फंड द्वारे जनहितार्थ प्रकाशित

सुरक्षित गुंतवणूक पद्धती विषयी अधिक माहितीसाठी https://www.bseipf.com/doandonts.html वर क्लिक करा

BSE
INVESTORS' PROTECTION FUND

Ankur®

सन १९७६ पासून

अंकुर सीड्स ची वचनबद्धता ...

नाविन्यपूर्ण संशोधन, शेती मार्गदर्शन, शेती विकास व गुणवत्ता !



प्रमुख उत्पादने

संकरित

बोलगार्ड कपाशी : ३०२८, किर्ती, जय, ३२२४,
धान : ७४३४, ७५७६, ७८८, १३५५५ **मका** : आदित्य, भास्कर **बाजरी** : ०४५
टोमॅटो : रणवीर, श्री, २७९७ **मिरची** : ९३०, अमिशा, सारंगी
वांगी : राकेश, किर्ती, उकर्ष, विजय **वाल** : डॉली, 427
दुधीभोपळा : १५८, नटवर, अमित **भेंडी** : २०२८, २३३८, सिध्दी, गौरी
कारले : करीश्मा, रजत, टिल्लू, गिरीजा **टरबूज** : शुगरक्यूब, सरस, ब्लॅक बॉल
काकडी : निराली, ऋतुजा, आलिया, शकीरा

संशोधित

धान : सोनम गोल्ड, पूजा गोल्ड, शतायु, ज्योतिका, साधना, एकवीरा, श्री-१०१
सोयाबीन : प्रभाकर, अग्रेसर **गहू** : केदार, शिवा **तुर** : चारू, प्रभा
चवळी : गोमती, व्ही.यु.-५, हरी, केतकी **वाल** : ऋतु, गोल्डी **वाटाणा** : राजस

www.ankurseeds.com

अंकुर सीड्स विश्वासाचे प्रतीक !